
स. ग्रं. सं. ठाणे
क्र. नं. ९०९.
REFBK-0008820

# एकांत दर्शन

प्रभाकर पाटणकर



तिबेट
(२३४४०)
गौरीशंकर
पुमोरी
(२३,१९०)
ऐव्हरेस्ट (२९००२)
मकालू (२७७९०)
भोतेकोसी
दुधकोसी
नामचेबझार
इंद्रावती
चौतारा
काठमांडू
भडगांव
ठाणकोट
बनेपा
दोलालघाट
सुनकोसी
चाकखोला
किरांते
मांगादेवराली
तामाकोसी
याशी
खिम्टीखोला
लिखुखोला
सेते
ठोसे
कार्योलंगरिवंड
चौन्रीखारका
राचेवा
जुनबेसी
टेमिसासा
बनबारी
सोलुखोला
ओखलढुंगा
दुधकोसी
मेखाप
मानेभांजियांग
सुनकोसी नदी
चिसापाणीगढी
बाग्मती नदी
अमलेखगंज
बीरगंज
रक्सौल
बलौटी
बेलाझोर
सासौरे
जय
भारत
भोजपूर
अरुण नदी
धान्कुटा
धरणे
बिराटनगर
प्रवास मार्ग
नेपाळची सरहद्द
० ८ १६ २४ मैल

# एव्हरेस्ट दर्शन

लेखक

**प्रभाकर पाटणकर**

प्रस्तावना

**श्री. भाऊसाहेब हिरे**

( महसूल मंत्री, मुंबईराज्य )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 1620

१५ ऑगस्ट १९५४

REFBK-0008820

प्रथमावृत्ति

किंमत तीन रुपये

—: प्र का श क :—
पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार
१८६ शनवार, पुणें २.

●

—: मुखपृष्ठ चित्र :—
चित्रकार मुळगांवकर

●

प्र का श न ९६ वें

●

ह्या चित्रांचा कॉपीराइट,
पुर्नमुद्रण, उतारे इत्यादि
सर्व हक्क लेखकाधीन.

●

—: मु द्र क :—
जयवंत शंकर आवटे
इं दि रा प्रे स
२७० सदाशिव, पुणें २.

# प्रस्तावना

रिज हाऊस, रिज रोड,
मलबार हिल, मुंबई नं. ६.

श्री. पाटणकर यांचें हस्तलिखित मीं इत्थंभूत वाचलें. श्री. पाटणकर यांनीं प्रस्तावना लिहिण्यास मला विनंती केली तेंव्हां असें वाटलें कीं, आतां हें प्रवासाचें कंटाळवाणें वर्णन वाचावें लागणार. परंतु आग्रहास्तव त्यांची विनंती मान्य केल्यानंतर एके दिवशीं मुंबईहून मनमाडपर्यंत रेल्वेंतून जातांना त्यांचें हें हस्तलिखित वाचण्यास घेतलें. हस्तलिखित हातांत घेतांना अधून मधून चाळून प्रस्तावना लिहिण्याइतकें भांडवल गोळा करून मोकळें व्हावें या विचारानें वाचण्यास सुरवात केली. परंतु वाचण्यास सुरवात केल्यानंतर त्यांतली प्रत्येक ओळन् ओळ वाचावीशीं वाटूं लागली. श्री. पाटणकर यांनीं कांहीं महत्वाचीं तरीं प्रकरणें वाचावीं अशी इच्छा प्रकट केली होती. पण हस्तलिखित हातांत घेतल्यावर मी त्यांत इतका रमलो कीं, प्रत्येक शब्द आणि वाक्य मीं काळजीपूर्वक व मोठ्या गोडीनें आणि आनंदानें वाचलें. वाचतांना कंटाळवाणें तर वाटलें नाहींच, उलट आपण एक रम्यकथा वाचतो आहोत असें वाटलें.

श्री. पाटणकर यांनीं आपल्या प्रवासाचें वर्णन मोठ्या रसभरीत व अलंकृत भाषेंत केलें आहे. सेल्सटॅक्ससारख्या रुक्ष विषयांत पारंगत असलेले हे गृहस्थ मराठी वाङ्मयांत सुद्धां भराऱ्या मारूं शकतील अशी मला कल्पना नव्हती. पुष्कळ ठिकाणीं अशीं वर्णनें आपल्याला पहायला मिळतील कीं जीं प्रथितयश साहित्यिकाच्या लेखणींतून उतरलेलीं आहेत असें आपल्याला वाटेल. भाषा साधी ओघवती असल्यामुळें विषयाचें वर्णन खूपच बहारदार झालेलें आहे. हस्तलिखित वाचत असतांना आपणच जणुं कांहीं प्रवास करतो आहोंत, व रस्ते, नद्या, पायवाटा, बर्फाचे ओढे, कपारींतील रस्ते, लाकडाच्या ओंडक्याचे पूल, बर्फाचीं शिखरें, भारवाहकांचा सहवास वगैरे अनुभवीत आहोंत असेंच सतत वाटत असतें.

एव्हरेस्टच्या जवळपास जाऊन एव्हरेस्टचें दर्शन घेण्याची प्रबळ इच्छा झाल्यावर त्यासाठीं कशी तयारी करावी लागली, किती हाल-अपेष्टा सहन कराव्या लागल्या व स्वतःच्या मनालाही वेळोवेळीं कसें सांभाळावें लागलें याचेंही दिग्दर्शन त्यांनीं सुंदर प्रकारें केलेलें आहे.

एव्हरेस्टचें पहिल्यांदा दर्शन झाल्याबरोबर त्यांनीं आपल्या भावना ज्या शब्दांत वर्णन केलेल्या आहेत त्या वाचल्या म्हणजे एव्हरेस्ट दर्शनासाठीं ते किती वेडेपिसें झालें होते याची कल्पना येते. एव्ह-रेस्टच्या माथ्यावर पाय ठेवण्यासाठीं नव्हे तर एव्हरेस्टच्या पायावर मस्तक ठेवण्यासाठीं आपण एव्हरेस्टकडे लीनतेनें जातों आहोंत ही भावना त्यांनीं शेवटपर्यंत आपल्या मनाशीं बाळगली होती. मला वाटतें त्यांच्या यशाला हीच उदात्त भावना कारणीभूत आहे.

तेनसिंगानें एव्हरेस्ट सर केल्यानंतर एव्हरेस्टविषयीं सर्व साधारण लोकांत थोडीफार जिज्ञासा निर्माण झाली. पण आपणांतून कोणीतरी जाऊन शक्य तेवढ्या जवळून एव्हरेस्टचें दर्शन घेऊं शकतील अशी कांहीं अद्याप सर्वसाधारण लोकांस कल्पना नव्हती. श्री. पाटणकर यांनीं तेंही शक्य आहे हें आपल्या प्रयत्नांनीं सिद्ध करून दिलें आहे. एव्हरेस्टच्या प्रवासाचें मराठी भाषेंत वर्णन असलेलें हें पहिलेंच पुस्तक असावें, त्यामुळें हें पुस्तक अधिक महत्त्वाचें आहे. लिखाणाची शैली विषयाच्या तादात्म्यतेनें अधिकच नटली असल्यामुळें पुस्तक अथ पासून इतिपर्यंत वाचनीय झालें आहे.

बोरीबंदर स्टेशनपासुन हस्तलिखित वाचायला घेतलें. नासिकला पोहोंचायला जवळ जवळ चार तास लागतात. तें स्टेशन कसें आलें याची मला कल्पनाही हें हस्तलिखित वाचत असतांना आली नाहीं. असें सुंदर प्रवासाचें व त्यांतल्यात्यांत एव्हरेस्टच्या प्रवासाचें पुस्तक श्री. पाटणकर यांनीं लिहून वाचकांची एव्हरेस्टसंबंधींची जिज्ञासा पूर्ण करण्याचें श्रेय घेतलें याबद्दल त्यांना धन्यवाद द्यायला हवेत.

भाऊसाहेब हिरे

# आभार

एव्हरेस्ट दर्शनासाठीं केलेल्या हिमालयांतील परिभ्रमणाचें व गिर्यारोहणाचें वृत्त लिहून काढण्यास माझे वडील व माझी पत्नी या दोघांनीं मला प्रोत्साहन दिलें. त्यांच्या प्रोत्साहनामुळेंच, माझ्या दीर्घ प्रवासाहून परत आल्यावर रोजचा व्यवसाय संभाळून, मीं हें प्रवासवृत्त लिहून काढलें. त्या दोघांचे आभार मानणें औपचारिक होईल म्हणून ते न मानतां, त्यांच्या सहाय्याचा उल्लेख करीत आहे. मुंबई राज्याचे महसूल मंत्री श्री. भाऊसाहेब हिरे यांनीं विधानसभेचें अधिवेशन व इतर अनेक सार्वजनिक कामें यांचा व्याप त्यांच्यामागें असतांही, माझ्या विनंतीला मान देऊन माझ्या ग्रंथाचें हस्तलिखित समग्र वाचून सुंदर व गुणग्राही प्रस्तावना लिहून दिली, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. सौ. कुसुम मलुष्टे यांनीं रेखाचित्रें काढून दिलीं याबद्दल त्यांचा आणि श्री. मुळगांवकर यांनीं अल्पवेळांत मुखपृष्ठाचें सुंदर चित्र काढून दिलें म्हणून त्यांचाही मी आभारी आहे.

मराठी वाचकांनीं माझ्या ‘ हिमालयाशीं झुंज ’ या ग्रंथाचें माझ्या अपेक्षेपेक्षां खूपच अधिक कौतुक व स्वागत केलें. माझ्या प्रस्तुत पुस्तकाच्या वाचनानें त्यांना, कष्टमय परंतु चिरकाल सुखद अशा हिमालयीन प्रवासाचा अनुभव आणि भूतलावरील सर्वोच्च शिखराच्या दर्शनाचा आनंद थोड्याफार प्रमाणांत प्राप्त झाला तर लेखक व प्रकाशक यांच्या श्रमांचें चीज होईल.


मुंबई, स्वातंत्र्यदिन
१५ ऑगस्ट १९५४

प्रभाकर पाटणकर


# शुद्धिपत्र

| अशुद्ध | शुद्ध | पान | ओळ |
|---|---|---|---|
| लिहिलेलें | लिहिलेला | १२ | १६ |
| गाडतोंडे | गायतोंडे | १५ | १४ |
| त्यनों | त्यानें | २७ | २६ |
| बसविण्याचें | ठसविण्याचें | ३४ | २७ |
| बरिगंज | बीरगंज | २८ | २७ |
| तळेनु | तळेजु | ३६ | ७ |
| नेंवार | नेवार | ३६ | २६ |
| सिद्धेपोखरी | सिद्धपोखरी | ३६ | २७ |
| घुलीखेड | घुलीखेल | ४३ | ५ |
| खड्डे खड्डे | खड्डे | ४३ | १५ |
| दोदालघाट | दोलालघाट | ४४, ४५ | १३, १५, १० |
| खोन्यापाशीं | खोल्यापाशीं | ५३ | १८,१९ |
| भन्न्यांग् | मंज्यांग | ६० | ४ |
| लापचाचूच | लापचाचून | ६३ | १५ |
| डोळे | डोकें | ६६, १०१ | ३, १६ |
| दाराचें | घराचें | ६७ | १६ |
| मोतिफोसी | भोतेकोसी | ६७ | २३ |
| शिकारी | भिकारी | ७६ | ४ |
| च्यांगमुंबा | च्यांगुम्बा | ७७ | ६ |
| Reokoning | Trekking | ८१ | १७ |
| मांगबोचे | पांगबोचे | ८४ | २८ |
| कॉक | कॉल | ९९ | २३ |
| बर्फ प्रवाहमयच | प्रवाह बर्फमयच | १०३ | १२ |
| मांगबोचे | पांगबोचे | १०४ | १३ |
| भिजलेल्या | थिजलेल्या | ११३ | ७ |
| माजे | माने | ११६ | २० |
| छोमोलंब्मा | छोमोलंग्मा | ११६ | १२ |
| दक्षिक्षेस | दक्षिणेस | ११८ | ४ |

—माझ्या आईवडिलांस



प्रवास मार्ग
१ एव्हरेस्टच्या पायथ्याचा तळ.
२ पुमोरीच्या पायथ्याचा तळ.
३ गोरुचे
४ लोबुचे
नुपला
पुमोरी
नॉर्थ पीक
आइसफॉल
नॉर्थ कॉल
वेस्टर्न कुम
एव्हरेस्ट
ल्होटसे
नुपदसे
खुंबु बर्फप्रवाह
फेरिचे
पांगबोचे
इम्जा खोला
आमाडबलाम
खुमजुंग
थ्यांगबोचे
नामचेबझार
कांगटेगा
मैल
० १ २ ३ ४ ५



नामचे बझार जवळील टेकडीवरून एव्हरेस्टचें प्रथम दर्शन

# मूळ कल्पना व पूर्वतयारी

1120...

## मूळ कल्पना

" कायहो, हिमालयांत जाऊन गिर्यारोहण करायची कल्पना तुमच्या डोक्यांत एकदम कशी आली ? तुम्ही काय एखाद्या क्लबातर्फे गेला होता काय ? " अशा प्रकारचे प्रश्न मी माझ्या एव्हरेस्ट दर्शनाच्या प्रवासास निघण्यापूर्वी व प्रवास करून आल्यावर अनेक लोकांनी मला विचारले. या कल्पनेचा उगम कसा काय झाला हें सविस्तरपणें सांगण्यास सवड न देतां लगेच पुढचे प्रश्न ते विचारीत, " तुम्ही ऑक्सिजन बरोबर नेला होता कां ? खात काय होता ? बर्फावरून सारखें चालावें लागत होतें कां ? " माझ्या वाचकांनाही या व इतर अनेक प्रश्नांचीं उत्तरें हवीं असतील. तीं या प्रवास वर्णनांत ओघानें येतीलच. म्हणून पहिल्या प्रश्नाचें उत्तर देऊन मी पुढें जातो.

मी मॅट्रिकचें वर्गांत असतांना त्यावेळचे व्हिजुअल इन्स्ट्रक्शन इन्स्पेक्टर श्री. तोरो यांनीं " सन १९२४ ची एव्हरेस्टवरील मोहीम " या विषयावर सदीप व्याख्यान दिलें होतें. तें ऐकावयास मी गेलों होतों. तें व्याख्यान इतकें मनोरंजक व परिणामकारक होतें कीं, तेव्हांपासून एव्हरेस्टवरील गिर्यारोहण या विषयाची गोडी मला लागली. त्यानंतर पुढील दहा पंधरा वर्षांचे काळांत सवड सांपडेल तेव्हां व मिळत जातील तशी, " हिमालयांतील गिर्यारोहण " या विषयावरील अनेक इंग्रजी पुस्तकें मीं वाचून काढली. कुठल्याही भारतीय भाषेंत या विषयावर पुस्तकें नव्हतीं हें सांगावयास नकोच. या वाचनामुळें मला गिर्यारोहणाविषयीं खूपच ज्ञान झालें. तें ज्ञान दुसऱ्यास द्यावें या हेतूनें सन १९४७–४८ सालांत पुरेशी सवड मिळाली, तेव्हां " हिमालयाशीं झुंज " हें पुस्तक मीं लिहिलें. त्या पुस्तकाचा विषय नवा होता. तें पुस्तक लिहितांना

आबालवृद्ध वाचकांस तें इतकें आवडेल, असें मला वाटलें नव्हतें. "पुस्तक वाचल्यानंतर गिर्यारोहण या विषयांबद्दल आम्हांला गोडी वाटूं लागली" असें सांगणारे मला अनेक लोक भेटले. गेल्या वर्षीच्या एव्हरेस्ट विजयानंतर तरुणांत व शालेय विद्यार्थ्यांत गिर्यारोहणाविषयीं खूप कुतूहल निर्माण झालें आहे. माझ्या बाबतींत पुढें सांगायचें म्हणजे, तें पुस्तक लिहिण्यासाठीं अनेक इंग्रजी ग्रंथ अभ्यासपूर्वक वाचावे लागल्यामुळें गिर्यारोहण या विषयासंबंधीं माझा सखोल अभ्यास झाला किंवा दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे मला या विषयाचें भरपूर पुस्तकी ज्ञान झालें. गिर्यारोहणाविषयीं आपण वाचलेल्या या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव घेतां आल्यास किती उत्तम होईल असे विचार तेव्हांपासून माझ्या मनांत उद्भवूं लागले. त्या हेतूनें हिमालयांत परिभ्रमण ( ट्रेकिंग ) करून आलेल्या लोकांशीं परिचय करण्यास मीं सुरवात केली. मुंबईचे श्री. रूसी गांधी यांच्याशीं माझा परिचय झाला. त्यांनीं हिमालयांत बरेच वेळा प्रवास केलेला आहे. आतांपर्यंत ते हिमालयाच्या सिक्कीम, लडाख, गढवाल वगैरे भागांत जाऊन आलेले आहेत. पुन्हां तुम्ही जाल तेव्हां मी तुमचे बरोबर येईन, असें त्यांना सांगून ठेविलें होतें. सन १९५० मध्यें ते लाहूल लडाखमध्यें तीन आठवडे पर्यटन करून आले. परंतु माझ्या कांहीं वैयक्तिक अडचणींमुळें मला त्यांचे बरोबर जातां आलें नाहीं.

सन १९५१ मध्यें मी मुंबईस बदलून आलों, तेव्हांपासून माझी आणि श्री. रूसी गांधींची वारंवार गांठ पडूं लागली. आम्ही एकमेकाबरोबर सह्याद्रींतील कांहीं डोंगरावर व शिखरावर पायचाल ( हायकिंग ) करून आलों. सन १९५२ च्या डिसेंबर महिन्यांत आम्ही बोलत असतां, या पुढील मोठ्या सुट्टींत नेपाळांतील हिमालयांत जावें असा विचार श्री. गांधींनीं सुचविला, हिमालयांत परिभ्रमण करण्यास जाण्याची माझी तीव्र इच्छा होतीच. नेपाळांत गेल्यास केवळ हिमालयांतील परिभ्रमणाचा लाभ मिळेल एवढेंच नसून ज्या देशाविषयीं भारतीयांस, विशेषतः हिंदूधर्मीयांस कुतूहल आहे, व ज्या देशाविषयीं बाह्य जगास फारच थोडी खरी माहिती आहे, अशा देशांत प्रवास करण्याची संधि मिळणार होती. म्हणून श्री. गांधींच्या सूचनेस मीं ताबडतोब संमति दर्शविली, व आम्हीं पुढच्या तयारीस लागलों.

१७०२२ भ्र.वि. १०७ १४।५।४

# पूर्व तयारी

हिमालयाच्या कुठल्याही भागांत परिभ्रमणाला जायचें असेल, व त्या भ्रमणा-पासून आपल्या भौगोलिक ज्ञानांत भर टाकण्याची इच्छा असेल, तर त्या भागाचे नकाशे आपल्याजवळ हवेत ! भारत सरकारच्या सर्व्हे ऑफ इंडिया या खात्यानें गेल्या शंभर दीडशें वर्षांत भारताच्या भूपृष्ठाचें मोजमापन करून नकाशे बनविलेले आहेत. पूर्वी, भारताच्या व भारताच्या सरहद्दीवरील देशांच्या कुठल्याही भागाचा नकाशा हवा असल्यास, कोणांसही केव्हांही त्याची योग्य किंमत देऊन त्या खात्याकडून मिळत असे. परंतु गेल्या जागतिक युद्धापासून भारताच्या संरक्षणाचा प्रश्न नाजुक व महत्वाचा झाल्यामुळें हे नकाशे मागेल त्याला देण्याचें या खात्यानें बंद केलें आहे. या खात्याजवळ जे नकाशे आहेत त्यांतील कांहीं नकाशे मर्यादित ( रिस्ट्रिक्टेड ) म्हणून ठरविले गेले आहेत. त्या नका-शाची मागणी आल्यास त्या खात्याकडून एक फॉर्म पाठविला जातो. आपणांस कोणते नकाशे हवे, कोणत्या कारणासाठीं हवें हें सर्व त्या फॉर्मवर लिहून तो आपल्या राज्याच्या गृहखात्यामार्फत पाठवावा लागतो. राज्य सरकार व भारत सरकार यांनीं संमति दिली तरच सर्व्हे ऑफ इंडिया खातें नकाशे पाठविण्यास तयार होतें. नेपाळचे नकाशे 'मर्यादित' स्वरूपाचे असल्यानें माझा मागणी अर्ज, मुंबई सरकारनें भारत सरकारच्या संरक्षणखात्याकडे पाठविला व तेथून तो सर्व्हे ऑफ इंडिया खात्याकडे गेला.

नकाशे मिळविण्याची खटपट करीत असतांना नेपाळमध्यें परिभ्रमण करण्या-साठीं आवश्यक असलेली माहिती मिळविण्यासाठीं, नेपाळमधील भारताच्या वकिलांना पत्र लिहिलें. सुदैवानें नेपाळमधील सध्याचे भारतीय वकील एक महाराष्ट्रीय सद्‌गृहस्थ आहेत. पूर्वी भारत सरकारांत सेक्रेटरीच्या हुद्यावर असलेले श्री. बी. के. गोखले, आय. सी. एस्. हे सध्यां नेपाळमध्यें आपल्या देशाचे ॲम्बॅसडर आहेत. महाराष्ट्रीय म्हणून आपलेपणानें माझ्या उपक्रमा-विषयीं आस्था दाखवून हवी असलेली माहिती पुरविण्याची व्यवस्था ते करतील अशी आशा पत्र लिहिण्यापूर्वी मला वाटत होती. ती अपेक्षेपेक्षांही जास्त फलद्रूप झाली. श्री. गोखले यांनीं माझ्या पत्राला ताबडतोब वैयक्तिक उत्तर

घाडलें एवढेंच नव्हे तर आपल्या मिलिटरी ॲटॅशेमार्फत नेपाळच्या परिभ्रमणासाठीं लागणारी माहिती गोळा करून ती पत्रद्वारें कळविण्याची व्यवस्था केली. आम्ही काठमांडूला गेल्यावर श्री. व सौ. गोखले यांच्या मनमिळाऊ व आगत्यशील स्वभावाचा चांगला परिचय झाला. काठमांडूच्या आमच्या मुक्कामांत त्यांनीं व ॲम्बॅसींतील त्यांच्या सहकाऱ्यांनीं आम्हांला आवश्यक ती मदत तत्परतेनें केली.

नेपाळमध्यें धवलगिरी व अन्नपूर्णा या शिखरांजवळ असलेल्या काळी गंडकी नदीच्या कांठीं असलेल्या मुक्तिनाथ या पवित्र क्षेत्रीं जाऊन यावें, किंवा नामचे-बझार या खेड्याचें पुढें जाऊन एव्हरेस्टचें दर्शन घ्यावें असें पर्यटनाचे दोन मार्ग आमच्या विचारांत होते. माझी व श्री. रूसी गांधी यांची यासंबंधीं वारंवार चर्चा होत असे. कांहीं दिवसानंतर हिमालयांतील गिर्यारोहणाविषयीं प्रेम असलेल्या आणखी दोघा व्यक्तींचा व आमचा परिचय झाला. ते म्हणजे श्री. नवनीतलाल पारेख व श्री. जयवंत गायतोंडे. त्या दोघानाही या वर्षी हिमालयांत परिभ्रमणास जाण्याची इच्छा होती. श्री. नवनीत पारेख तीन वर्षांपूर्वी कैलास मानससरोवराची यात्रा करून आलेले आहेत. त्या यात्रेची त्यांनीं सुंदर रंगीत फिल्म काढलेली आहे. त्यांनीं गुजराती भाषेंत लिहिलेलें "कैलास-दर्शन" हा प्रवास ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झालेला आहे. आमच्या चौघांचा परिचय झाल्यावर व सर्वांनीं एकत्र जाण्याची इच्छा दर्शविल्यावर विचार विनिमयासाठीं आमच्या बैठकी सुरू झाल्या. कोणच्या मार्गानें जावें, किती जणांनीं जावें? किती दिवस प्रवास करावा, वगैरेबद्दल चर्चा सुरू झाली. अखेर सन १९५३ च्या मे महिन्यांत आम्ही नक्की ठरविलें कीं, नेपाळमधील सोलाखुंबु तालुक्यांतील नामचे बझार या गांवीं जाऊन तेथून पुढें एव्हरेस्टच्या परिसरात आठ-दहा दिवस परिभ्रमण करावयाचें. त्याप्रमाणें श्री. गोखले यास पत्र लिहून मनोदय कळविला व नेपाळ सरकारकडून, नेपाळच्या अंतर्भागांत परिभ्रमण करण्याची परवानगी मिळविण्याची त्यांना विनंति केली.

परवानगी मिळण्याची खात्री होती. भारतीय वकिलातीचें नेपाळ सरकारवर चांगलेंच वजन आहे याची आम्हांला कल्पना होती. ता. ११ सप्टेंबर १९५३ रोजीं मुंबईहून निघुन, नेपाळमधील विराटनगर, धान्कुटा, डिंग्ला या

मार्गानें नामचे बझारला जायचें. पुढें जाऊन एव्हरेस्टच्या परिसरांत दहा दिवस परिभ्रमण करावयाचे. तेथून परत नामचे बझार येथें येऊन काठमांडूला जावयाचें. तेथें पांचसहा दिवस राहून भारतांत परत यावयाचें, असा आमचा प्रथम बेत होता. पुढें त्यांत थोडा बदल करून आम्ही काठमांडूस आधीं जाऊन, तेथून नामचे बझारला गेलो, व तेथून ओखलधुंगा, जयनगर मार्गानें परत आलो. आमचा पायीं प्रवास सुमारें पंचेचाळीस दिवसांचा होणार होता. यांतलि नामचे बझार पुढील आठ दहा दिवस तीव्र थंडींत व निर्जन प्रदेशांत काढायचे होते. त्यासाठीं खाण्यापिण्याची व राहण्याची सर्व सामुग्री आणि गिर्यारोहणाचीं साधनें बरोबर बाळगण्याची आवश्यकता होती. आम्ही वारंवार एकत्र जमून आम्हांस लागणाऱ्या वस्तूंच्या याद्या केल्या व त्या वस्तू गोळा करण्यास सुरवात केली.

आमच्यापैकीं काहीं जण हिमालयन क्लब या संस्थेचे सभासद असल्यामुळें हिमालयन क्लबकडून कांहीं साधन सामुग्री भाड्यानें मिळविणें शक्य होते. हिमालयन क्लब ही गिर्यारोहकांची जुनी संस्था आहे. हिमालयांत गिर्यारोहण करण्यास आलेले बहुतेक सर्व प्रसिद्ध पाश्चिमात्य गिर्यारोहक या संस्थेचे सभासद आहेत. अद्यापही या क्लबचे अध्यक्ष, चिटणीस, व कार्यकारी मंडळाचे सभासद पाश्चिमात्य ( विशेषतः ब्रिटिशच ) आहेत. या क्लबची मुख्य कचेरी कलकत्ता येथें आहे, व दिल्ली, मुंबई आणि दार्जिलिंग येथें स्थानिक शाखा आहेत. या संस्थेजवळ गिर्यारोहणास लागणारी साधनासामुग्री आहे, व ती सभासदांना वापरण्यासाठीं भाड्यानें मिळूं शकते. या संस्थेकडून आम्हांला हलक्या वजनाचे वाताभेद्य तंबू, झोपण्याच्या पिशव्या ( स्लीपिंग बॅग्ज, बर्फकुदळी ( आइस अॅक्सेस ) दोर, बर्फावर चालण्यासाठीं बुटांना बांधण्याच्या, खिळे लावलेल्या पोलादी पट्ट्या ( क्रॅम्पॉन्स ) वगैरे वस्तू मिळाल्या. आम्हांला आवश्यक वाटणाऱ्या, डब्यांतील खाद्यपदार्थांची ( टिन्ड फुडची ) आम्ही यादी केली, व त्या वस्तू बाजारांतून खरेदी केल्या. खरेदी केलेल्या वस्तूंत लोणी, मुरंबा, पनीर, आटीव दूध, कोको, चाकोलेट, पॉरिज ( क्वेकर ओट्स ) वगैरे जिन्नस होते. याखेरीज आम्ही मुंबईहून मसाल्याचे जिन्नस व लोणचे, पापड वगैरे जिन्नस बरोबर नेले होते. प्रत्येकास लागणारे गरम कपडे, गॉगल्स, बूट, इत्यादि वस्तू प्रत्येकानें स्वतः आणावयाच्या

असें ठरलें होतें. खाद्यपदार्थांच्या वस्तू घालून नेण्यासाठीं आम्हीं जरूर तेवढ्या ट्रंका व किट बॅग्ज खरेदी केल्या, जाण्यापूर्वी एक महिना आमचा सर्व फावला वेळ या मोहिमेची तयारी करण्यांत खर्च करीत होतो. मोहिमेचे बेत करण्यांत व त्यावर चर्चा करण्यांत, आमचें तासन्तास निघून जात सर्वांच्या खेळकर व आनंदी स्वभावामुळें ते तासही मजेंत गेले. गिर्यारोहण या विषयाचा आमचा चांगला अभ्यास होताच. शिवाय एव्हरेस्टच्या परिसरांतील भूप्रदेशाची माहिती, एव्हरेस्ट-वरील अलीकडील चढायांची वर्णनें वाचल्यामुळें आम्हांला झालेली होती. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यास किती दिवस लागतील, काय अड-चणी येतील, याची आम्हांला कल्पना आलेली होती. प्रत्यक्ष प्रवासांत या ज्ञानाचा चांगला उपयोग झाला. प्रवास करतांना पुढें कोणतें गांव येईल, वाटेंत कोणती नदी लागेल, कोणतीं शिखरें दिसतील, किती चढावें लागेल, याचा अंदाज आम्हांला वेळोवेळीं येत होता. ज्या स्थळांचें वर्णन वाचलेलें आहे. व ज्यांचीं छायाचित्रें पाहिलेलीं आहेत अशीं स्थळें, पुढें प्रवासामध्यें प्रत्यक्ष पाहतांना आम्हांस गंमत वाटली.

खाद्यपदार्थांच्या वस्तू खेरीज, स्वैपाक करावयास लागणाऱ्या वस्तू म्हणजे प्रायमस स्टोव्ह, ॲल्युमिनियमचीं स्वैपाकाचीं भांडीं, चिमटा, चमचे वगैरे बारीक सारीक वस्तू, कंदील, दोरी, मेणबत्त्या, काड्याच्या पेट्या, अशा दुसऱ्या आवश्यक वस्तू, सर्व आठवून आठवून यादींत घालून विकत आणण्याची व्यवस्था करीत होतों. आमच्यांतील दोघे तिघे पूर्वीच हिमालयांत जाऊन आलेले असल्यामुळें त्यांच्या अनुभवाचा फायदा होत होता. तरीसुद्धां प्रत्येकाचे अनुभव वेगवेगळे असल्यामुळें चर्चा झाल्याशिवाय निर्णय होत नसे.

मुंबईहून निघण्यापूर्वी कमिशनर ऑफ पोलीस यांजकडून आम्हांला ओळख-पत्रें ( आयडेंटिटी सर्टिफिकेट्स ) घ्यावीं लागलीं. दुसऱ्या गांवीं राहणाऱ्या लोकांना नेपाळांत जायचें असेल तर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांजकडून अशीं ओळख पत्रें घ्यावीं लागतील. नेपाळमध्यें प्रवेश करण्यास पासपोर्ट लागत नाहीं. परंतु वरील प्रकारचें ओळखपत्र लागतें. शिवाय नेपाळ हें परराष्ट्र असल्यामुळें पटना येथून विमानमार्गे काठमांडूला जातांना इन्कमटॅक्स खात्याकडून मिळविलेलें क्लिअरन्स सर्टिफिकेट विमानतळावरील अधिकाऱ्यांना दाखवावें लागतें.

खाद्य पदार्थ, गिर्यारोहणाचीं साधनें, व प्रत्येकाचें स्वतःचें सामान या सर्वांचें वजन खूप झालें होतें. रेल्वे प्रवासांत आमच्याबरोबर जादा लगेज म्हणून एवढें सामान नेतां आलें नसतें. त्यासाठीं आम्हांला रेल्वे अधिकाऱ्यांकडून खास परवाना काढावा लागला. हें सर्व सामान काठमांडूपर्यंत व्यवस्थित व वेळेवर पोंचावें म्हणून, मार्गावरील रेल्वे जंक्शनवर तें एका गाडींतून उतरून दुसऱ्या गाडींत नीट चढविलें जातें आहे कीं नाहीं हें पाहण्याची आवश्यकता होती. त्यांतील कांहीं डाग रेल्वे नोकरांच्या हलगर्जीपणामुळें उतरवायचें किंवा चढवायचे राहिलें तर पंचाइत व्हायची. एखादी अत्यंत जरूरीची वस्तू — उदाहरणार्थः— तंबू, दोर, वगैरे जर गहाळ झाली किंवा काठमांडू येथें वेळेवर पोंचली नाहीं तर तेथून पुढचें प्रवासाला निघणेंच अशक्य होऊन बसावयाचें. म्हणून आम्हीं असें ठरविलें कीं, आमच्यापैकीं दोघातिघांनीं जमीनमार्गें सामानाबरोबर काठमांडूला जावयाचें. वाटेंत ज्या ज्या ठिकाणीं गाडी बदलावी लागतें तेथें गाडी पाशीं जाऊन आमचें सामान उतरवून घेऊन पुन्हां पुढच्या गाडींत बरोबर चढलें जात आहे कीं नाहीं तें पहावयाचें. त्या निर्णयानुसार श्री. गाडगोंडे, श्री. होमी मोदी व आमचा स्वैपाकी श्री. गेब्रीलाल हे तिघेजण जमीन मार्गानें काठमांडूस गेले. बाकीच्या तिघांनीं बिहारची राजधानी पटना येथपर्यंत रेल्वेनें व तेथून काठमांडूपर्यंत विमानानें प्रवास केला.

आम्ही प्रत्यक्ष प्रवासास निघण्यापूर्वीं एकदोन विघ्नें पुढें येऊन उभीं राहिलीं होतीं. आमची मुंबईहून निघण्याची जी तारीख ठरलेली होती, ती आठ दहा दिवसावर आलेली होती, तरीसुद्धां नेपाळ सरकारचा परवाना आमचेकडे आलेला नव्हता. आयत्या वेळेस कांहीं कारणामुळें तो मिळाला नाहीं तर आमची निराशा होणार एवढेंच नसून आम्ही केलेली तयारी फुकट जाणार होती. याखेरीज, काठमांडूहून आम्हांला बातमी आली कीं, गेल्या वर्षींचें यशस्वी ब्रिटिश एव्हरेस्ट पथक नेपाळमधून परत जाण्याच्या सुमारास नेपाळी जनतेंत भारतीयांविरुद्ध कटु भावना निर्माण झालेल्या आहेत. हिलरीबरोबर एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करून शेर्पा तेनसिंग काठमांडूला परत आले. त्यावेळेस काठमांडूतील लोकांना वाटलें कीं तेनसिंग हे शेर्पा असल्यामुळें नेपाळी आहेत, व ते नेपाळी वीर आहेत असेंच जगानें मानावें. तेनसिंग काठमांडूला पोचतांच

तेथील चळवळ्या लोकांनीं त्यांना घेरून टाकिलें. भारतीय वृत्तपत्र प्रतिनिधींना त्यांच्याजवळ फिरकूंसुद्धां दिलें नाहीं. पुढें तेनसिंग भारताचे नागरिक आहेत असें सिद्ध झाल्यावर कांहीं नेपाळी राजकारणी लोकांचा जळफळाट झाला. नेपाळमध्यें नेपाळी कॉंग्रेसनें राणाशाहीशीं लढा दिला. त्यानंतर अधिकारसूत्रें हातांत आल्यावर कॉंग्रेस पक्षांत फूट झाली. भारताच्या पाठिंब्यानें बनविल्या गेलेल्या कामचलाऊ मंत्रिमंडळांत ज्यांना स्थान मिळालें नाहीं, ते पुढारी, स्वपक्षाचा प्रचार करण्यासाठीं मंत्रिमंडळावर व ज्याच्या मदतीनें ते अधिकारावर आहे त्या भारत सरकारवर टीका करूं लागले.

अशा वातावरणांत नेपाळमध्यें परिभ्रमणासाठीं आम्ही जाणें इष्ट होतें काय? नेपाळमधील लोकांची मदत होण्याचें बाजूला राहून त्यांचेकडून उपसर्गच पोचायचा. यासाठीं आम्हांला काठमांडूतील भारतीय वकिलातीकडून असा इशारा मिळाला कीं, आमच्यापैकीं एक दोघांनीं आधीं काठमांडूला जावें, तेथील परिस्थिति प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहावी व मगच योजिलेल्या पर्यटनास निघायचें किंवा नाहीं हें ठरवावें.

आयत्या वेळेस पुढें उभ्या राहिलेल्या वरील अडचणींमुळें आम्ही विवंचनेंत पडलों. आम्हांला परवाना मिळवून देण्याचें काम भारतीय वकिलातीनें अंगावर घेतल्यामुळें तो नेपाळ सरकारकडून मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं, असा आम्हांला भरंवसा होता. परंतु तो हातांत पडल्याखेरीज, किंवा तो मिळाला आहे. हें कळल्याखेरीज मुंबईहून निघून काठमांडूला जाऊन पोंचणें हें योग्य झालें नसतें. म्हणून परवाना मिळविण्याची त्वरा करण्याबद्दल आम्ही काठमांडू येथील वकिलातीला तार केली.

हें झालें नेपाळ सरकारच्या संमतीबद्दल. दुसरी एक अडचण आमच्यापुढें आयत्या वेळेस आली. पटना ते काठमांडू ही विमान वाहतुक अनियमितकालपर्यंत बंद ठेवण्यांत आली आहे अशी बातमी त्याच सुमारास आम्ही वृत्तपत्रांत वाचली. ती कां बंद ठेवण्यांत आली आहे याचा खुलासा वृत्तपत्रांत न आल्यामुळें काठमांडूमधील कांहीं राजकीय गडबडीमुळें ती बंद ठेवण्यांत आली असावी, अशी शंका आम्हांला वाटूं लागली. ती खरी असली तर आमच्या परिभ्रमणाचें आड मोठेंच विघ्न येणार होतें. काठमांडू येथें भारतविरोधी प्रचार व राजकीय

प्रक्षोभ होत असला तर आम्हांला नेपाळी लोकांचें सहकार्य कसें मिळणार, व आम्हीं आवश्यक ती सामुग्री, व भारवाहक मिळवून काठमांडूच्या बाहेर कसें पडणार ? शिवाय विमान वाहतूक बंद झाल्यामुळें आमची अॅडव्हान्स पार्टी काठमांडूस आधीं पोचूं न शकल्यामुळें, पुढचे प्रवासाला निघण्यास उशीर झाला असता. म्हणून आम्ही पुन्हां चिंतेत पडलों. आमची चिंता केवळ या अडचणी कशा दूर कराव्या याबद्दल होती. परंतु आमच्या सर्वांच्या नातलगांना व मित्रमंडळींना तर फारच काळजी वाटूं लागली. आम्ही हिमालयांत हिमाच्छादित पर्वतावर जाऊन येणार हें सांगितल्यापासून त्यांना आमच्या सुरक्षिततेबद्दल काळजी वाटूं लागली होतीच. त्यांत राजकीय प्रक्षोभाची बातमी ऐकिल्यावर तर आम्ही आमच्या संकल्पित पर्यटनावर जाऊंच नये असें त्यांना वाटूं लागल्यास नवल नाहीं. नातलगांच्या विरोधामुळें आमच्यांतील एकदोघांनीं आपला बेत ऐनवेळेस रद्द करण्यापर्यंत पाळी आली.

परंतु या सर्व अडचणी एका दिवसांत निवारल्या गेल्या. मध्यंतरी आम्ही भारतीय वकिलातीला पत्र लिहून कळविलें होतें कीं, पूर्व नेपाळमध्यें राजकीय वातावरण तंग असेल तर नामचे बझारला न जातां आम्ही मध्य नेपाळमधील, मुक्तिनाथचे बाजूला जाऊं, तरी तिकडे जाण्यास अडचण आहे किंवा नाहीं याचा खुलासा करावा. मुंबईहून निघणाच्या फक्त आठ दिवस आधीं श्री. गोखले यांजकडून तार आली कीं, नेपाळ सरकारनें नामचे बझारला जाण्यास संमति दिली आहे; व वाटेंत तुम्हांला कांहीं खास अडचणी येतील असें वाटत नाहीं, तेव्हां तुमचा मूळचा बेत बदलण्याचें कारण नाहीं. पाठोपाठच दुसरी चांगली बातमी आली की, पटना ते काठमांडू विमान-वाहतुक पुन्हां सुरू झाली आहे. अशा रितीनें, आमच्या संकल्पित पर्यटनांतील मुख्य विघ्नें नाहींशीं झाल्यामुळें आम्ही पांच जणांनीं तारीख अकरा सप्टेंबर रोजीं निघण्याचें नक्की केलें. पुन्हां आम्ही तयारीला जोरानें सुरवात केली. विमानांतील व आगगाडीचे प्रवासासाठीं जागा राखून ठेवण्याची व्यवस्था केली. माझ्या घरांतील एक खोली आमच्या मोहिमेच्या सामानानें भरून गेली होती. त्या सामानाकडे पाहिलें, कीं तें काठमांडूपर्यंत कसें व्यवस्थित पोहोचेल याचा विचार मनांत यायचा.

# मुंबई ते काठमांडु

तारीख अकरा रोजीं अेक ट्रक करून सर्व सामान बोरीबंदर (व्हिक्टोरिआ टर्मिनस) स्टेशनवर नेलें. त्या सामानाचें वजन सुमारें चौदा मण भरलें व मुंबईहून रक्सॉल स्टेशनपर्यंत त्याचा रेल्वे चार्ज एकशें साठ रुपये आला. तें सामान रेल्वे अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करून तें रात्रीं साडेबारा वाजतां निघणाऱ्या काशी एक्सप्रेसवर चढविण्यास त्यांना सांगितलें. काशी एक्सप्रेसनें श्री. गायतोंडे व दुसरे दोघेजण जाणार होते. ते रेल्वेनें बनारस, मुझफरपूर, सगौली येथें गाड्या बदलून भारत व नेपाळच्या सरहद्दीवरील रक्सॉल या गांवीं जाणार होते. तेथें रेल्वेकडून सामान आपल्या ताब्यांत घेऊन तें नेपाळ सरकारच्या छोट्या रेल्वेवर चढवून एकोणतीस मैल अमलेखगंजपर्यंत जाणार होते. तेथून अठावीस मैल सिवालिक डोंगरांच्या रांगांतून भिमफेडीपर्यंत ते बसनें प्रवास करणार होते. भिमफेडी येथें सर्व सामान भारवाहकांच्या पाठीवर लादून समुद्रसपाटीपासून सात हजार फूट उंच असलेल्या चिसापाणीगढी घाटांतून ठाणकोटपर्यंत बीस मैल पायीं व पुढें ठाणकोटपासून आठ मैल काठमांडूपर्यंत बसनें असा त्यांचा प्रवास होणार होता.

मी व नवनीत मुंबईहून कलकत्ता मेलनें निघून गया येथें गाडी बदलून पटना येथें जाणार होतों. तेथें एक दिवस राहून पुढें विमानानें काठमांडूला जाणार होतो. बोरीबंदरवर आम्हांला निरोप देण्यास आमची दोघांची बरीच नातलग व मित्रमंडळी जमा झाली होती. काठमांडू सोडल्यावर परत भारतांत येईपर्यंत तिकडून पत्र पाठविण्याची कांहीं व्यवस्था होऊं शकणार नाहीं, तरी पत्र न आल्यास काळजी करूं नये, असें आम्ही त्यांना बजावून सांगितलें होतें. आम्ही आमच्या सुरक्षिततेची शक्य तेवढी काळजी घेऊं व जपून जाऊं असें आश्वासन आम्हीं दिलें असतांही त्या सर्वांच्या मनांतील आमच्या बद्दलची काळजी आम्हांला स्पष्टपणें दिसून येत होती. माझी अनेक वर्षांची इच्छा फलद्रूप होण्याचे मार्गावर होती, तेव्हां मला स्वतःला काळजी वाटण्यापेक्षां, हिमालयावर जाण्यास निघालो, म्हणून समाधानच वाटत होतें. पर्वतावर चढूं

लागल्यावर केवळ नांव मिळविण्यासाठीं किंवा अहमहमिकेनें तुमच्या कुवतीपेक्षां पुढें जाण्याचें साहस करूं नका, असें आम्हांला सर्वांनीं बजावून सांगितलें होतें.

आम्हीं मुंबईहून कलकत्ता मेलनें निघालों. वाटेंत अलाहाबादच्या अलिकडे माणिकपूर स्टेशनवर रूसी गांधींची तार मिळाली. तार पाहिल्यावर वाटलें कीं आतां काय विघ्न आलें आहे ? " आमच्या मोहिमेचें सामान काशी एक्सप्रेसनें पाठविण्याचें ऐवजीं रेल्वेच्या नोकरांनीं चुकून आमच्याच म्हणजे कलकत्ता मेलच्या पार्सलच्या डब्यांत चढवून दिलें, तरी तें अलाहाबाद येथें उतरवून घेऊन मागून येणाऱ्या काशी एक्सप्रेसनें चढवून देण्याची व्यवस्था करा " असा मजकूर तारेंत होता. रूसी गांधींनीं आम्हांलाच तार केली एवढेंच नव्हें तर, अलाहाबाद व बनारस येथील स्टेशनमास्तर आणि अलाहाबाद येथील त्यांचे मित्र श्री. आगरवाल या सर्वांना त्यांनीं तारा व टेलिफोननें संदेश पाठविले. या घोंटाळ्यामुळें गायतोंडे आणि मंडळींची व सामानाची मुंबई येथेंच फारकत झाली. त्या सामानावर रेल्वेच्या प्रवासांत लक्ष ठेवलें नाहीं तर तें वाटेंत कुठेंतरी पडून राहायचें, केव्हांतरी रक्सॉलला पोचायचें. शिवाय वाटेंत त्यांतील कांहीं गोष्टी चोरापोरीं जायच्या अशी शक्यता होती. त्या सामानांत तंबू, बर्फ कुदळी, दोर, खाण्याचे बंद डबे, वगैरे महत्त्वाच्या वस्तु होत्या.

तार मिळाल्यानंतर धांवपळ करून आम्ही आमच्या गाडीच्या गार्डास सांगितलें. गाडी अलाहाबाद येथें पोंचल्यावर तेथील रेल्वे आधिकाऱ्यांनाही विनंति केली. हें सामान हिमालयावर गिर्यारोहण करण्यास जाणाऱ्या पथकाचें आहे, व मुंबईच्या रेल्वे अधिकाऱ्यांची तें कलकत्ता मेलवर चढविण्यांत चूक झालेली आहे असें सांगितलें असतांही, तें सामान अलाहाबाद येथें उतरवून घेण्याचें रेल्वे आधिकाऱ्यांनीं नाकारलें. त्यांना आमचें म्हणणें पटवून देण्यास जास्त अवधि नव्हता. गाडी सुटण्याची वेळ झाल्यामुळें आम्हीं डब्यांत येऊन बसलों पुढें मोगल सराई स्टेशनवर उतरून तेथील स्टेशन मास्तर यांस सर्व हकीगत सांगितली. त्यांनीं सामान उतरवून घेऊन पहिल्या गाडीनें बनारस कँटला पाठविण्याचें कबूल केलें. या आश्वासनावर समाधान मानून, आपल्याकडून धांवपळ करून जेवढें करतां येईल तेवढें केलें असें मानून आम्हीं गाडी सुटण्यापूर्वीं डब्यांत येऊन हुश हुश करीत पुढील प्रवासाला सुरवात केली. आतां त्या

सामानाची व आमची गांठ काठमांडू येथें पडणार होती. गायतोंडे यांची त्या सामानाशीं गांठ पुन्हां बनारस येथें पडेल असें आम्हीं धरून चाललों. अपेक्षेप्रमाणें सर्व व्यवस्थित झालें, असें गायतोंडे काठमांडूला सर्व सामान घेऊन पोंचल्यावर आम्हांला कळलें. रेल्वे नोकरांच्या हलगर्जीपणामुळें म्हणा किंवा चुकीमुळें म्हणा, सामानाबद्दल तारा व टेलिफोन करण्यांत आमचें पन्नास–साठ रुपये खर्च झाले.

पटना येथें आम्हीं सकाळीं पोंहोचलों. तेथें जलान म्हणून एक सधन व खानदानी कुटुंब आहे. त्यांची नवनीत पारेख यांची ओळख होती. त्यांचेकडे आम्हीं उतरलों. जलान कुटुंबाचें पटना शहरांत "किला हाऊस" या नांवानें प्रसिद्ध असलेलें एक मोठें घर आहे. त्याच आवारांत गंगेच्या पात्राला लागून पाहुण्यांसाठीं एक अतिथि गृह बांधलेलें आहे. त्यांत आमचा मुक्काम होता. आम्ही वर्षा ऋतूंत पटन्यास गेलों होतों. पोंचण्याच्या आधींचें दोन तीन दिवस पाऊस खूप पडला होता. पुरामुळें गंगेचें आधींच मोठें असलेलें पात्र खूपच रुंदावलें होतें. अतिथि गृहांतील सज्जांतून पलिकडचा तीर चारपांच मैल दूर अंतरावर दिसत होता.

'किला हाऊस' म्हणजे एक प्रासादच आहे. आमचे यजमान श्री. हिरालाल यांचे वडील श्री. राधाकृष्ण जलान यांना कलाकुसरीच्या प्राचीन व ऐतिहासिक वस्तू जमविण्याचा शोक होता. ते आतां वृद्ध झालेले आहेत व हरिद्वार येथें राहतात, हिंदुस्थान व युरोपमध्यें प्रवास करून परिश्रमपूर्वक व खूप पैसा खर्चून त्यांनीं अनेक वस्तू जमा केलेल्या आहेत. त्यांच्या घरांतील तीन चार भव्य दालनें एखाद्या सुव्यवस्थित वस्तुसंग्रहालयासारखी आहेत. त्यांत तिबेट, चीन येथील जुन्या वस्तू, मोंगल बादशहांच्या अमदानींतील कांहीं दुर्मिळ वस्तू, युरोपमधील राजघराण्यांत वापरल्या गेलेल्या कांहीं ऐतिहासिक वस्तू खूप भरलेल्या आहेत, पटना येथें जाणारी प्रत्येक महत्वाची व्यक्ति जलान यांच्या वस्तुसंग्रहालयास भेट देऊन येतें.

श्री. हिरालाल जलान यांच्या उत्तम आतिथ्यामुळें पटना येथील आमचा एक दिवसाचा मुक्काम मजेंत गेला. तेथून निघण्यापूर्वी एक छोटीशी अडचण निर्माण झाली होती. नेपाळांत जाण्यासाठीं विमानांत बसण्यापूर्वी इन्कमटॅक्स क्लिअरन्स सर्टिफिकेट विमानतळाच्या अधिकाऱ्यांना दाखवावें लागतें. त्याची

आम्हांला कल्पना न आल्यामुळें आम्ही ते मुंबईहून आणण्याची व्यवस्था केलेली नव्हती. परंतु श्री. हिरालालजींच्या ओळखीमुळें तेथील इन्कमटॅक्स ऑफिसरांकडून तें सर्टिफिकिट लगेंच मिळालें. त्या दिवशीं पहाटें खूप पाऊस पडत होता. विमान निघेल किंवा नाहीं याची शंका वाटत होती. पण सकाळीं साडे आठ वाजतां हवा निवळली व आम्ही साडेनऊ वाजतां काठमांडूला जाण्यासाठीं कलकत्त्याहून आलेल्या विमानांत बसलो. निघण्यापूर्वी कस्टम अधिकाऱ्यांकडून आमच्या सामानाची तपासणी झाली.

विमानांतून दूरदूरचीं हिमशिखरें दिसलीं तर फोटो घ्यावेत असा आमचा विचार होता. परंतु त्या दिवशीं आकाश अभ्राच्छादित असल्यामुळें हिमावृत्त शिखरांचें दर्शन झालें नाहीं. आम्हांला त्याबद्दल फारसें वाईट वाटलें नाहीं, कारण हिमशिखरांचें दर्शनच काय त्यांचा चरणस्पर्श करण्यासाठीं आम्ही नेपाळांत जात होतो. पायलटनें आम्हांला कॉकपिटमध्यें येण्याची परवानगी दिल्यामुळें पायलटला जो पुढचा देखावा दिसतो तो आम्हांला पहायला मिळाला. डॅशबोर्डवर असणाऱ्या असंख्य घड्याळांपैकीं योग्य वेळीं योग्य त्या घड्याळाच्या कांट्याकडे त्यांचें कसें लक्ष जातें, याचें आश्चर्य वाटलें.

विमानांतून खालीं बिहारच्या सखल प्रदेशांत जिकडे तिकडे पाणीच पाणी दिसत होतें. शेतांतील घरें पाण्यावरच तरंगत आहेत कीं, काय असें वाटत होतें. रस्ते व पायवाटा पाण्यात बुडून गेलेल्या होत्या. जमिनीवरही पाणी असल्यामुळें नदीचें पात्र संपून किनारा कोठें सुरू होत होता तें कळत नव्हतें. विमानांतून एक तासभर आल्हादकारक प्रवास करून आम्ही काठमांडूला हिमालयाच्या अंगणांत जाऊन पोचलो. विमानांतून काठमांडूची नगरी, तिच्यांतील सुंदर देवालयें, शुभ्र वर्णाचे भव्य प्रासाद आणि हिरवी गार मैदानें नयन मनोहर व आकर्षक दिसत होती.

# काठमांडु येथें एक सप्ताह

## नेपाळच्या नवलकथा

काठमांडू येथील गोचर विमान तळावर आम्हांला उतरून घेण्यासाठीं भारतीय वकिलातीनें सुभेदार खत्री यांना पाठविलें होतें. त्यांची गांठ पडली तेव्हांपासून आम्हांला जाणीव झाली कीं, येथें आपण परदेशांत आहोत व या परदेशांत आपणांस मदत करण्यासाठीं आपल्या देशाची वकिलात आहे. भारताच्या बाहेर जाण्याचा हा माझा पाहिलाच प्रसंग. स्वतंत्र भारताचे नागरीक या नात्यानें नेपाळांत गेल्यावर भारताच्या वकिलातीकडून आम्हांला उत्तम पाठिंबा मिळाला. भारतीय वकिलास नेपाळमध्यें विशेष मान व महत्त्व असल्यामुळें त्यांनीं पुरस्कारिलेल्या आमच्या मोहिमेस नेपाळ सरकारकडून आस्थापूर्वक मदत मिळाली. नेपाळमध्यें सध्यां ब्रिटिश ॲम्बॅसडरचा दर्जा दुय्यम आहे. सर्वांत मह्त्त्वाची वकिलात भारताची आहे.

विमानतळावर नेपाळी कस्टम आधिकाऱ्यांनीं आमच्या सामानाची तपासणी केली, विमान तळ शहरापासून दोन अडीच मैल दूर आहे. आम्ही टॅक्सी करून शहरांत आलों. आमची उतरण्याची व्यवस्था गव्हर्मेंट गेस्ट हाऊसमध्यें केलेली होती. तें गेस्ट हाऊस डाकबंगल्याप्रमाणें आहे. तेथें चौकीदार, खानसामा व इतर नोकर आहेत. फर्निचर बेताबाताचेंच होतें. परंतु हॉटेलमध्यें उतरण्यापेक्षां हें स्वस्त व सोयीस्कर होतें. त्याच दिवशीं दुपारीं श्री. गोखले यांच्या खाजगी चिटणिसामार्फत आम्हां दोघांना भोजनाचें निमंत्रण आलें. श्री गोखले हे मोहन समशेर जंग बहादुर राणा यांच्या राजवाड्यांत राहातात. त्यांच्या निवासस्थानाचें नांव " शीतल निवास " असें आहे. काठमांडू येथें राणा लोकांचीं अनेक प्रासादतुल्य घरें आहेत. नेपाळ प्रजासत्ताक झाल्यापासून बरेंच राणा नेपाळ सोडून भारतांत व परदेशांत जाऊन राहिलेले आहेत. आम्ही रात्रीं जेवावयास गेलो असतां श्री. व सौ. गोखले यांजकडून नेपाळमधील परिस्थितीची व राणा लोकांची खूप मनोरंजक माहिती ऐकावयास मिळाली. श्री.

गोरखल्यांच्या बोलण्यांत विनोदाची छटा असल्यानें त्यांच्याकडून राणांच्या गोष्टी ऐकण्यांत गंमत वाटत होती.

नेपाळ प्रजासत्ताक होण्यापूर्वी तेथील राजसत्ता, नेपाळांत जीं वीस पचवीस राणा कुटुंबें होतीं त्यांच्या हातांत होती. त्यांतील सर्वांत मोठा राणा हा पंतप्रधान होत असे. तो वारल्यावर प्रधानपद त्याच्या मुलाकडे न जातां, राणांच्या कुलांतील मोठ्या माणसाकडे जात असें. त्यामुळें पंतप्रधान किंवा ज्याला 'महाराजा' म्हणत असत तो बहुतेक वयस्करच असायचा. असें सांगतात कीं राणा कुटुंबामध्यें कोणी मुलगा जन्माला आला कीं, जन्मापासूनच त्याला कर्नलचा दर्जा प्राप्त व्हायचा. तसेंच तेव्हांपासून कर्नलचा पगार चालू. पुढें वयांत आल्यावर त्याला वारसाहक्काप्रमाणें आपोआपच जनरलचा किताब प्राप्त होत असे. यां राणांमध्यें आपापसांत अविश्वास असे. पूर्वी आपल्या देशी संस्थानांतून ज्याप्रमाणें गादीवर हक्क असलेल्या लोकांचें जीवित धोक्यांत असे व त्यांना ज्याप्रमाणें विषप्रयोग अथवा अन्य रीतीनें मरण प्राप्त होण्याची भीति वाटत असे. तशीच परिस्थिती नेपाळमध्यें होती. विषप्रयोगाचे भीतीनें लग्न-समारंभास जेवणावळी न घालतां निमंत्रित राणांस प्रत्येकाच्या दर्जाप्रमाणें समारंभांतून जाण्याचें वेळीं नगद रक्कम हातावर ठेवण्यांत असे. त्या पैशानें त्या निमंत्रितानें आपल्या घरीं जाऊन मिष्टान्नाचें भोजन करावें.

नेपाळच्या प्रजेकडून पिळून काढलेल्या पैशांवर केवळ चैन करणें हाच राणा कुटुंबांतील बहुतेकांच्या आयुष्यांतील उद्योग होता. अखिल नेपाळ राज्य म्हणजे आपली खाजगी मालमत्ता आहे, अशा प्रकारें राणा लोक समजत होते व त्यानुसार वागत होते. जगांतील एकमेव स्वतंत्र हिंदु राज्याचे अधिपति म्हणून आपणांस राणांचा अभिमान वाटत होता. परंतु ते मात्र या अभिमानास पात्र नव्हते असें म्हणावयास हरकत नाहीं. अर्थात् राणा कुटुंबामध्येंही कांहीं लोक हितदक्ष व सुविचारी व्यक्ति होऊन गेल्या व अद्यापिहि आहेत. परंतु देशांतील अनियंत्रित राजसत्ता एकाच वंशांत दीर्घकाळपर्यंत टिकून राहिल्यामुळें इतर राजवंशाप्रमाणें राणा वंशांतही ख्यालीखुशाली वाढली होती. नेपाळमधील जन-तेंत प्रचार व जागृती होऊं नये म्हणून परदेशांतून नेपाळांत येणाऱ्या व्यक्तीवर कडक नजर असे. नेपाळमध्यें येण्याची परवानगी मिळणें दुरापास्त होते. भार-

तीयांस फक्त महाशिवरात्रीचे सुमारास पशुपतिनाथाचें दर्शनासाठी नेपाळांत येण्यास फक्त एक आठवडाभर मुक्तद्वार असे. परकियांनीं विशेषतः पाश्चात्त्यांनीं मोठ्या प्रमाणावर नेपाळांत येऊं नये म्हणून धूर्त राणांनीं काठमांडूला जाण्यास गाडीरस्ता न बनविण्याची काळजी घेतली होती. विमान वाहतूक सुरू होण्यापूर्वी काठमांडूला जाण्यास रक्सॉल भीमफेडीमार्गें चालत किंवा डोलींत बसून जाणें हा एकच मार्ग होता. काठमांडू शहरांत सत्तर ऐंशी मोटारी आहेत. त्यांत खाजगी टूरिंग गाड्या, जीप व लॉऱ्या अशा सर्व तऱ्हेच्या मोटारी आहेत. काठमांडूला मोटारी पाहिल्यावर पहिला विचार मनांत येतो कीं त्या तेथें कशा आणल्या असतील ! त्या सर्व मोटारी रक्सॉल भीमफेडी मार्गानें अक्षरशः मजुरांच्या खांद्यावर वाहून आणलेल्या आहेत. मोटारीचीं चाकें काढून मोटार जशीच्या तशी मोठ्या ओंड्यांना बांधायची व सत्तर ऐंशी मजुरांनीं ती उचलून घाटाच्या मार्गावरील वीस मैल अंतर तोडून ठाणकोटपर्यंत न्यायची. काठमांडूला येणारा सर्व माल मजुरांच्या पाठीवरून किंवा दोरावरील टोपल्यामधून ( रोप वेनें ) किंवा ( अलीकडे ) विमानांतून येतो. राणाशाही संपल्यावर प्रजासत्ताक नेपाळनें भारत सरकारच्या सहाय्यानें रक्सॉल ते काठमांडू रस्ता तयार करण्याचें काम सुरू केलें आहे. तो रस्ता नुकताच पुरा झाला आहे. तो रस्ता भारतीय फौजेच्या इंजिनीयर्सच्या दलानें बांधला असून त्याचा सर्व खर्च भारत सरकारनें सोसला आहे. या रस्त्यामुळें नेपाळ व भारत यांचे दळणवळण वाढेल व नेपाळची झपाट्यानें प्रगति होईल.

नेपाळ एक प्राचीन देश आहे. परंतु त्याचा प्राचीन इतिहास उपलब्ध नाहीं. गौतमबुद्ध नेपाळच्या सरहद्दीवरील लुम्बिनी या गांवीं इसवीसनाच्या चारशें पन्नास वर्षें आधीं जन्मला. त्याची राजधानी कपिलवस्तु नेपाळमध्येंच होती. इसवी सनापूर्वी अडीचशें वर्षांपूर्वी सम्राट अशोकानें नेपाळवर स्वारी केली होती. अशोकाचे प्रसिद्ध स्तंभ नेपाळांतही आढळतात. अशोकानें नेपाळला नमविल्यावर आपली ललितपाटण नांवाची मुलगी काठमांडूचे राजाला दिली होती. तिच्या नांवावरून काठमांडू जवळील एका शहरास ललितपूर अर्थात पाटण हें नांव पडलें असें म्हणतात. इसवी सन ६३७ मध्यें प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग नेपाळमध्यें जाऊन आलेला होता.



चर्णावती खोल्यावरील पुलावरून जातांना श्री. पारणकर



गांधी बंधू ओढ्याच्या पुलावरून जातांना

नेपाळमध्यें मूळ राहणारे लोक " नेवार " वंशाचे होते. ते लोक शिल्पकलेंत प्रवीण होते. नेवार राजांनीं बांधिलेले सुंदर राजवाडे अजूनही जीर्णावस्थेंत नेपाळांतील ललितपूर अर्थात् पाटण व भक्तपूर अर्थात् भडगांव या काठमांडूजवळच असलेल्या शहरांतून दिसतात. नेपाळमध्यें गुरखा लोकांचें वर्चस्व होण्यापूर्वी ठाकूर व मल्ल लोकांचे हातीं सत्ता होती. त्या राजाची लहान लहान स्वतंत्र राज्यें होतीं व त्यांच्या आपसांत लढाया होत असत. सन १७६७ मध्यें मध्य नेपाळांमधील गोरखा या गांवांत राहाणाऱ्या गुरखा लोकांनीं पृथ्वी नारायण सिंगच्या नेतृत्वाखालीं काठमांडू खोऱ्यांतील शहरावर चढाई केली; व राजा जयप्रकाश मल्ल याचें राज्यांस वेढा घातला. जयप्रकाश मल्लानें ब्रिटिशांची मदत मागितली. ब्रिटिशांनीं कॅप्टन किनलॉकच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यांस काठमांडूकडे पाठविलें. कॅप्टन किनलॉकनें पावसाळ्यांतच काठमांडूच्या प्रवासास प्रारंभ केला. त्यामुळें त्याच्या सैन्याचे फार हाल झाले. नेपाळच्या दक्षिणेकडील भागास तराई म्हणतात. तो प्रदेश जंगलमय व दलदलीचा असून तेथें मलेरियाचा प्रादुर्भाव आहे. किनलॉक व त्याच्या सैन्यांतील बरेचसे शिपाई या तराईमध्यें आजारी पडले. व त्यांना परतावें लागले. इकडे मदत न मिळाल्यामुळें जयप्रकाश मल्लाचा पाडाव झाला. व नेपाळमध्यें गुरख्यांची राजवट चालू झाली.

गुरखा ही रजपुतांसारखी एक लढावू जात आहे. नेवार राजांना कलाकौशल्याची जी आवड होती ती गुरख्यांना नव्हती. त्यामुळें गुरख्यांचें राज्य सुरुं झाल्यापासून शिल्पकलेचीं नवीं कामें झालीं नाहींत. नेपाळचें सुदैव एवढेंच कीं मुसलमानाप्रमाणें सुंदर मूर्ति व देवालयें तोडून टाकण्याची वृत्ति गुरखा लोकांत नव्हती. ज्या मुसलमान आक्रमकांनीं भारतांत घुसून, भारताच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत संचार करून प्राचीन भारतीय संस्कृति नष्ट केली. ते मुसलमान नेपाळच्या वाट्यास गेलें नाहींत ही नेपाळ देशाच्या केवढ्या भाग्याची गोष्ट! ज्यांनीं देश जिंकण्याच्या आणि धर्म प्रसार करण्याच्या हौसेनें दऱ्याखोरीं व घाट ओलांडून अखिल भारतांत आपलें वर्चस्व प्रस्थापित केलें, त्यांना नेपाळांतील सात हजार फूट उंचीचा घाट चढून काठमांडूच्या सुपीक खोऱ्यांत प्रवेश करणें

कठिण नव्हतें. परंतु कोणत्या कारणानें कुणाला माहित नेपाळच्या वाटेला ते गेले नाहींत.

नेपाळमधील प्राचीन संस्कृति, संस्कृतनिष्ठ गुरखाली भाषा, देवनागिरी लिपि, वगैरे गोष्टी पाहून हिंदु मनाला आनंद वाटतो. नेपाळमध्यें मुसलमानांची लोकसंख्या अगदींच कमी आहे. जे मुसलमान आहेत त्यांतील बहुतेक भारताच्या सरहद्दीला लागून असलेल्या तराई भागांत आहेत. मुसलमानांची संख्या अगदींच कमी असल्यामुळें नेपाळांत धार्मिक संघर्ष मुळींच नाहींत. नेपाळांत दोन मुख्य धर्म आहेत, हिंदु व बौद्ध. परंतु दोन्ही धर्मांचे अनुयायी एकमेकांशीं सुखानें नांदत आहेत. हिंदु धर्मीयांना शिवमार्गी व बौद्ध धर्मीयांना बौद्धमार्गी असें म्हणतात. कित्येक ठिकाणीं एकमेकांच्या चालीरीति त्यांनीं उचलल्या आहेत. हिंदु व बौद्ध देवालयांत बराच सारखेपणा आढळतो. कांहीं ठिकाणीं महादेवाच्या पिंडीच्या आकाराच्या पाषाणावर मध्यभागीं, कमलपुष्पावर बुद्धाची मूर्ति कोरलेली आढळते. नेपाळच्या तराईमध्यें व समुद्रसपाटीपासून आठ हजार फुटांपेक्षां कमी उंचीच्या भागांत हिंदु धर्मियांचें प्रमाण जास्त आहे. आठ हजार फुटांवर ज्या ठिकाणीं वस्ती आहे ती तिबेटच्या सरहद्दीजवळ आहे. तेथें बहुतेक बौद्ध धर्मियांचीच वस्ती आहे. त्यांचें गुम्बा ( मंदिरें ) त्यांतील बुद्ध व इतर देवांच्या मूर्ति, मूर्तीसमोर जळणारे दिवे व धूप, देवळांतील नाना प्रकारचीं वाद्यें, मूर्ती भोंवतालची आरास, हा थाट हिंदु देवळांसारखा आहे. त्यांच्या व हिंदु धर्मियांच्या चालीरितींत कांहीं फरक आहेत. नेपाळांतील बौद्धधर्मी लोकांना आपल्या गुम्बांत जातांना अंगावरील फाल्तु कपडे उतरून किंवा स्नान करून जाण्याची आवश्यकता वाटत नाहीं. देवाच्या मूर्ति सोनेरी रंग वगैरे देऊन अशा बनविलेल्या असतात कीं त्यांना स्नान घालण्याची सोय नसते.

काठमांडूचें खोरें सुमारें वीस मैल लांब व बारा मैल रुंद आहे. नेपाळमधील लोक काठमांडूच्या खोऱ्यास नेपाळ असें संबोधतात. आम्ही पूर्व नेपाळमध्यें सोलाखुंबू तालुक्यांत गेल्यावर वाटेंत भेटणारे लोक, " तुम्ही नेपाळांतून आला काय ? " असे विचारीत असत. किंवा आम्ही त्यांना, " तुम्ही नेपाळला जाऊन आला आहांत काय ? " असे विचारीत होतों. काठमांडू खोऱ्याच्या चारही बाजूंनीं डोंगर आहेत. ते सर्व समुद्रसपाटीपासून सहांसात हजार फुटांचेपेक्षां जास्त

उंचीचे आहेत. या खोऱ्यांत शिरण्याचे मार्ग चार खिंडींतून येतात. म्हणून काठमांडू खोऱ्यास नेपाळी भाषेत चार मन्जाङ् भित्र ( चार खिंडींमधील प्रदेश ) असें म्हणतात. काठमांडू शहराजवळ तीन नद्या वाहतात. त्यांचीं नावें बाग्मती, विष्णुमती, व रुद्रमती अशीं आहेत. पशुपतिनाथाच्या चरणाजवळून वाहणारी बाग्मती नदी अत्यंत पवित्र समजली जाते. तिला नेपाळांतील गंगा असें म्हणण्यास हरकत नाहीं.

गुरखा लोकांनीं नेपाळचें आधिपत्य पटकाविल्यावर जवळच असलेल्या सिक्कीम देशावर स्वारी केली. सन १७९० मध्यें त्यांनीं तिबेट देशावर चाल करून तिबेटांतील दिगर्चे येथील प्रसिद्ध मठ व गोम्पाची लुटालूट केली. त्यावर चिनी लोकांनीं प्रतिहल्ला करून गुरख्यांस मागें परतविलें, आणि त्यांना तह करण्यास भाग पाडिलें. काठमांडू येथील वस्तु संग्रहालयांत चिनी लोकांनीं वापरलेल्या कातड्यापासून बनविलेल्या तोफा पहावयास मिळतात.

गुरख्यांच्या अंमलांत नेपाळमध्यें शांतता नांदत नव्हती. राजाच्या नातलगांत गादी मिळविण्यासाठीं एकमेकाविरुद्ध कट चालत असत. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत–नेपाळांत बरेंच अत्याचार व कत्तली झाल्या. राणांचा मूळ पुरुष जंगबहादुर राणा यानें सन १८४५ मध्यें सत्ता आपल्या ताब्यांत घेऊन अंदाधुंदी बंद केली. सन १८४६ मध्यें त्यानें गुरखा राजवंशांतील सुरेंद्र विक्रमशहा यास गादीवर बसविलें. तेव्हांपासून नेपाळांतील राणाशाहीस प्रारंभ झाला. तेव्हांपासून राजसत्ता राजाचे हातीं न रहातां त्याच्या मुख्य प्रधानाच्या घराण्यांत वंशपरंपरा चालत राहिली. महाराष्ट्रीयांस ही गोष्ट नवलाची नाहीं. आपल्याकडे शाहूमहाराजाचे वेळेपासून राज्यांतील सर्व सत्ता मुख्य प्रधान पेशवे यांच्याकडे गेली व ती वंशपरंपरा त्यांचेकडे चालू राहिली. नेपाळांत राजाला महाराजधिराज व अधिकारावर असलेल्या राणास महाराजा ही पदवी असते. राणांच्या हातीं सत्ता आल्यावर त्यांनीं राजाचा प्रजेशीं संबंध शक्य तितका येणार नाहीं अशी खबरदारी घेतली. राजाला कोणाला भेटूं द्यायचें नाहीं. प्रसंग आलाच तर वर्षांतून एखादद्दुसऱ्या समारंभास, किंवा परेडला हजर राहून सलामी घेण्यापुरता. त्यनों पंतप्रधानाचे म्हणजे महाराजाचे परवानगी शिवाय आपल्या राजवाड्याबाहेर पडायचें नाहीं, किंवा कुणाला भेटायचें नाहीं. ब्रिटिश–रेसिडेंटची गांठ घेण्यास

सुद्धां त्याला मोकळीक नव्हती. त्यानें आपणांस विष्णूचा अवतार समजून कांहीं चळवळी न करतां आपल्या राजवाड्यांत राहून नेपाळचें राज्य भोगीत रहावें. अशाप्रकारें राजवाड्याच्या चार भिंतींत, प्रजेपासून दूर ठेविलें गेल्यामुळें नेपाळचे राजे दुबळे राहिले, सध्याचे राजे महाराजाधिराज त्रिभुवन वीर विक्रमशहा यांची हयात सुद्धां अशाचप्रकारें गेलेली आहे. त्यामुळें राणाशाहीच्या मगरमिठींतून मुक्त झाल्यावरही ते आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप लोकांवर पाडूं शकत नाहींत. ज्यांनीं प्रभावी राणाशाही अनुभविलेली आहे अशा नेपाळी प्रजेला, या दुबळ्या व निस्तेज राजाबद्दल एक प्रकारची निराशाच वाटते. राजे त्रिभुवन यांनीं एक गोष्ट धैर्याची व शिताफीची केली कीं तीन वर्षांमागें आपल्या राजवाड्याभोंवतीं राणांच्या सैनिकांचा पहारा असतांही ते राजवाड्यांतून बाहेर पडून भारतीय वकिलाच्या निवासस्थानीं आश्रयार्थ गेले. त्या एकाच घडामोडीमुळें आधींच हादरत असलेली नेपाळमधील राणाशाही जवळजवळ कोलमडून पडली. त्या वेळेस सुद्धां हिज हायनेस महाराजा मोहन समशेर जंगबहादूर राणा यांनीं सत्ता आपल्या ताब्यांत ठेविण्यासाठीं प्रयत्न करून पाहिले. राजे त्रिभुवनच्या नातवास गादीवर बसवून राज्याभिषेक केला. परंतु राजे त्रिभुवन यांनीं बलाढ्य भारत सरकारचा आश्रय केल्यामुळें व नेपाळला दुसरीकडून कुठूनही मदतीची आशा नसल्यामुळें राणाना नमतें घ्यावें लागलें. आणि राजे त्रिभुवन यांचे खरे राजे म्हणून पुनः स्वागत करावें लागलें. त्या वेळेच्या घडामोडी वृत्तपत्रांत वाचल्यामुळें वाचकांच्या ध्यानांत असतीलच. त्यामुळें त्या विस्तारानें येथें देण्याचें कारण नाहीं.

वृत्तपत्रांतील बातम्या मात्र अतिरंजित असतात. नेपाळमधील त्या वेळेच्या लोकांच्या चळवळीचें जें वृत्त येत होतें तें वाचून नेपाळमध्यें राणांच्या सरकार विरुद्ध लोकांनीं चोहोबाजूंनीं उठाव केला आहे, लोकांत जागृति निर्माण झाली आहे. राणांचें जोखड दूर लोटून देण्यासाठीं ते सांघिक प्रयत्न करीत आहेत. असा आपल्याला भास होत होता. परंतु वस्तुस्थिती अशी आहे कीं, नेपाळमध्यें जी कांहीं राजकीय जागृति व चळवळ जेव्हा झाली किंवा सध्यां होत आहे; ती काठमांडू, पाटण, बिराट नगर, बरिगंज अशा नेपाळमधील चार पांच शहरांतील मूठभर लोकांमध्येंच आहे. त्या लोकांना राजकारणाचें शिक्षण

भारतामध्यें मिळालेलें आहे. नेपाळमधील सुप्रसिद्ध कोइराला बंधु यांचें शिक्षण पटना येथें झालेलें आहे; व त्यांचे तेथें बरेच स्नेही संबंधी आहेत. हिमालयाच्या पृष्ठभागावर पांचशें मैल लांब व शंभर मैल रुंद पसरलेल्या नेपाळच्या राज्यांतील शेंकडा नव्वद टक्के लोकांना आपल्या राजकीय हक्कांची जाणीव नाहीं. किंवा त्याबद्दल कांहीं औत्सुक्य नाहीं. काठमांडू खोरें सोडून बाहेरच्या खेड्यांत गेले म्हणजे अशी स्थिती आढळतें कीं, तेथील लोकांच्या आपल्या स्वतःच्या व जवळपासच्या खेड्याखेरीज बाह्य जगाशीं कांहीं संबंध नाहीं. त्यांच्या दहावीस मैलांच्या टापू पलिकडे काय होत आहे, कुणाची सत्ता आहे याचें सोयरसुतक त्यांना नाहीं. सरकारचा व त्यांचा संबंध वर्षामध्यें एकदांच, धान्याचें रूपानें कर वसुली करतांना येतो. सरकारला त्यावेळेस त्यांची आठवण येते, व त्यांनाही त्यावेळेस सरकारची जाणीव होते. एरवीं त्यांचें जीवन निसर्गाच्या छत्राखालीं शांतपणें चालूं असतें.

सध्यां नेपाळमध्यें म्हणजे विशेषतः नेपाळच्या शहरामध्यें एक प्रकारची राजकीय पोकळी निर्माण झालेली आहे. राणा लोकांनीं नेपाळवर आपली सत्ता एक शतकभर गाजविली, त्या काळांत लोकांना कुठल्याही प्रकारचे हक्क नव्हते. एवढेंच नव्हे तर आपल्यावर महाराजाची वक्रदृष्टि होऊं नये अशी खबरदारी लोकांना घ्यावी लागत होती. परंतु राणाशाही नेपाळांत एक शतकभर पूर्ण शांतता नांदली, हा त्या देशाचा मोठा फायदा झाला. राणाचें राज्य म्हणजे लष्करी राज्य होतें. त्याचे कांहीं अवशेष राणाशाही संपली तरी अजून दिसून येतात. काठमांडू शहरांत राणांच्यावेळीं असलेली कर्फ्यूची पद्धत अजूनही चालू आहे. पूर्वी रात्रीं नऊ वाजण्याचे पुढें पोलीसचे परवानगीशिवाय रस्त्यावरून हिंडण्याची मनाई होती. असा एकादा हिंडणारा आढळला तर गस्तीवरचा किंवा चौकीवरील पोलीस त्याला पासवर्ड म्हणजे परवलीचा शब्द विचारी. तो सांगतां आला नाहीं तर त्याला ती रात्र पोलीस चौकीवर काढावी लागून सकाळीं चौकशी झाल्यावर त्याची सुटका होत असे. अद्यापसुद्धां रात्रीं अकराचे पुढें पासवर्ड माहीत असल्याशिवाय रस्त्यावरून कुणाला हिंडता येत नाहीं. आमच्या काठमांडूच्या मुक्कामांत श्री. गोखले यांनीं दिलेल्या मोठ्या मेजवानीस आम्ही पांच जण उपस्थित होतो. मेजवानीनंतर गप्पा रंगल्यामुळें परत निघ-

सुद्धां त्याला मोकळीक नव्हती. त्यानें आपणांस विष्णूचा अवतार समजून कांहीं चळवळी न करतां आपल्या राजवाड्यांत राहून नेपाळचें राज्य भोगीत रहावें. अशाप्रकारें राजवाड्याच्या चार भिंतींत, प्रजेपासून दूर ठेविलें गेल्यामुळें नेपाळचे राजे दुबळे राहिले, सध्याचे राजे महाराजाधिराज त्रिभुवन वीर विक्रमशहा यांची हयात सुद्धां अशाचप्रकारें गेलेली आहे. त्यामुळें राणाशाहीच्या मगरमिठींतून मुक्त झाल्यावरही ते आपल्या व्यक्तिमत्त्वाची छाप लोकांवर पाडूं शकत नाहींत. ज्यांनीं प्रभावी राणाशाही अनुभविलेली आहे अशा नेपाळी प्रजेला, या दुबळ्या व निस्तेज राजाबद्दल एक प्रकारची निराशाच वाटते. राजे त्रिभुवन यांनीं एक गोष्ट धैर्याची व शिताफीची केली कीं तीन वर्षांमागें आपल्या राजवाड्याभोंवतीं राणांच्या सैनिकांचा पहारा असतांही ते राजवाड्यांतून बाहेर पडून भारतीय वकिलाच्या निवासस्थानीं आश्रयार्थ गेले. त्या एकाच घडामोडीमुळें आधींच हादरत असलेली नेपाळमधील राणाशाही जवळजवळ कोलमडून पडली. त्या वेळेस सुद्धां हिज हायनेस महाराजा मोहन समशेर जंगबहादूर राणा यांनीं सत्ता आपल्या ताब्यांत ठेविण्यासाठीं प्रयत्न करून पाहिले. राजे त्रिभुवनच्या नातवास गादीवर बसवून राज्याभिषेक केला. परंतु राजे त्रिभुवन यांनीं बलाढ्य भारत सरकारचा आश्रय केल्यामुळें व नेपाळला दुसरीकडून कुठूनही मदतीची आशा नसल्यामुळें राणाना नमतें घ्यावें लागलें, आणि राजे त्रिभुवन यांचे खरे राजे म्हणून पुनः स्वागत करावें लागलें, त्या वेळेच्या घडामोडी वृत्तपत्रात वाचल्यामुळें वाचकांच्या ध्यानांत असतीलच. त्यामुळें त्या विस्तारानें येथें देण्याचें कारण नाहीं.

वृत्तपत्रांतील बातम्या मात्र अतिरंजित असतात. नेपाळमधील त्या वेळेच्या लोकांच्या चळवळीचें जें वृत्त येत होतें तें वाचून नेपाळमध्यें राणांच्या सरकार विरुद्ध लोकांनीं चोहोबाजूंनीं उठाव केला आहे, लोकांत जागृति निर्माण झाली आहे. राणांचें जोखड दूर लोटून देण्यासाठीं ते सांघिक प्रयत्न करीत आहेत. असा आपल्याला भास होत होता. परंतु वस्तुस्थिती अशी आहे कीं, नेपाळमध्यें जी कांहीं राजकीय जागृति व चळवळ जेव्हा झाली किंवा सध्यां होत आहे; ती काठमांडू, पाटण, बिराट नगर, बरिगंज अशा नेपाळमधील चार पांच शहरांतील मूठभर लोकांमध्येंच आहे. त्या लोकांना राजकारणाचें शिक्षण

भारतामध्यें मिळालेलें आहे. नेपाळमधील सुप्रसिद्ध कोइराला बंधु यांचें शिक्षण पटना येथें झालेलें आहे; व त्यांचे तेथें बरेच स्नेही संबंधी आहेत. हिमालयाच्या पृष्ठभागावर पांचशें मैल लांब व शंभर मैल रुंद पसरलेल्या नेपाळच्या राज्यांतील शेंकडा नव्वद टक्के लोकांना आपल्या राजकीय हक्कांची जाणीव नाहीं. किंवा त्याबद्दल कांहीं औत्सुक्य नाहीं. काठमांडू खोरें सोडून बाहेरच्या खेड्यांत गेले म्हणजे अशी स्थिती आढळतें कीं, तेथील लोकांच्या आपल्या स्वतःच्या व जवळपासच्या खेड्याखेरीज बाह्य जगाशीं कांहीं संबंध नाहीं. त्यांच्या दहावीस मैलांच्या टापू पलिकडे काय होत आहे, कुणाची सत्ता आहे याचें सोयरसुतक त्यांना नाहीं. सरकारचा व त्यांचा संबंध वर्षामध्यें एकदांच, धान्याचें रूपानें कर वसुली करतांना येतो. सरकारला त्यावेळेस त्यांची आठवण येते, व त्यांनाही त्यावेळेस सरकारची जाणीव होते. एरवीं त्यांचें जीवन निसर्गाच्या छत्राखालीं शांतपणें चालूं असतें.

सध्यां नेपाळमध्यें म्हणजे विशेषतः नेपाळच्या शहरामध्यें एक प्रकारची राजकीय पोकळी निर्माण झालेली आहे. राणा लोकांनीं नेपाळवर आपली सत्ता एक शतकभर गाजविली, त्या काळांत लोकांना कुठल्याही प्रकारचे हक्क नव्हते. एवढेंच नव्हे तर आपल्यावर महाराजाची वक्रदृष्टि होऊं नये अशी खबरदारी लोकांना घ्यावी लागत होती. परंतु राणाशाही नेपाळांत एक शतकभर पूर्ण शांतता नांदली, हा त्या देशाचा मोठा फायदा झाला. राणाचें राज्य म्हणजे लष्करी राज्य होतें. त्याचे कांहीं अवशेष राणाशाही संपली तरी अजून दिसून येतात. काठमांडू शहरांत राणांच्यावेळीं असलेली कर्फ्यूची पद्धत अजूनही चालू आहे. पूर्वी रात्रीं नऊ वाजण्याचे पुढें पोलीसचे परवानगीशिवाय रस्त्यावरून हिंडण्याची मनाई होती. असा एकादा हिंडणारा आढळला तर गस्तीवरचा किंवा चौकीवरील पोलीस त्याला पासवर्ड म्हणजे परवलीचा शब्द विचारी. तो सांगतां आला नाहीं तर त्याला ती रात्र पोलीस चौकीवर काढावी लागून सकाळीं चौकशी झाल्यावर त्याची सुटका होत असे. अद्यापसुद्धां रात्रीं अकराचे पुढें पासवर्ड माहीत असल्याशिवाय रस्त्यावरून कुणाला हिंडता येत नाहीं. आमच्या काठमांडूच्या मुक्कामांत श्री. गोखले यांनीं दिलेल्या मोठ्या मेजवानीस आम्ही पांच जण उपस्थित होतो. मेजवानीनंतर गप्पा रंगल्यामुळें परत निघ-

ण्यास रात्रीचे अकरा वाजून गेले होते. तेव्हां तेथें असलेल्या पाहुण्यांना पासवर्ड सांगण्यांत आला. तेथून परत येतांना जेथें जेथें पोलीस भेटला तेथें तेथें त्यानें आमची जीप गाडी थांबविली. पासवर्ड सांगितल्यावर सलाम करून आम्हांला पुढें जाऊं दिलें. त्या दिवशींचा पासवर्ड 'इतपत' असा होता. मराठी भाषेंत त्याचा अर्थ 'झटपट' असा होतो.

राणांच्या लष्करी राज्यांत नेपाळच्या इतर भागांतून काठमांडूचें खोऱ्यांत येणाऱ्या प्रत्येकाची कसून विचारपूस होत असे. विशेषतः तो मनुष्य खेडूत नसून सुशिक्षित असला तर काठमांडूला जाण्याचा उद्देश खोदखोदून विचारल्याशिवाय त्याला काठमांडूकडे जाऊच देत नसत. अद्यापहि काठमांडूच्या खोऱ्यांतून नेपाळच्या अंतर्भागांत जातांना खोऱ्याच्या टोकाच्या गांवीं सरकारच्या परवान्याबद्दल चौकशी करतात. आम्ही काठमांडूहून नामचेबझारला जायला निघणार होतो, त्याचे आदले दिवशींच आमचें सर्व सामान भारवाहकांबरोबर पहिल्या मुक्कामाचें गांवीं बनेपा येथें पाठवून दिलें होतें. कारण आम्ही पहिल्या मजलीचें सोळा मैलांचें अंतर जीपमध्यें बसून काटणार होतो. पाठवून दिलेल्या सामानांत नेपाळ सरकारनें आम्हांला दिलेला परवानाही होता. शेवटच्या दिवशीं भारतीय वकिलातींत गेलों असतांना आम्हांला कळलें कीं, काठमांडू खोऱ्यांतून बाहेर पडतांना आमचा परवाना पहावयास मागतील. ती एक अडचण निर्माण झाली. परंतु श्री. गोखले यांनीं ताबडतोब आपल्या फर्स्ट सेक्रेटरीला सांगून वकिलातीतर्फें आम्हांला एक परिचयपत्र देण्याची व्यवस्था केली.

राणाशाहीमध्यें लोकांना एवढी जरब होती कीं, राणाखेरीज इतर सधन मनुष्यास उत्तम पोशाख करून काठमांडूचे रस्त्यावरून जाण्याची भीति वाटे. न जाणो आपल्याजवळ खूप संपत्ति आहे, अशी समजूत होऊन कुठली तरी सबब काढून त्या संपत्तीचें राणांकडून अपहरण व्हायचें. काठमांडू खोऱ्यामध्यें मोटारखेरीज दुसरें वहान दिसत नाहीं. आशिया खंडांतील दोन तीन लाख वस्तीच्या या शहरांत मोटार व सायकल या खेरीज दुसरें वहान दिसत नाहीं. ही नवलाची गोष्ट नव्हे कां? त्याला कारण असें सांगतात कीं काठमांडूमध्यें मध्यमवर्ग जवळजवळ नाहींच. एका बाजूला संपत्तींत लोळणारे राणा लोक, दुसऱ्या बाजूला मोलमजूरी किंवा किरकोळ व्यापारधंदा करणारी प्रजा. राणा

लोकांसाठीं स्वतःच्या किंवा भाड्याच्या मोटारी होत्या. इतर सर्व जनतेस दोन पायांचे हुकमी वाहन उपलब्ध होतें. मग टांग्याची जरुर काय? काठमांडूस बैलगाड्या दिसत नाहींत याचें कारण मात्र वेगळें आहे. काठमांडु खोऱ्यांत हिंदु धर्मियांची वस्ती अधिक आहे. त्या सर्वांचें अधिदैवत पशुपतिनाथ हें होय. पशुपतिनाथ महादेव यांचें वाहन नंदी म्हणून जेथपर्यंत पशुपतिनाथाच्या मंदिराचा कळस दिसतो तेथपर्यंत बैलास कामास लावावयाचें नाहीं; अशी रुढी नेपाळी लोकांत पडलेली आहे. काठमांडूचें खोऱ्यांत शेतांतील नांगरांना किंवा बैल गाडीला बैल जुंपत नाहींत. नेपाळी लोकांना याची कांहींच अडचण वाटत नाहीं. कारण मोठमोठीं ओझीं माणसांनीं आपल्या पाठीवर वाहून नेणें त्यांना सहाजिक वाटतें. त्यांत मनुष्य बळाचा अपव्यय होत आहे असें त्यांना वाटत नसेल किंवा रुढीमुळें त्याला इलाज नाहीं; असें म्हणून तें स्वस्थ बसत असतील एवढें मात्र खरें, कीं पाठीवर वजनदार सामान वाहून नेण्याच्या बाबतींत नेपाळी लोक कुणाला हार जाणार नाहींत.

नेपाळमध्यें राणांचें राज्य प्रस्थापित करणारा पहिला राणा जंगबहादुर यानें सन १८४६ ते १८७७ पर्यंत नेपाळवर राज्य केलें. सन १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाचेवेळीं त्यानें ब्रिटिश सरकारला बहुमोल मदत केली. त्यावर खूष होऊन ब्रिटिश सरकारनें नेपाळचा तराईमधील प्रदेश जो सन १८१४ चे युद्धांत जिंकून घेतला होता, तो परत दिला. राणांचें राज्यांत नेपाळमधील मोठे अधिकारी राणा कुटुंबांपैकींच असत. भावी महाराजा बहुतेक सेनापति पदावर असे. या राणांचें नांव एकेरीच असतें. पण सर्व पदव्यांच्या ओळींत तें बसवलें म्हणजे मोठें भव्य दिसतें. उदाहरणार्थ सध्यांच्या सेनापतीचें नांव किरण असें आहे, पण त्यांना जनरल किरण समशेरजंग बहादुर राणा असें म्हणतात. काठमांडु शहर समुद्रसपाटीपासून पांच हजार फूट उंचीवर आहे. त्यामुळें तेथील हवा उत्तम आहे हें सांगावयास नकोच. आकाश निरभ्र असलें म्हणजे तेथून उत्तर दिशेस हिमाच्छादित शिखरें दिसतात. आम्ही काठमाडूस गेलों तेव्हां पावसाळा संपायच्या बेताला आल्यामुळें मधून मधून ढग विखुरलें कीं हिम-शिखरांचें मनोहर दर्शन होई.

नेपाळमध्यें मुख्य भाषा नेपाळी आहे. एका जिल्ह्यांतून दुसऱ्या जिल्ह्यांत गेलें कीं बोलींत फरक आढळतो. शुद्ध नेपाळी हिंदीच्या जवळची वाटतें. ती आपल्याला थोडीफार समजूं शकतें. परंतु काठमांडू सोडून आंतल्या भागांत गेले म्हणजे तेथील लोकांशीं संभाषण करणें कठीण होत जातें. नेपाळमध्यें मगर, गुरूंग, गुरखा, नेवार, तत्रंग, भोतिया व शेर्पा या जातीचे लोक आहेत. नेपाळचा स्टँडर्ड टाइम आपल्यापेक्षां निराळा आहे. तेथील घड्याळें आपल्यापेक्षां सुमारें आठ मिनिटें पुढें असतात.

काठमांडूच्या मुक्कामांत आम्हांला मुख्यत्वेंकरून तीन गोष्टी करायच्या होत्या. प्रेक्षणीय स्थळें पहायची, आमच्या परिभ्रमणासाठीं लागणारी साधनसामुग्री जमवावयाची व भारवाहकांची व्यवस्था करायची. नवनीत पारेख व रूसी गांधी प्रेक्षणीय स्थळें बघतांना सिनेकॅमेऱ्यानें फिल्म घेत असत. मीही माझ्या कॅमेऱ्यानें फोटो काढीत असे. सिनेकॅमेरा, स्टँड वगैरे सर्व साहित्य घेऊन आम्ही शहरांतील मंदिराचे फोटो व फिल्म काढूं लागलों म्हणजे आमचे भोंवतीं लोकांची गर्दी गोळा होत असे. व एखादी फिल्म कंपनी शूटिंग करीत आहे कीं काय असा भास होत असे. काठमांडू येथें श्री. जोशी नांवाच्या नेवारी गृहस्थाशीं आमचा परिचय झाला. त्यांनीं आमच्या मुक्कामांत दुभाषा व मार्गदर्शक या दुहेरी भूमिकेंत चांगली मदत केली. एखाद्या मंदिराची चांगल्या बाजूनें सिनेफिल्म घेण्यासाठीं मंदिराच्या आसपासच्या घराच्या वरच्या मजल्यावर जावेसें नवनीतना वाटे. कित्येक वेळां कामधंदा करणाऱ्या, भाजी किंवा फळें विकणाऱ्या नेपाळी पेहेरावांतील स्त्री पुरुषांची फिल्म काढावीशी वाटे. अशावेळीं तद्देशीय लोकांशीं त्यांच्या भाषेंत बोलून आमचा आशय त्यांना समजावून देण्याचें काम श्री. जोशी उत्साहानें करीत.

काठमांडूला पोंचल्यावर दुसऱ्या दिवशीं आम्ही चान्सरी–म्हणजे एम्बॅसीच्या ऑफिसांत जाऊन तेथील अधिकाऱ्याला भेटून आम्हांला काय काय मदत हवी आहे तें सांगितलें. त्यांच्याशीं आमचा पत्रव्यवहार झालेला होताच. नंतर आम्ही प्रेक्षणीय स्थळें पहाण्यास सुरवात केली. खुष्कीच्या मार्गानें येणारे आमचे साथीदार गायतोंडे व होमी गांधी व आमच्या मागून तीन दिवसांनीं

मुंबईहून निघून पटना येथून विमानमार्गें येणारे रूसी गांधी हे येऊन पोंचल्यावर परत तीं स्थळें पाहण्यास जावें लागणार होतेंच. पण सिनेफिल्म घेण्यास बराच वेळ लागत असल्यामुळें व कित्येक वेळां फिल्म घेण्यासाठीं सूर्य-प्रकाश योग्य बाजूनें मिळत नसल्यामुळें आम्ही कांहीं ठिकाणीं दोनदां गेलों. एक जीप भाड्यानें घेतली. त्या जीपचें भाडें दिवसांस पंधरा रुपये द्यावें लागत होतें. त्याशिवाय पेट्रोल आमचेंच. परंतु ते पंधरा रुपये आपल्या नाण्यांत नसून नेपाळी नाण्यांत होतें. नेपाळांत नेपाळी नाणें चालतें. म्हणून आपल्या जवळचें पैसे बदलून घ्यावें लागतात. बाजारांत भारतीय नेपाळी चलनांचा हुंडवणाळीचा भाव, मागणी व पुरवठा यावर अवलंबून असल्यामुळें सारखा बदलत असतो. साधारणपणें तो शंभर भारतीय रुपयांस दीडशें नेपाळी रुपये याच्याजवळ असतो. आम्हांला शंभर भारतीय रुपयांस एके दिवशीं १५९ नेपाळी रुपये मिळाले तर दुसरे दिवशीं १५७ च मिळाले. नेपाळी चलनांत पांच, दहा, व शंभराच्या नोटा आहेत. परंतु त्या जीर्ण व कधीं कधीं फाटक्या मिळतात. काठ-मांडू खोरें सोडून डोंगराळ भागांत गेल्यावर तेथील लोक नोट घेण्यास अत्यंत नाखूष असतात. असें दिसून आलें. भारवाहकांना देण्यासाठीं आम्ही हजार रुपये नगद नाण्यांत व बाकीचे दोन तीन हजार रुपये नोटांमध्यें बदलून घेतलें होतें. हे पैसे एका कुलूप लावलेल्या ट्रंकेंत ठेवलेले होते. व ती ट्रंक एका भारवाह-काच्या डोक्यावर असे. आमच्या पथकाच्या खाजिनदाराचें काम माझ्याकडेच होतें. म्हणून दररोज मुक्कामावर पोंचल्यावर ती ट्रंक मी माझ्या बिछान्याशेजारीं ठेवून घेत असे. सर्व ट्रंकांना नंबर दिले होते, त्या ट्रंकेचा नंबर सात होता. कुठेंही मुक्कामावर पोंचल्यावर सामान आलें कीं आधीं सात नंबरच्या पेटीची चौकशी करून तिचीं कुलपें ठीक आहेत कीं नाहीं तें मी पहात असें.

## प्रेक्षणीय स्थळें

काठमांडूचें पूर्वीचें नांव कांतिपूर होय. त्याला लागूनच देवपाटण व पाटण अर्थात् ललितपूर ही दोन शहरें आहेत. काठमांडूजवळ कांहीं मैलांवर भडगांव अर्थात् भक्तिपूर, कीर्तिपूर हीं गांवें आहेत. या सर्व गांवांत सुंदर बांधणीचीं जुनीं मंदिरें व राजवाडे आहेत. सुप्रसिद्ध पशुपतिनाथाचें मंदिर देवपाटणमध्यें आहे. हें

शंकराचें देवस्थान आपल्याकडे पाशुपतेश्वर या नांवानेंही प्रसिद्ध आहे. हें मंदिर बाग्मतीच्या कांठावर आहे. देवळाच्या जवळपास देवालयाच्या मालकीची खूप जागा आहे. त्यांत राणांनीं बांधलेली महादेवाची लहान लहान मंदिरें आहेत. बाग्मतीच्या दुसऱ्या तीरावर गुह्येश्वरीचें मंदिर आहे. बाग्मतीला दोन्ही बाजूंनीं घाट बांधिलेला आहे. बाग्मतीच्या तीरावर प्राण सोडल्यानें मोक्ष मिळतो. अशी समजूत असल्यामुळें कांहीं नेपाळी लोक आपल्या आजारी व मरणोन्मुख नातलगास तेथें घेऊन जातात.

पशुपतिनाथाच्या मंदिराच्या गाभाऱ्यांत चारही बाजूंनें दरवाजे आहेत. गाभाऱ्यामध्यें पुजाऱ्याशिवाय कोणालाही जाऊं देत नाहींत. तेथील सव पुजारी दाक्षिणात्य आहेत. त्यापैकीं श्री. गुर्जर व श्री. बावडेकर असे दोघे महाराष्ट्रीय आहेत. या क्षेत्रांतील सर्व पुजारी दाक्षिणात्य कसे अशी चौकशी करतां कळलें कीं, मंदिराचे पुजारी विंध्य पर्वताच्या खालील प्रांतांतील असावेत अशी प्रथा आहे.

हें पुजारीपण वंशपरंपरा नाहीं. ज्याची निवड झाली त्याच्या हयातीपर्यंतच तें असतें. त्याच्यानंतर दक्षिणेंतून निवड करून दुसरा पुजारी आणतात. नेपाळांतील शिवमार्गीयांचे हें सर्वांत मोठें देवस्थान असल्यामुळें येथें भाविकांची नेहमीं गर्दी असते. देवाचे आवारांत पाषाणाचा मोठा नंदी आहे. त्यावर सोन्याचें पाणी दिलेला पत्रा मढविलेला आहे. ती नंदीची भव्य मूर्ति सुंदर दिसतें. मंदिराचें आवारांत फोटो घेण्याची परवानगी नसल्यामुळें त्या मूर्तीचा फोटो घेतां आला नाहीं.

पशुपतीच्या पुढें एक मैलावर बोधनाथाचें मंदिर आहे. नेपाळांतील दूरदूरचे भागांतून, बौद्धमार्गी लोक याचें दर्शनास येतात. येथें शंभर फूट व्यासाचा मोठा स्तूप आहे. स्तूपाचेवर चौथऱ्यावर सोनेरी रंगाचा कळस असून चौथऱ्याचे चारी बाजूवर दोन दोन मोठे डोळे काढलेले आहेत. नाकाच्या जागीं मोठें प्रश्नचिन्ह काढलेलें आहे. हें डोळे नेपाळांतील बहुतेक स्तूपांवर काढलेलें आढळतात. आपण कुठलेंही बरेंवाईट कृत्य करीत असतांना बुद्ध देवाची आपल्यावर नजर असतें, हें मनांवर ठसविण्याचें काम स्तूपावर काढलेल्या या डोळ्यांनीं होतें.

आपणांकडे टक लावून पाहणारे हे मोठे डोळे पाहून एका अमेरिकन ग्रंथकारानें नेपाळवरील आपल्या पुस्तकास LAND OF THE EYE असें नांव दिलें आहे. स्तूपाच्या भोंवतीं गोल भिंत असून त्या भिंतीवर "ओम माणि पद्मे हुं" हा पवित्र बौद्ध मंत्र कोरलेली तांब्याची प्रार्थना चक्रें हारीनें लावलेलीं आहेत. यात्रेकरूनें प्रदक्षिणा करतांना ती उजव्या हातानें फिरवीत जायचें असतें. या गोल भिंतीच्या बाहेरचे बाजूस आवार असून त्या भोंवतीं वर्तुळाच्या परिघावर बौद्ध मार्गीयांचीं घरें आहेत. सकाळीं किंवा सायंकाळीं, सूर्याच्या सोनेरी किरणांत बौद्धनाथाचा स्तूप सुंदर दिसतो.

बौद्ध मार्गीयांचें दुसरें पवित्र देवस्थान म्हणजे स्वयंभूनाथ हें होय. येथेंही बोधनाथसारखा पण लहान आकाराचा स्तूप आहे. हें देवस्थान पुण्याच्या चतुःशृंगीएवढ्या उंचीवरील टेकडीवर आहे. टेकडीवर जाण्यासाठीं प्रशस्त पायऱ्या बांधलेल्या आहेत. ही टेकडी काठमांडूच्या पश्चिमेस तीन मैलावर आहे. येथून काठमांडू शहराचें विहंगम दृश्य दिसतें. स्तूपाजवळच कांहीं लहान देवळें आहेत. येथें आम्हांस शंकराचे पिंडीचे आकाराचे पाषाणावर, कमलावर बसलेल्या बुद्धाच्या मूर्ति कोरलेल्या आढळून आल्या.

काठमांडूच्या उत्तरेस सुमारें पांच मैलांवर बुढा नीलकंठ हें स्थान आहे. येथें एक मोठें कुंड असून त्यांत शेषनागाच्या वेटोळ्यांनीं बनविलेल्या मृदु शय्येवर निद्रिस्त अशी श्री विष्णूची भव्य आणि सुंदर पाषाणमूर्ति आहे. मूर्तीच्या आजूबाजूला पाणी आहे. एका बाजूनें ओटा बांधलेला असल्यामुळें मूर्तीच्या चरणाशीं जाऊन दर्शन घेतां येतें. ही मूर्ति शेषशायी भगवानाची असून त्याला बुढा नीलकंठ असें नांव पडलें आहे, ही गोष्ट विचित्र वाटते.

काठमांडूपासून दोन मैलांवर बालाजू नांवाचें दुसरें एक स्थान आहे. तेथें बुढा नीलकंठ येथील मूर्तीप्रमाणेंच पण त्यापेक्षां लहान आकाराची पाण्यांतील शेषशायी भगवानाची मूर्ति आहे. नेपाळचे राजानें बुढा नीलकंठाचें दर्शन न घेतां बालाजू येथील मूर्तीचें दर्शन घ्यायचें, अशी प्रथा आहे.

बालाजू जवळच बाईसधारा नांवाचें एक रमणीय स्थळ आहे. येथें स्वच्छ पाण्याची दोन तीन मोठीं कुंडें आहेत. त्यांत मोठे मासे आहेत. त्या कुंडाचे

खालचे बाजूस मोठी भिंत असून तेथून सुमारें बावीस जलधारा पडतात. आजूबाजूला असलेल्या भव्य वृक्षांनीं व जमिनीवरील हिरव्या गवतानें या स्थळाची शोभा वाढविली आहे.

काठमांडू शहरांत गजबजलेला इंद्रचौक, हनुमान ढोका ( दरवाजा ) काप- डाचीं दुकानें व मुख्य बाजार पेठ असलेली जुद्ध सडक, टूडीखेल, नांवाचें मोठें परेडचें मैदान, भीमसेन टॉवर उर्फ दरारा नांवाचा दोनशें फूट उंचीचा मनोरा, नेपाळच्या राणांची कुलस्वामिनी तुळजादेवीचें तळेनु नांवानें प्रसिद्ध अस- लेलें मंदिर, अन्नपूर्णा देवीचें मंदिर, हनुमान चौकांतील काळभैरवाची भयंकर दिसणारी प्रचंड मूर्ति, पूर्वी जेथें नेपाळच्या महाराजांचें निवासस्थान होतें व आतां जेथें सचिवालय आहे, तो सिंध दरबार या नांवानें ओळखला जाणारा भव्य प्रासाद, त्याजवळ असलेली गॅलरी बैठक, वस्तु संग्रहालय इत्यादि अनेक प्रेक्षणीय स्थळें आहेत. तीं पाहण्यांत आमचे काठमांडू येथील दिवस भराभर निघून गेले.

काठमांडूला जोडूनच दोन मैलावरच ललितपूर अर्थात् पाटण हें शहर आहे. येथें पूर्वी नेवार राजांची राजधानी होती. येथें अनेक हिंदु व बौद्ध मंदिरें व जुने राजवाडे आहेत. त्यांपैकीं कांहीं राजवाडे आतां मोडकळीस आलेले आहेत. या देवळाचे आकार व दगडावरील नेवारी पद्धतीचे शिल्पकाम आणि लांकडावरील कोरीव काम सुंदर आहे. देवळासमोर मोठ्या व उंच दगडी खांबांवर सोनेरी पत्र्यानें मढवलेल्या गरुड व इतर देवतांच्या रेखीव व बांधेसूद मूर्ति दिसून येतात. कांहीं ठिकाणीं अशाच स्तंभावर नेवारी राजांचे पुतळे आहेत, येथील कृष्णमंदिर, महाबोध व मत्स्येंद्रनाथ हीं मंदिरें प्रसिद्ध आहेत.

काठमांडूपासून सुमारें सात मैलावर भक्तिपूर अर्थात् भडगांव हें शहर आहे. येथेंहि पाटणप्रमाणेंच मंदिरें व राजवाडे आहेत. येथील दत्तात्रेय व सिद्धलक्ष्मी हीं देवळें प्रसिद्ध आहेत. दत्तात्रेयाच्या देवालयापाशीं द्वारपाळांच्या खूप मोठ्या पाषाणाच्या मूर्ति आहेत. दुसरे एके ठिकाणीं वीस फूट उंचीच्या स्तंभावर नेवार राजा भूपतींद्र मल्लचा सुंदर पुतळा आहे. भडगांव शहराचे जवळच सिद्धपोखरी नांवाचा तलाव आहे.

काठमांडू , पाटण व भडगांव या तीन शहरांत नेपाळचें वैभव पहायला सांपडतें. दिल्ली आग्र्याकडील मुसलमानी अमदानींतील ठराविक आकाराच्या इमारती आणि दक्षिण हिंदुस्थानांतील भव्य देवालयें पाहून ज्यांना कंटाळा आला असेल त्यांना काठमांडूंत अगदीं वेगळ्या प्रकारची सुंदर हिंदु व बौद्ध मंदिरें पहायला सांपडतील. त्या मंदिरांना हिमाशिखरांची पार्श्वभूमी मिळाली असल्यामुळें त्यांची शोभा वाढली आहे.

## पुढील प्रवासाची पूर्व तयारी

काठमांडूपासून आमच्या पायीं प्रवासाला आम्ही दि. २१ सप्टेंबर रोजीं निघण्याचें ठरविलें होतें. परंतु आम्हांला बऱ्याच लोकांना भेटायचें होते व कांहीं प्रेक्षणीय स्थळेंहि पाहावयाचीं राहिलीं होतीं म्हणून आम्ही एक दिवस उशीरा निघायचें ठरविलें. नेपाळमधील परिभ्रमणाचीं पाश्चिमात्य गिर्यारोहकांनीं केलेलीं वर्णनें वाचून आम्ही अंदाज बांधला होता कीं, तेथील पावसाचा जोर सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत कमी होईल व त्यापुढें सप्टेंबर अखेर तुरळकच पाऊस पडेल. आम्ही अंदाज केल्याप्रमाणेंच झालें. काठमांडूच्या आमच्या आठ दिवसाच्या मुक्कामांतच पावसाळा संपत असल्याचीं चिन्हें आम्हांला दिसूं लागलीं. काठमांडूहून निघण्याचें आधीं तर एके दिवशीं खूप धुकें पडलें. ती पावसाळा संपल्याची निशाणीच. आमच्या पुढील प्रवासांत आकाश अभ्राच्छादित असे. परंतु पाऊस एकदोनदांच लागला. सप्टेंबर अखेर तर हवा अगदींच निवळून निरभ्र आकाशांत दूरदूरचे देखावे दिसूं लागले.

काठमांडूला करायची मुख्य गोष्ट म्हणजे भारवाहकांचा बंदोबस्त. भारतीय वकिलातीच्या अधिकाऱ्यांनीं नेपाळ सरकारचे चीफ प्रोटॉकॉल सरदार प्रकटमानसिंग यांच्याशीं आमची ओळख करून दिली. त्यांच्या सहाय्यानें भारवाहकांची व्यवस्थित सोय करण्यांत आली. आम्ही पांचजण व एक स्वैपाकी एवढ्या सर्वांचें वैयक्तिक सामान व मोहिमेचें सामान हें सर्व उचलण्यासाठीं वीस पंचवीस भारवाहकांची जरुरी होती. नेपाळांतील भारवाहक साठ ते ऐंशी पौंड वजन उचलून रोज दहाबारा मैलाची चाल करूं शकतो. चढण अधिक असेल


तर चाल यापेक्षां कमी, चढण विशेष नसेल तर तो पंधरा सोळा मैल जाऊं शकतो. सरदार प्रकटमानसिंग यांनीं मजुरांच्या ठेकेदाराला संदेश पाठवल्यावर भारवाहकांचा एक तांडा त्यांच्या म्होरक्यासह आमच्या रेस्ट हाऊसच्या आवारांत येऊन उभा राहिला. त्यांचे कपडे फाटले होते. बहुतेकांच्या अंगावर केवळ कुडता व लंगोटी होती. कांहींनीं नेपाळी चुडीदार पायजमा व जाकीट घातलेलें होतें. बहुतेकांच्या कमरेला उपरणें बांधलेलें असून त्यांत नेपाळी कुकरी खोंवली होती. कुकरी हें कोयत्याच्या आकाराचें पण कोयत्यापेक्षां सुंदर आकार असलेलें एक हत्यार आहे. तें नेहमीं कांतड्याच्या किंवा लाकडाच्या म्यानांत ठेवलेलें असतें. त्या म्यानाला दोन छोटीं म्यानें जोडलेलीं असतात. त्यांत एकांत कुकरीच्या आकाराचा चाकू असतो व दुसऱ्यांत कानशीसारखा खडबडीत पृष्ठभाग असलेला बोथट चाकू असतो. त्याला चकमक म्हणतात. त्याचा उपयोग गारगोटीवर आपटून आग तयार करण्यासाठीं असतो. शहर सोडून डोंगराळ भागांत गेलें कीं आगपेट्या दुर्मिळ होऊं लागतात. त्यावेळेस आग पेटवण्यासाठीं व विशेषतः चिलिम किंवा सिगरेट पेटवण्यासाठीं ही चकमक वापरली जाते. एका हातांत गारगोटी व तिच्याजवळ वाळलेलें गवत धरून त्या गारगोटीवर चकमक आपटून ते झटकन् गवत पेटवूं शकतात. हें गवतसुद्धां एक खास प्रकारचें लवकर पेट घेणारें असतें. तें ठेवण्यासाठीं कुकरीच्या म्यानाला जोडून एक लहानशी पिशवी असते. कुकरीचा उपयोग शस्त्र म्हणून करण्यापेक्षां लांकूड तोडण्यासाठीं हत्यार म्हणून जास्त होतो. सर्पणासाठीं लांकडे कुकरीनें तोडतात. क्वचित् प्रसंगीं हे लोक हिंस्र पशूंपासून बचाव करण्यासाठीं किंवा भांडणतंटा झाला असतां आपल्या दुष्मनांना मारण्यासाठीं कुकरीचा उपयोग करीत असतील. पण असे प्रसंग फारच क्वचित येत असतील. कारण नेपाळी लोक एकंदरीत शांतताप्रिय आहेत.

फाटके कपडे घातलेल्या त्या भारवाहकांकडे व आमच्या सामानाच्या बोजांकडे पाहिल्यावर ते बोजे पाठीवर उचलून ते आमच्याबरोबर डोंगरदऱ्यांतून पायीं चालणार याची जाणीव होऊन मला त्यांची दया येऊं लागली. परंतु लगेच लक्षांत आलें कीं सामान पाठीवर वाहून मैलच्या मैल चालत जाणें हा त्यांचा व्यवसायच आहे. त्यांत त्यांना श्रम व कष्ट होतात याबद्दल प्रश्न नाहीं. पण त्यांना जितके कष्ट होत असतील असें आपल्याला वाटतें तितके ते होत नाहींत हें नक्की.

शिवाय रोजावर ठरवलेल्या आपल्याकडील सराइत मजुराप्रमाणें जिवाला जास्त श्रम न होऊं देण्याची काळजी ते घेतातच. याचा अनुभव आम्हांला पुढें वाटचाल करतांना आला. दोन चार मैल आणखी मार्ग आक्रमून पुढचें गांव मुक्कामासाठीं गांठावें अशी इच्छा आम्हांला होऊन त्यांच्यापुढें तो बेत आम्ही मांडला कीं, कांहींतरी कारणें सांगून किंवा हळूंहळूं चालून ते तो बेत बहुतेक हाणून पाडीत असत. यामुळें पुढें पुढें आम्ही त्यांना "आज जास्त वाटचाल करूं" असें म्हणणें सोडून दिलें.

मुंबई येथें अंदाजपत्रक तयार करतांना भारवाहकांना प्रत्येकीं रोज चार रुपये द्यावे लागतील अशा हिशोबानें आम्हीं पैशाची तयारी ठेवली होती. परंतु तेथें गेल्यावर कळलें कीं, नेपाळांत भारवाहकांना देण्याचा नेहमींचा दर साडेतीन रुपये रोज आहे. ते साडेतीन रुपयेसुद्धां नेपाळी चलनांत, म्हणजे आपलें सुमारें सव्वादोन रुपयेच. या स्वस्त दरामुळें आमच्या मजुरी खर्चांत फार बचत झाली. आमच्या परिभ्रमणाच्या खर्चांचा मोठा भाग मजुरीचाच होता. या नेपाळी साडे-तीन रुपयांत म्हणजे सात मोहरांत त्या मजुरानें स्वतःच्या खाण्यापिण्याची सोय करायची असते. त्यांच्या म्होरक्यालाही तेवढीच मजुरी मिळते. तो इतर मजुरां-इतकें वजन उचलीत नाहीं. नेपाळी भाषेंत ओझें उचलणाऱ्या मजुरास भारिया व त्यांच्या म्होरक्याला भारिया नाइक म्हणतात. आमच्या भारिया नाइकाचें नांव हरकमानसिंग होतें. तो पूर्वी स्वीस पथकाबरोबर भारवाहकांचा एक तांडा घेऊन काठमांडूहून नामचे बझार येथें जाऊन आलेला होता. त्यामुळें त्याला नामचे बझारचा रस्ता, वाटेंतील मुक्कामांचीं ठिकाणें, तेथें राहण्याच्या सोयी इत्यादि गोष्टींची चांगली माहिती होती. त्याच्याशीं प्राथमिक स्वरूपाचें बोलणें झाल्यावर आम्ही त्याला चीफ ऑफ प्रोटॉकॉल सरदार प्रकटमानसिंग यांच्या कचेरींत घेऊन गेलों. तेथें त्यांच्या समोर मजुरीच्या ठेकेदाराशीं वीस भारवाहकां-साठीं आम्हीं लेखी करार केला. लेखी करार केल्यामुळें भारवाहकांना एक प्रकारचा धाक होता कीं, त्यांचेपैकीं कोणी नीट वागलें नाहीं, किंवा कोणी आमचें नुकसान केलें अशी तक्रार आम्ही चीफ ऑफ प्रोटॉकॉल यांजकडे केली तर ते मजुरांच्या ठेकेदाराला त्यासंबंधीं जाब विचारतील व त्याच्याकडून आमची नुकसानभरपाई करून देतील. त्या भारवाहकांना मजूर ठेकेदाराला भिऊनच वागावें

लागत होतें कारण पुढेंमागें अशा प्रकारची मजुरी त्यांचेमार्फतच मिळणार होती. मजुरीचा दर रोज सात मोहरा व विश्रांतीचे दिवशीं किंवा परत मोकळे येतांना निम्मी मजुरी द्यायची असें ठरलें होतें. प्रत्येक भारवाहकांमागें एक मोहोर याप्रमाणें मजुर-ठेकेदाराला कमिशन द्यावें लागलें. कपडे, धान्य वगैरे जिनसा घेतां याव्या व कुटुंबाला कांहीं पैसे देतां यावें; म्हणून आम्ही भारवाहकांची आठ दिवसांची मजुरी आगाऊ ठेकेदाराजवळ दिली. भारवाहकांची व्यवस्था केल्यावर आम्ही प्रवासास लागणाऱ्या तांदूळ, आटा, रॉकेल वगैरे जिन्नसा खरेदी केल्या. नेपाळ-मध्यें जुन्या मूर्ति, घंटा, पोथ्या, बौद्धधर्मीय रंगीत चित्रें ( ज्याला त्यांचे भाषेत ठंका म्हणतात ) शालिग्राम वगैरे वस्तू विकत मिळतात. अशा वस्तूंचीं कांहीं दुकानें पाटणमध्यें आहेत. आम्ही तेथें दोनचार तास घालवून बऱ्याच वस्तू खरेदी केल्या. आमच्यापैकीं एकानें विनोदानें म्हटलें कीं, नेपाळमधील टाकाऊ वस्तू आम्ही उठवीत असल्यामुळें तेथील लोकांना कचरा निघून गेल्या-बद्दल आनंद होत असेल. नेपाळमध्यें अजून परदेशांतील प्रवासी विशेष येऊं लागले नाहींत. म्हणून तेथें भरमसाट किंमती सांगून प्रवाशांना लुबाडणारे दुकानदार, नको म्हटलें तरी बरोबर येणारे वाटाडे, सतावणारे भिकारी व ' साब बक्षीस ' म्हणून मागें लागणारीं लहान पोरें नाहींत. आम्ही अनेक मंदिरांत जाऊन आलों. परंतु येथें पैसा टाका, पूजा करा, अभिषेक करण्यासाठीं दक्षिणा द्या असें सांगुन पुण्याची विक्री करणारे पुजारी, गुरव किंवा वतनदार आम्हांला आढळून आले नाहींत. काठमांडूमधीलच काय पण एकंदर नेपाळमधील लोक शांतताप्रिय व आनंदी वाटले, आम्ही आमचे कॅमेरे घेऊन आमचेबरोबर अस-लेल्या बच्च्यांच्या टोळक्यांसह भरबाजारांतून किंवा मंदिराच्या आवारांतून इकडे तिकडे हिंडत होतो. परंतु आमचा कुणाशीं संघर्ष क्वचितच आला असेल. काठमांडूच्या एका गर्दीच्या रस्त्यावर मिलिटरी बँड, सनई वगैरे वाद्यांसहित देवीची एक मिरवणूक चालली होती. नवनीतना त्यांची फिल्म काढण्याची इच्छा झाली. आम्ही विनंती करतांच ते लोक थांबून फिल्ममध्यें व्यवस्थित येण्यासाठीं मागें जाऊन कॅमेरा सज्ज झाल्यावर इशारा करतांच वाद्यें वाजवीत कॅमेऱ्यापुढून चालत गेले व थोड्या बक्षिशीवर खूष झाले, नेपाळमधील सामान्य नागरिकाला सध्यांचें युगांतील " आमचें हक्क ", " थोडें काम करून अधिक



आमा डब्लम शिखर ( २२६०० फुट )

मागण्या कशा कराव्या, " "खेड्यांत येणाऱ्या शहरीं माणसांची कशी अडवणूक करावी ", इत्यादि गोष्टींचें शिक्षण मिळालेलें नाहीं म्हणून तो मनमोकळेपणानें आपल्याकडून होईल ती मदत करण्यास तयार असतो. अगदीं वेगळ्या वातावरणांत नाविन्यपूर्ण सुट्टी घालवायची असेल त्यांनीं काठमांडूला आठदहा दिवस जाऊन यावें, त्यांचें दिवस नक्की आनंदांत जातील. आपल्याशीं जुळणाऱ्या नेपाळी संस्कृतीचा विचार केला कीं, असें वाटतें कीं भारतांत एकजीव होण्यास काश्मीरपेक्षांही नेपाळ जास्त लायक आहे. नेपाळच्या सर्व आशा आकांक्षा, सुरक्षितता व प्रगति भारतावरच अवलंबून आहे. इतिहासकाळापासून नेपाळ हें स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगत असल्यामुळें तें भारतांत संलग्न होणें असंभवनीय आहे. परंतु भारत आणि नेपाळ या राष्ट्रांत नेहमीं स्नेहभाव राहील असें वाटतें.

आम्हीं काठमांडूला असतांना श्री. गोखले यांनीं " शीतल निवास " मध्यें एक थाटाची मेजवानी दिली. काठमांडूतील सर्व बडी बडी मंडळी उपस्थित होती. आम्हां पांच जणांनाहि निमंत्रण होतें. नेपाळचे पंतप्रधान श्री. मातृकाप्रसाद कोईराला, कमांडर इन् चीफ जनरल सर किरण समशेरजंग बहादुर राणा, माजी सेनापति व महाराजांचे प्रमुख सल्लागार जनरल सर कैसर स. ज. ब. राणा, इंडियन मिलिटरी मिशनचे मेजर जनरल रुद्रा व इतर मोठे लष्करी अधिकारी इत्यादि महत्त्वाच्या व्यक्तींशीं आमचा परिचय झाला. त्या सर्वांनीं आमच्या गिर्यारोहणाच्या उपक्रमाविषयीं आस्थेनें विचारपूस केली. नेपाळ हिमालयांत गिर्यारोहणासाठीं जाणारे आम्ही पहिले भारतीय तरुण असल्यामुळें त्यांना आमचें विषयीं कुतूहल होतें. पंतप्रधान आणि सेनाधिपति यांचें निवासस्थानीं जाऊन आम्ही औपचारिकरीत्या भेटून आलों. प्रेक्षणीय स्थळें पाहण्याचें आणि भेटी देण्याचे आमचे कार्यक्रम एकसारखे लागलेले असत. मुक्कामाच्या शेवटच्या दिवशीं तर सर्व कार्यक्रम पार पाडतांना आमची धांदलच उडाली. यापुढील पायीं प्रवासांतच आम्हांला जास्त स्वस्थपणा लाभेल असें आम्हांला वाटूं लागलें.

# काठमांडू ते नामचे बझार

आमच्या पायी प्रवासास आम्ही तारीख बावीस सप्टेंबर रोजी सुरवात केली. काठमांडूचे सर्व दिवस गडबडींत गेले. यापुढें आमचे दिवस कष्टाचे खरे, पण ते शांत व स्वस्थपणें जाणार होते. निघायच्या आदल्या दिवशींच आम्ही आमचें सर्व सामान भारवाहकांच्या ताब्यांत देऊन त्यांना पुढें पाठवून दिलें. आपापले बोजे ताब्यांत घेण्यासाठीं भारवाहक जमले होते. तो देखावा गंमतीदार होता. वाटेंत पावसाचा संभव असल्यामुळें प्रत्येकानें वाळलेल्या पानांपासून बनवलेलें इरलें आणलें होतें. सर्वांत कमी वजन असलेला व आटपशीर बोजा आपणांस मिळावा याबद्दल प्रत्येकाचा प्रयत्न चालू होता. काठमांडू येथें जो बोजा ज्या भारवाहकानें उचलिला तो नामचे बझारपर्यंत म्हणजे पुढील पंधरा दिवसांचे वाटचालींत त्याचेच जवळ रहाणार होता. कांहीं बोजांचें वजन आंतील खाद्यपदार्थ वापरले जात असल्यामुळें रोज थोडेंथोडें कमी होत होतें. आमच्या बिस्किटवाल्याची आठवण येते. आम्ही बिस्किटांचे दहा दहा पौंडी असे सहा डबे घेतले होते. ते एका भारवाहकाजवळ होते. त्याला आम्ही बिस्किटवाला म्हणत असूं. त्याच्या बोजांतील बिस्किटें रोज थोडींथोडीं कमीं होत होतीं. परंतु दिसायला त्याचा बोजा पहिल्याइतकाच मोठा दिसत असे. सर्व बोजे सारख्या वजनाचे नसल्यामुळें इकडच्या वस्तु तिकडे घालून बोजे तयार करण्यांत तास दीड तास गेला, अखेर सर्व बोजे घेऊन आमचे बावीस भारवाहक काठमांडूच्या बाहेर पडले. त्यांनीं पहिल्या दिवशीं बनेपा येथें जाऊन मुक्काम केला. तेथपर्यंत जीप कशीबशी जाऊं शकत असल्यामुळें आम्ही पहिल्या मजलीचा प्रवास जीपमध्यें बसून करायचें योजिलें.

सकाळीं जीपमध्यें बसून निघालों. काठमांडू शहरांतून निघून पुढें भडगांव शहरांमधून बाहेर पडून कच्च्या रस्त्यानें आदळत आपटत आमची जीप आठ वाजतां बनेपा येथें पोंचली. रस्ता कठिण होता. पण आमचा जीपड्रायव्हर सफाईनें गाडी चालवत होता. बनेपा येथें आमचे भारवाहक भेटले. रात्रीं खूप पाऊस पडला होता. आमचें सामान जेमतेम कोरडें राहिलें होतें. चहापान व

नाश्ता करून आम्ही सुमारें सव्वाशें मैल दूर व अनेक पर्वतरांगाच्यापलीकडे असलेल्या नामचे बझारला जाण्यासाठीं पावलें टाकण्यास सुरवात केली. पाऊस नुकतांच पडून गेलेला, जिकडे तिकडे हिरवेंगार, आणि पहिल्या दिवसाचा उत्साह या वातावरणांत आम्ही बनेपाहून सपाट्यानें चालत निघालों. बनेपाजवळ दोन-तीन मैलांवर धुलीखेड नांवाचें एक मोठें गांव आहे. पण तें आमच्या मार्गावर नव्हतें. चालायला सुरवात केल्यावर पहिले दोन मैल चढून एका कण्यावर आलों, तेथून आम्हांला एकामागें एक डोंगरांच्या रांगा दिसूं लागल्या. डोंगरांपाठीमागील न दिसणाऱ्या दऱ्यांतून वाफांसारखे ढगाचे लोट वरती येऊन वाऱ्यावर उडतांना सुंदर दिसत होते. नंतरचे तीन मैल उतरून सपाटीवर भात शेतांतून मार्ग आक्रमूं लागलों. चार मैल पुढें गेल्यावर होक्से हें गांव लागलें. पायवाटेवर काठमांडूला जाणाऱ्या येणाऱ्या लोकांची रहदारी चालू होती. बहुतेकांच्या पाठीवर टोपली किंवा सुटें ओझें व त्याला बांधलेला पट्टा कपाळाचे जरा वर घेतलेला असे. पाठीवरील वजनामुळें तोल सांभाळण्यासाठीं ते थोडे पुढें वांकलेले असत. त्यांचे लक्ष बहुतेक स्वतःच्या पायाखालच्या जमिनीकडे असें. कारण ते अनवाणी असत. पायवाटा खडबडीत व त्यांत खड्डे खड्डे विपुल. तेव्हां ठेंच लागूं नये व घसरूं नये म्हणून पाऊल बरोबर टाकण्यासाठीं त्याची नजर खालीं लागलेली असे. त्यांच्या अनवाणी पायांना अशा रस्त्यावरून चालण्याची चांगली संवय झाली असेल. माझ्यासारख्याला अनवाणी चालण्याचा प्रसंग आला असतां तर एका मैलांत दोनतीन वेळां तरी पायाला ठेंचा लागल्या असत्या.

होक्से गांव लहानसें खेडेंच होतें. तेथें चहा मिळतो कां म्हणून चौकशी केली पण चहा मिळाला नाहीं. नेपाळ हिमालयावरील पर्यटनांत कुठेंही आपल्यासारखा चहा मिळाला नाहीं. होक्सेच्या पुढें उतरणीस सुरवात झाली. वाटेंत एक वाहता नाला लागला. त्याचें नांव मसाने खोला. खोला म्हणजे नाला. नाला सखल व रुंद असल्यामुळें तेथें पूल नव्हता. तेव्हां पायांतून बूट काढून पाठीवरील पिशवीला बांधले व पाण्यांतून पलीकडे गेलों. वाटेंत पाणी गुडघ्यापर्यंत पोंचलें होतें. प्रवाहाचे जोरानें पाण्यांत घसरून पडूं नये म्हणून खबरदारी घ्यावी लागत होती. मसाने खोला पार केल्यावर चाक खोला लागला. त्याच्या उजव्या तीरावरून वाट जात होती. सकाळपासून चालू लागल्यापासून कितीतरी

तास झाले होते. तरी आमचें मुक्कामाचें गांव दोलाल घाट येईना. पंधरावीस मिनिटें चालून गेल्यावर वाटेंत विचारावें तर दोलाल घाट अजून दोनतीन कोस दूर होतेंच. नकाशांत आम्ही अंतर पाहिलें होतें. तेव्हां काठमांडूहून दोलाल घाट एवढें दूर असेल अशी कल्पना नव्हती. प्रवासाचा पहिलाच दिवस असल्यामुळें व दोलाल घाटला पोंचायला एवढा उशीर होईल ही कल्पना नव्हती म्हणून आम्ही बरोबर खाण्यासाठीं कांहीं घेतलें नव्हतें. त्यामुळें भूक लागली. वाटेंत एकदोन ठिकाणीं केळीं मिळालीं तीं घेऊन खाल्लीं. पण त्यानें भूक भागेना. प्रवासाचा पहिलाच दिवस असल्यामुळें थकलेले पाय कुरकुरूं लागले. खोल्याच्या कांठानें जाणाऱ्या पायवाटेवर एकसारखी चढण व उतरण होती. चढण आली कीं नको वाटूं लागे. हिमालयांत पायचाल करायची म्हणून मी गरम शर्ट व पँट घातली होती. परंतु आम्ही हिमालयांतील केवळ तीन चार हजार फूट उंचीच्या खोऱ्यांतून चालत होतों, म्हणून उष्मा फार जाणवूं लागला. सर्वजण कंटाळले होते. शेवटीं एकदांचें दोदाल घाट आलें. तेथें पोहोंचेपर्यंत अंधार झाला होता.

दोदालघाट येथें तीन नद्यांचा संगम आहे. आधीं चाकखोला इंद्रावती नदीला मिळतो. नंतर इंद्रावती सुनकोसी नदीला मिळते. त्या संगमावरील टेकडीवरच सरकारी रेस्ट हाऊस आहे. तारेचा झुलता पूल ओलांडून रेस्ट हाऊसपाशीं जाऊन पोंचलों. पण खायला मिळण्याची आशा नव्हती. खाण्याचे जिन्नस व स्वैपाकाची सामुग्री आम्ही बरोबर घेतली नव्हती. भारवाहकांचा मुळींच पत्ता नव्हता. ते किती मागें होते कोण जाणे ! फक्त भारियानाइक हरकमानासिंग आमचेबरोबर होता. हरकमानासिंगनें मोठमोठ्यानें ओरडून चौकीदाराला हांका मारण्यास सुरवात केली. एकसारखे तो अर्धा तास हाका मारीत होता. आम्ही दमलेलों असल्यामुळें घराबाहेरील मोकळ्या जागेंत जमिनीवर पडून राहिलों. कांहीं वेळानें चौकीदार आला व त्यानें वरची खोली उघडून दिली. इकडचे रेस्ट हाऊस धर्मशाळेसारखें असतें. खालचा मजला मोकळा. वरचा मजला बंद किंवा उघडी खोली. जाणारे येणारे वाटसरू खालच्या मजल्यावरील मोकळ्या जागेंत तीन दगड ठेवून चुली पेटवून स्वैपाक करतात. वरच्या मजल्यावर आमच्यासारखे स्वतः स्वैपाक न करणारे प्रवासी मुक्काम करतात.

रात्र खूप झाली होती. गेबीलालनें गांवांत जाऊन थोडे तांदूळ व बटाटे आणून भात व बटाट्याचा रस्सा बनविला. तो कसाबसा बनविला असला तरी आम्हांस गोड लागला. पोटांत गेल्यावर मग आजूबाजूचा देखावा पाहण्याची इच्छा झाली. चतुर्दशीच्या चंद्राचें शुभ्र चांदणें पडलें होतें. रेस्ट हाऊसच्या एका बाजूनें इंद्रावती व दुसऱ्या बाजूनें सुनकोसी वाहात येऊन रेस्ट हाऊसच्या खालींच एकमेकींना मिळत होत्या. आम्ही सोळा मैलाची वाटचाल व चढाई उतराई केल्यामुळें थकलेलों नसतो तर त्या आल्हादकारक चांदण्यांत संगमाच्या मनोहर दृश्याकडे पहात गप्पा मारीत, अर्धी रात्र जागून काढली असती. परंतु आम्हांला झोंप येत होती. आणि दुसऱ्या दिवसाची पांच हजार फुटाची चढण डोळ्यापुढें दिसत होती. रात्रीं दहा वाजेपर्यंत फक्त दहाबारा भारवाहक दोदालघाट येथें येऊन पोंचले होते. आमच्या पांचापैकीं एकाचेंच बेडिंग पुढें आलें होतें. त्यांतील पांघरुणें वांटून घेऊन जमिनीवर झोंपण्याची तयारी केली. मागें राहिलेल्यापैकीं कांहीं भारवाहक आजारी झाले होते असें कळलें. त्यांच्या बरोबर राहिलेल्या सामानाचें काय करायचें हा प्रश्न होताच. तो प्रश्न उद्यां सोडवूं असें म्हणून अकरा वाजण्याचें सुमारास झोंपी गेलों.

दुसरें दिवशीं सावकाश उठलों. मागें राहिलेल्या भारवाहकांना बरोबर घेऊन येण्यासाठीं हरकमानसिंगला पाठवलें. सकाळच्या प्रकाशांत संगमापासून दूरचा देखावा दिसूं लागला. दोन्ही नद्यांवर तारेचे झुलते पूल होते. हें स्थळ इतकें रम्य असूनही तेथें जास्त वेळ घालवितां न आल्यामुळें वाईट वाटलें.

दुसरें दिवशींची चाल सहा मैलाचीच होती. पण चढण जवळजवळ पांच हजार फुटांची होती. आदले दिवशीं येतांनाच हरकमानसिंग समोरच्या उंच डोंगरांकडे बोट करून चौबासला जाण्याचा मार्ग दाखवीत होता. एवढें उंच चढून जाण्यासाठीं मनाची तयारी करून हळुंहळुं चढण्यास सुरवात केली. आधीं सुनकोसी नदीवरील झुलत्या पुलावरून पलीकडे गेलों. तेथें डोंगराचे पायथ्याशीं पाणचक्की होती. पाण्यावर चालणाऱ्या अशा पिठाच्या गिरण्या नेपाळ हिमालयांत नदी व नाल्यांच्या कांठीं आढळून येतात. एक चर खणून पाणी त्या चरांतून वाहत आणलें व चक्रावर सोडून दिलें कीं, तें चक्र अव्याहत चालूं राहतें.

त्यामुळें सखल भागांतल्या खेड्यांतील स्त्रिया दळणाच्या कष्टामधून मुक्त झाल्या आहेत.

त्या दिवशीं एकसारखी चढण होती. पहिले चार मैल जवळजवळ उभी व पुढें तिरपी. वाटेंत थोड्याथोड्या अंतरावर झाडाखालीं चौथरे लागत होते. आमचे भारवाहक तेथें ओझीं लावून थांबायचे. आम्हीही मधून मधून थांबत होतों. दोन्ही कामें व्हायचीं. दम खाणें व देखावा पहाणें. जसजसें वर जावें तस तसा दूरवरचा देखावा दिसत होता. इंद्रावती व सुनकोसी नद्यांचे संगमापूर्वीचे प्रवाह लांबपर्यंत दिसत होते. ढगांच्यामधून कांहीं शिखरेंही हिमाच्छादित दिसत होतीं. वाटेंत एक चढण चढून वर आलों तों पाषाणाचे गोमुखांतून जलधारा वहात असलेली दिसली. त्या धारेखालीं रूसी व होमी या बंधूंचा जलविहार चालू होता. आम्हीही थांबलों. गेले दोनतीन दिवसांत आंघोळ न केल्यामुळें व विशेषतः घामामुळें शरिराला व कपड्यांना गालिच्छपणा आलेला होता. कपडे उतरून पाण्याच्या धारेखालीं गेलों. प्रथम पाणी अगदीं गार वाटलें. पण नंतर गंमत वाटूं लागली व पाण्याच्या धारेखालून उठूं नये असें वाटूं लागलें. यथेच्छ स्नान करून कपडे धुऊन, बरोबर आणलेलीं बिस्किटें व चीझचा समाचार घेतला. भारवाहकांना आमच्यापेक्षां आंघोळीचीं आधिक जरूरी होती. पण आंघोळ करण्यास कोणीही उत्सुक नव्हते. वाटेंत एखादी नदी किंवा नाला भेटला कीं, आम्ही आंघोळ करीत असूं. पण भारवाहकांना आंघोळ करतांना कधीं पाहिलें नाहीं. इकडच्या लोकांना प्रवासांत गार पाण्यानें स्नान केलें म्हणजे आजारी पडूं अशी भीति वाटते. आमचे भारवाहक दोनतीन आठवड्यांनीं काठमांडूला परत पोंचल्यावर स्नान करणार होते.

रस्त्यांत भेटणारे लोक आमच्याकडे कुतूहलपूर्वक पहात असत. नेपाळमध्यें अजून आमच्यासारखें भटके प्रवासी विशेष येऊन गेलेले नाहीत. गेल्या तीन चार वर्षांपासून पाश्चिमात्यांचीं कांहीं पथकें गिर्यारोहणासाठीं नेपाळच्या अंतर्भागांतून प्रवास करून आलेलीं आहेत. तसेंच सर्व्हे ऑफ इंडिया, जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया अशा खात्यांतील कांहीं अधिकारी पाहणी करण्यासाठीं मधून मधून येऊन गेलेले आहेत. परंतु हिमालयांतील गढवाल, सिक्कीम किंवा काश्मीर येथें परिभ्रमण करण्यासाठीं जसे अनेक लोक जातात तसे नेपाळमध्यें कोणी जात

नव्हते. किंबहुना, केवळ परिभ्रमण व गिर्यारोहण करण्यासाठीं गेलेले आम्ही पहिलेंच भारतीय असूं. वाटेंत भेटणाऱ्यांपैकीं कांहीं धीट लोक आम्ही कुठले, कुठें चाललों असें प्रश्न विचारीत. काठमांडूपासून आम्ही फार दूर गेलेलों नसल्यामुळें वाटेंत भेटणाऱ्या बऱ्याच लोकांना हिंदी येत होतें. त्यांच्या "कहाँसे आये ?" या प्रश्नाला "बंबईसे" असें उत्तर दिल्यावर, "कहाँ जायेंगे ?" असा दुसरा प्रश्न यायचा. मीही "नामचे बझार" असें त्रोटक उत्तर द्यायचा. मग लगेच तिसरा प्रश्न यायचा. "किस लिये ? वहाँ क्या है ?" माझें उत्तर ठरलेलें, "वहाँ पहाड देखने जा रहे हैं." पण या उत्तरानें त्यांचें समाधान व्हायचें नाहीं. अहोरात्र ज्यांना पाहून आणि ज्यांच्यावर चढउतार करून आपण कंटाळलों आहोंत, ते डोंगर पहाण्यासाठीं हे लोक मुंबईहून एवढे कष्ट करीत कशाला जात आहेत याचा त्यांना कांहीं उमज पडत नसे. त्यांतले कांहीं हुशार लोक, "कांहीं शोध करायला जात आहांत कां ?" असें विचारीत. जे लोक नेपाळांत म्हणजे काठमांडूचें खोऱ्यांत जाऊन आलेले होते. त्यांना तेनसिंग शेर्पाचें नांव व त्यानें नुकताच एव्हरेस्टवर केलेला दिग्विजय माहीत होता. बाकीच्या लोकांना त्यांच्या देशांत घडलेल्या व जगाला हालवून सोडणाऱ्या या घटनेची कांहीं माहिती नव्हती.

आम्ही चौबास गांवीं दुपारीं चार वाजतां पोंचलों. रूसी व होमी गांधी आधीं जाऊन पोंचले होते. त्यांनीं तिथल्या दुकानदाराच्या घरांतील बाजूची छोटी खोली रात्रीं मुक्काम करण्यासाठीं मिळवून ठेवली होती. तासादीडतासानें सर्व भारवाहक येऊन पोंचले. गेबीलालनें पुरी भाजीचा स्वैंपाक बनविला आणि दिवे लागणीच्या सुमारास आम्ही जेवलों. नेपाळ देश मुंबईच्या ईशान्य दिशेला असल्यामुळें तेथें आपल्यापेक्षां दिवस लवकर उजाडतो व मावळतो. सप्टेंबरच्या दिवसांतदेखील सहा साडेसहा वाजतांच अंधार पडूं लागे. आम्ही कंदील बरोबर नेले होते. ते पेटवून दैनंदिनी लिहिण्याचें व नकाशा पहाण्याचें काम रात्रीं करत असूं. मला तर हिशेब लिहिण्याचें आणखी एक काम होतें. तास दीड तास या कामांत वेळ घालविल्यावर आम्ही लवकर झोंपून जात असूं. त्या रात्रीं चौबासला आम्ही सात हजार फूट उंचीवर होतो. म्हणून हवा थंड वाटत होती, परंतु एका छोट्या खोलींत पांच जण झोंपल्यामुळें थंडी वाजली नाहीं.

तिसरें दिवशीं चौबासहून लिसांखूला जाण्यास निघालों. त्या दिवशीं सकाळीं पुन्हां भारवाहकांसंबंधीं कांहीं अडचण आली. दोघेतिघे भारवाहक पुढें जायला तयार नव्हते. त्यांतील नरबहादूर नांवाच्या एका भारवाहकास भारियानाइक व्हावयाचें होतें. ती संधी न मिळतां एखाद्या सामान्य भारियासारखें ओझें उचलावें लागल्यामुळें तो असंतुष्ट होता. तो काठमांडूला परत जात आहे हें कळून आम्हांला बरें वाटलें. कारण त्यानें स्वतः नीट काम केलें नसतें व इतरांना फूस लावली असती. चौबास येथें त्यानें आम्हांस त्रास दिलाच. जे दोन तीन भारवाहक परत जाणार होते त्यांचेऐवजीं दुसरीं माणसें घेण्याचा प्रयत्न हरकमानासिंग करीत होता. नरबहादूरानें त्या माणसास चिथविलें व आमच्याबरोबर तेथून कुणीं येऊं नये असा प्रयत्न चालवला. अखेर हरकमानसिंगनें थोडी जास्त मजुरी व एक एक सिगरेटचें पाकीट देऊं करून कांहीं माणसांना बरोबर घेतलें.

सकाळीं उठून नवनीत जवळच्या टेकडीवर गेले असतांना त्यांना हिमाच्छादित शिखराची मोठी रांग दिसली. त्यांनीं मागें फिरून आम्हां सर्वांना हांक मारून बोलावलें. आम्ही लगेच धांवत गेलों. त्या दिवसांत आकाश बहुतेक अभ्राच्छादित रहात असल्यामुळें दूरवरचीं हिमशिखरें दर्शन देण्यासाठीं फार वेळ अनावृत्त राहणें शक्य नव्हतें. आम्ही लगेच वरती चढून गेल्यानें तो आकर्षक व स्मरणीय देखावा आम्हांला दिसला. सातआठ डौलदार हिमशिखरांनीं क्षितिज व्यापून टाकिलें होतें. हिमालयांतील शिखरराज एव्हरेस्टला मुजरा करण्यासाठीं जणूं काय त्याचे सरदार प्रातःकाळीं नीटनेटका व शुभ्र पोशाख करून त्याच्या राजवाड्यापाशीं येऊन रांगेंत उभे राहिले होते. मेघांचा पडदा येऊन तें दृश्य दिसेनासें झाल्यावर आम्ही खालीं आलों. पावसाळा पूर्णपणें संपला नसल्यामुळें नामचे बझारला जाईपर्यंत अशा हिमशिखरराजींचें दर्शन आम्हांला दोनतीन वेळांच झालें.

चौबासहून निघाल्यावर सुमारें पांचशें फूट चढून घाटमाथ्यावर आलों. यापुढील रस्ता डोंगराच्या कण्यावरून एक सारखा पूर्व दिशेकडे बरेच मैल जात होता. दोन्ही बाजूला सुंदर देखावे दिसत होते. उत्तरेला उंच उंच पर्वत व त्यांची मेघाआडून डोकवणारीं हिमशिखरें दिसत होतीं. दक्षिणेला डोंगराच्या उतरणीवर ओटे बनवून त्यावर पेरलेलीं भातशेतें, शेतामध्यें असणारी घरें,

वाऱ्याच्या झोताबरोबर कापसाच्या पुंजक्याप्रमाणें आकाशांत तरंगत जात असतांना शैलशिखरांशीं लगट करणारे मेघ, दऱ्यांच्या तळाशीं जोरानें वहात जाणारे व सूर्यप्रकाशांत रुपेरी चकाकणारे जलप्रवाह अशीं नयनमनोहर दृश्यें दिसत होतीं. मध्य हिमालयांत जेथें डोंगरांच्या उतरत्या बाजूवर ओटे बनवून भात, नाचणी, मका वगैरे धान्यें पिकवितात. तेथें शेतकऱ्यांचीं घरें आपापल्या शेतापाशींच असतात. सखल प्रदेशांतल्याप्रमाणें शेतकरी खेड्यांत जवळ जवळ घरें बांधून रहात नाहींत. त्याचें पहिलें कारण म्हणजे त्यांचीं शेतें उंच उंच डोंगराच्या उतरणीवर जागा साफ करून ओटे बांधून तयार केलेलीं असल्यामुळें तीं एक-मेकांपासून बरीच लांब व उंचीवरती असतात. शेतकऱ्यांनीं खेड्यांत वस्ती केली तर आपल्या शेतापाशीं पोंचण्यांतच त्यांचा अर्धा दिवस जायचा. या प्रदेशांतील लोक शांतताप्रिय, प्रामाणिक व पापभिरु असल्यामुळें सुरक्षिततेसाठीं खेडेगांवांत एकत्र वस्ती करून राहण्याची आवश्यकता त्यांना भासत नाहीं. त्यांच्या गरजाही कमी असतात. त्यामुळें त्यांना उठल्यासुटल्या बाजारांत जाण्याची जरूरी वाटत नाहीं. त्यांचें जीवित साधें व स्वावलंबी असतें. त्यामुळें शेतकरी आपल्या शेतापाशींच झोंपडी बांधून कुटुंबासह राहूं शकतो. इकडील गांवें उंच डोंगराच्या एका बाजूवर विखुरलेलीं असतात. डोंगराच्या बाजूवर ठिपक्यांसारखीं दिसणारीं पांढरीं व तांबडीं घरें डोंगराची शोभा वाढवितात. अगदीं उंच उंच डोंगरमाथ्याजवळसुद्धां जंगल तोडून, जागा साफ करून, ओटे करून त्यावर मक्याची व नाचणीची शेती केलेली आढळते. अन्नोत्पादनासाठीं मनुष्य कुठें कुठें जाऊन वस्ती करतो !

इकडचे लोक शांतताप्रिय व पापाभिरू असल्यामुळें प्रवास करतांना भीति वाटत नाहीं. प्रवासांत कित्येक वेळां चालण्याच्या नादांत मी एकटा पुढें जात असे किंवा मला वाटेंत थांबावेंसें वाटलें तर सोबत्यांना पुढें जाण्यास सांगून त्यांच्यामागून कांहीं वेळानें चालणें सुरुं करत असे. नेपाळांतील भागांतून जंगलांतून व शेतांतून एकटे जात असतांना मला कधीं भीति वाटली नाहीं. वाटेंत भेटणाऱ्या लोकांच्या कमरेला कुकऱ्या अडकवलेल्या असत. मजबूत अंगापिंडाचा कमरेला कुकरी असलेला एखादा मनुष्य तुम्हांला वाटेंत भेटला तर भीतीच वाटेल. पण येथें तशी भीति वाटत नव्हती. उलट असा एखादा उग्र पुरुष

भेटला असतां आपल्या चेहऱ्यावर हास्याची छटा दाखवली तर हास्यानें प्रत्युत्तर देण्याची त्याची तयारी असे. चाळीस दिवसांच्या आमच्या प्रवासांत श्वापदेंही आम्हांला कोठें दिसलीं नाहींत. बारा हजार फुटाखालच्या प्रदेशांत साप मधून मधून दिसत असत. परंतु लांडगे, कोल्हे अशीं जनावरें दिसलीं नाहींत. श्वापदें तराईमध्यें विशेष करून आढळतात. वर कांहीं भागांतील जंगलांमधूनसुद्धां हिंस्र पशू आहेत असें म्हणतात. परंतु पायवाटांवर व दिवसां बहुतेक श्वापदें भेटण्याची भीति नसते. हिमालयांतील वनांतून व निर्जन प्रदेशांतून एकट्या दुकट्या स्त्रिया-सुद्धां निर्भयपणें एका गांवाहून दुसऱ्या गांवाला जातात. इकडील पहाडी स्त्रियां-मध्यें मोकळेपणा आहे. त्यांचा फोटो घ्यायला उभे राहिले तरी त्या घाबरत किंवा लाजत नाहींत. जों जों उंच प्रदेशांत जावें तों तों स्त्रिया अधिकाधिक धीट आढळून येतात. घरांत स्त्रीचीच सत्ता असते एवढेंच नव्हे तर बाजारहाट करणें, करारमदार करणें यांत सुद्धां स्त्रीच पुढाकार घेते.

चौबासहून लिसांखूकडे जाणारा रस्ता त्यावर असलेल्या चिकणमातीवर पाऊस नुकताच पडून गेला असल्यामुळें निसरडा झालेला होता. आम्ही प्रत्येकजण दोनतीनदां तरी घसरून आपटलों असूं. चालतां चालतां रूसी गांधी घसरून पडले, तेव्हांपासून त्यांचा गुडघा दुखूं लागला. तो पुढें बरेच दिवस दुखत होता. त्यामुळें डोंगर उतरतांना त्यांना त्रास होई. त्या दिवशींची वाटचाल रम्य होती आकाश अभ्राच्छादित असल्यामुळें ऊन नव्हतें. उंचीवरून जात असल्यामुळें सुंदर देखावे मनाला रिझवीत होते. आम्ही दुपारीं दीड वाजतां रिसिंगो उर्फ लिसांखू या गांवीं जाऊन पोंचलों. गांव एका मोठ्या डोंगराच्या बाजूवर विखुरलेलें आहे. त्याच्या समोरच्या डोंगराला जोडणारा एक कणा आहे त्या कण्याच्या टोंकाशीं एक बौद्ध गुम्बा ( मंदिर ) आहे. त्या गुम्बाच्या वरच्या मजल्याच्या व्हरांड्यांत आम्हीं मुक्काम केला. तेथून समोरच्या डोंगरावरील लिसांखू गांवांतील घरें, दूरवरच्या डोंगरांवरून कोसळणाऱ्या जलधारा, डोंगराच्या उतरणीवरील भातशेतें वगैरेंचा देखावा उत्तम दिसत होता. मंदिराचें अंगण स्वच्छ होतें. शेजारीं वस्ती नव्हती. अशा या रम्य ठिकाणीं केवळ अर्धाच दिवस राहायला सांपडणार याबद्दल मला वाईट वाटलें.

एखाद्या गिरिनगरांतील उत्तम हॉटेलप्रमाणें तें स्थळ होतें. मुक्कामावर पोंचल्यावर एक दोन तासांतच पेंबीलालनें भोजन तयार केलें. त्याचा आस्वाद घेत व सुंदर देखाव्यांकडे पहात गुम्बाच्या बाहेरील अंगणांतच जेवण केलें. कांहीं फोटो काढायचे प्रयत्न केले. परंतु सूर्य जो ढगाआड जाऊन बसला तो रात्र पडेपर्यंत बाहेर आला नाहीं. त्यामुळें गुम्बाचे चांगले फोटो काढतां आले नाहींत. नवनीत पारेखनींही आपला सिनेकॅमेरा स्टँडवर बसवून सज्ज करून ठेवला होता. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं.

सायंकाळ झाल्यावर गांवांतील लोक भेटायला येऊं लागले व आमच्यामध्यें कुणी डॉक्टर आहे कां, अमक्या अमक्या रोगांवर औषध आहे कां असें आम्हांला विचारूं लागले. हा अनुभव आम्हांला आमच्या हिमालयांतील प्रवासांत नेहमीं आला. नेपाळ सरकारनें फिरते डॉक्टर किंवा औषधालयें अशी कांहीं सोय केलेली नाहीं. हिमालयांतील हवापाणी उत्तम असल्यामुळें तेथील लोक सहसा आजारी पडत नाहींत. पण एकदां कोणी आजारी पडलें कीं मग त्याच्या जीविताचा हवाला एक जवळ असणाऱ्या जडीबुटीवर व दुसरा दैवावर. आजारी बरा होण्यासाठीं देवाची पूजा, अनुष्ठान वगैरेचा अवलंबही ते करितात. परंतु नेमकी लागू पडतील अशीं आधुनिक औषधें मात्र त्यांना मिळूं शकत नाहींत. पहाडावरील लोक दैववादी असण्याचें हें एक कारण आहे. पाश्चिमात्यांचीं गिर्यारोहणासाठीं जीं पथकें जातात, त्यांच्यामध्यें बहुधा एक तरी डॉक्टर असतोच. त्यामुळें ज्या गांवांतून हीं पथकें पूर्वीं गेलेलीं आहेत, तेथील लोकांची असे कुणी शहरी लोक आले कीं, त्यांच्याबरोबर डॉक्टर व औषधें असणारच अशी समजूत झालेली आहे. आम्ही कुठल्याही गांवीं पोंचलों कीं लोक औषधें मागायला येत. आमच्यापैकीं कोणीच डॉक्टर नव्हते. नाहींतर त्याला गांवोगांवच्या गरीब रोग्यांना योग्य तीं औषधें देऊन त्यांचे धन्यवाद घेतां आले असते. आम्हांला ज्यांची जरूर लागेल अशीं पेटंट औषधें आम्ही आमचेबरोबर एका पेटींत घालून नेलीं होतीं. साधा ताप, डोकेंदुखी यावर आम्ही औषधें देऊं शकत होतों. ॲस्पिरीन, क्विनाईन, डोळ्यांत टाकायचें औषध, थंडीसाठीं व मुरगळण्यासाठीं लावण्याचीं मलमें वगैरे औषधें जरूर लागेल तेव्हां आमच्या भारवाहकांना व खेडुतांना देत होतों. परंतु पुष्कळ दिवसांची पोटदुखी,

डोळ्याचे विकार, मुलांचे जंत वगैरे रोगांवर औषधें मागितलीं कीं आम्ही नाईलाजानें नकार देत होतों.

दुसरे दिवशीं पहाटे पांच वाजतांच उठलों. सहा वाजतां गुम्बाचा लामा व गांवची इतर मंडळी आली. त्यांनीं गुम्बा उघडून देवाची आरती केली. मध्यें बुद्धाची मूर्ति व बाजूला महादेव गुरु व मत्स्येंद्रनाथ अशा दोन देवांच्या मूर्ति होत्या. नेपाळांतील उंच प्रदेशांत राहणाऱ्या लोकांचा धर्म बौद्ध असला तरी तो बुद्धाच्या मूळ शिकवणीनुसार राहिलेला नाहीं. त्याचें स्वरूप बरेंच पालटलेलें आहे. देवाची आरती करतांना झांज, सनई, शंख, ढोल वगैरे वाद्यें वाजविलीं जात होती. आरती झाल्यावर देवापुढें पैसे ठेवून लामाचे आभार मानून आम्ही पुढच्या प्रवासाला निघालों. प्रथम बरेंच खालीं उतरल्यावर एक दोन नाले ओलांडून जाण्यासाठीं पायांतील बूट काढावे लागले. अशा एका नाल्यापाशीं विसावा घेण्यास थांबलों असतां पद्मबहादूर नांवाच्या एका गुरख्याची गांठ पडली. तो बरोबर शेळ्या घेऊन विकण्यासाठीं काठमांडूला जात होता. पूर्वी त्यानें हैद्राबाद संस्थानांतील फौजेंत नोकरी केली होती. " मी एक पत्र लिहून दिलें तर काठमांडू येथें इंडियन ॲम्बॅसीच्या पोस्टांतून एक पाकीट विकत घेऊन, त्यावर पत्ता लिहून घेऊन पोस्टांत टाकून देशील कां ? " असें त्यास विचारलें असतां त्यानें आनंदानें कबूल केलें. म्हणून तेथेंच ओढ्याच्या कांठीं बसून पुण्यास वडिलांच्या नांवानें पत्र लिहून त्याजजवळ दिलें. त्यानें टाकलेलें पत्र व्यवस्थित पोंचलें असें पुण्यास परत आल्यावर मला कळलें.

नेपाळ सरकारचें टपाल व तारखातें आहे. परंतु देशांत टपालाची सोय मात्र अगदीं नाममात्र आहे. काठमांडू येथें भारतांतून व परदेशांतून येणारीं व जाणारीं पत्रें इंडियन ॲम्बॅसीच्या पोस्टांतूनच जातात. नेपाळी टपालखातें फक्त देशांतील जिल्ह्याच्या प्रमुख गांवीं पत्रांची नेआण करते. आमच्या काठमांडू ते नामचे बझार या प्रवासांत आम्हांला एकही प्रमुख गांव लागणार नव्हतें. त्यामुळें प्रवासांतून घरीं पत्रें पाठविण्याची कांहीं सोय नव्हती.

मांगा देवराळी हें आमचें पुढचें मुक्कामाचें गांव. आठ हजार फुटावर घाटमाथ्याजवळ होतें. त्यासाठीं खूप चढावें लागलें. वाटेंत कांहीं लोक एका शेतांत मक्याचीं कणसें तोडत होतीं. जवळच आग पेटवलेली होती. तेथें आम्ही

सर्वांनीं जाऊन, ताजीं मक्याचीं कणसें भाजून घेऊन यथेच्छ खाल्लीं. आम्हांला रोजच्या प्रवासांत शारीरिक कष्ट खूप होत असल्यामुळें, कांहीं खाल्लें तरी पचत होतें. गांवापाशीं पोंचल्यावर एक गंमत झाली. एक मुलगा बाह्यांत हात न घालतां, कोट तसाच खांद्यावर अडकवून चालला होता. नवनीतना वाटलें कीं त्या बिचाऱ्याला हात नाहींत; म्हणून त्यांनीं त्याला देण्यासाठीं एक मोहोर काढली. त्या मुलानें ती घेण्यासाठीं हात पुढें केला तेव्हां नवनीतना आश्चर्य वाटलें. साहजिकच मोहोर ( पन्नास पैसे ) देण्याचा विचार बदलून त्या ऐवजीं 'पचन्नी', ( वीस पैसे ) त्यांनीं खिशांतून काढून दिलें.

त्या दिवशीं दहा मैल रस्ता चाललों. मांगा देवराळीला एका सुखवस्तु शेतकऱ्याच्या घरांतील पडवींत मुक्काम केला. घरांत शिरतों न शिरतों तोंच जोरांत पाऊस सुरू झाला, थोडक्यांत बचावलों. रात्रीं झोपण्यापूर्वीं दैनंदिनी लेखन, नकाशा अभ्यासणें वगैरे गोष्टी केल्या. सकाळीं लवकर उठून पुढच्या प्रवासाला सुरवात केली. सुरवातीचा तासभर रस्ता डोंगर माथ्यावरून जात होता. गौरीशंकर व त्याच्याजवळची हिमाच्छादित शिखरांची रांग दिसत होती. पुढें उतरणीस सुरवात झाली. रस्ता पाइन ( चीड ) वृक्षांच्या राईतून जात होता. मधून मधून झाडें तोडलेलीं दिसत होतीं. पाइनच्या तेलाचा सुगंध सगळीकडे दरवळला होता. तेथील वनश्री पाहून काश्मीरमधील गुलमर्गची आठवण झाली. सुमारें तीन हजार फूट खालीं उतरून चर्णावती खोऱ्यापाशीं आलों. खोऱ्यावर अरुंद झुलता पूल होता. दोन्ही बाजूला जाड साखळदंड व त्याला लोखंडी पट्ट्यानें बांधलेली देवदाराची फळी. कोणी चालूं लागलें कीं तो पूल खूप हाले. त्यामुळें एका वेळेस दोघांना पुलावरून जाणें जरा कठिण होत होतें. पुलावरून जातांना खालीं खडकावरून तुफान वेगानें वाहणाऱ्या पाण्याकडे बघवत नव्हतें. नाल्यापाशीं उतरून पाण्यांत मनसोक्त आंघोळ करून आम्ही श्रमपरिहार केला, नंतर पुन्हां दोन तास चढण चढून किरंतीछाप गांवापाशीं पोंचलों. भारवाहक सहसा आमचे मागून हळूं हळूं येत. परंतु त्या दिवशीं आम्हीं आंघोळ करण्यांत तास दीडतास घालवल्यामुळें ते आमचे आधीं मुक्कामावर जाऊन पोंचले. आमच्या भारवाहकांपैकीं बरेचजण पूर्वीं नामचे बझारला जाऊन आलेले असल्यामुळें त्यांना मार्ग माहीत होता. आमचा मार्ग म्हणजे

पायवाट असे. कित्येक वेळां दोन दिशेला जाणाऱ्या पायवाटा भेटत. तेव्हां कुठची वाट धरावी याबद्दल मनांत गोंधळ होई. कधीं कधीं अंदाजानें एक वाट धरून पुढें जो कोणी भेटेल त्याला आमच्या पुढील मुक्कामाच्या गांवाचें नांव घेऊन, "कयो बाटो ?" असें नेपाळी भाषेंत विचारायचें. "एही बाटो" असें त्यानें उत्तर दिल्यावर आपण बरोबर चाललों आहोंत असें समजून पुढें चालू लागायचें. या पहाडी लोकांना धूम्रपान करण्याचा फार शोक आहे. आम्ही एखाद्याला सिगरेट दिली कीं तो एखादी किंमती वस्तू भेट मिळाल्याप्रमाणें खूष व्हायचा. दोन्ही हात पुढें करून अगदीं नम्रपणें व सस्मित नजरेनें त्या सिगरेटचा स्वीकार करायचा. पहाडी व शेर्पा स्त्रियासुद्धां धूम्रपान करतात. जेथें जेथें आम्ही मुक्काम करीत होतों, तेथील घरमालकिणीला सिगरेट दिली, कीं मग ती आमच्या येण्यानें होणारी गैरसोय आनंदानें सहन करी. शिवाय जाण्यापूर्वी आम्ही रोख बक्षिस देत होतोंच.

किरंतीछापहून पुढें याशांचे वाटेवर तामाकोसी नांवाची मोठी नदी लागली. तिच्यावर मजबूत झुलता पूल होता. त्या दिवशींच्या पायटीची आम्हांला चांगलीच आठवण राहील. नकाशावरून पाहून याशां फक्त आठ दहाच मैल असेल, अशी कल्पना आम्ही केली होती. परंतु याशांला पोंहोचेपर्यंत खूपच चालावें व चढावें लागलें. काठमांडूहून बरेंच दूर आल्यामुळें वाटेंत भेटणाऱ्या लोकांची ये जा कमी झाली होती. कधीं कधीं तास तास वाटेंत कोणी भेटत नसे, त्यामुळें आम्ही धरलेली वाट बरोबर आहे कीं नाहीं हें कुणाला विचारून नक्की करतां येत नसे. आमचे भारवाहक मागें होते. बऱ्याच वेळानें वाटेंत कोणी भेटले म्हणजे याशां कोणीकडे व किती दूर आहे असें त्याला विचारावें. कोणी 'हें जवळच आहे,' कोणी 'एक कोस', कोणी 'अर्धा कोस' असें सांगत होते. पण कितीही चाललें तरा याशां दूरच होतें. अंदाजापेक्षां एखादें गांव दूर आहे असें कळून आलें कीं आपण थकून जातो, व अशा थकलेल्या अवस्थेंत आपण बरेंच अंतर चाललों आहोंत असें वाटतें, आमचे तसें झालें. किती वेळ याशां येईना. शेवटीं कांहीं घरें दिसूं लागलीं व याशां अगदीं जवळ आल्यासारखें वाटलें. तेथें कांहीं माणसें भेटलीं. खात्री करून घेण्यासाठीं त्यांना विचारलें. त्यांनीं जवळच्या सुमारें आठशें फूट उंचीच्या टेकडीकडे बोट करून याशां त्या टेकडीवर आहे. तेव्हां

मुक्काम्यानें ती टेकडी चढूं लागलों. याशीं गांवाबाहेर धर्मशाळा होती तेथें उतरलों. त्यादिवशीं दोनतीन हजार फूट चढ उतार व जवळजवळ चौदा मैल चाल झाली.

काठमांडूहून निघाल्यापासून आम्हांला सहा दिवस झाले होते. पुढील मुक्कामाचें गांव मेकचन हें होतें. तेथें लहानसा बाजार आहे हें कळलें होतें. आम्हांला व आमच्या भारवाहकांना तांदूळ, आटा वगैरे वस्तु घ्यायच्या होत्या. याशींहून निघाल्यावर सुमारें पंधराशें फूट चढण चढून आम्ही एका घाटावर आलों. तेथें दाट धुकें होतें. त्यामुळें आम्ही नऊ हजार फूटांवर होतो तरीही आम्हांला हिमशिखरें दिसलीं नाहींत. एवढें उंच चढून गेल्यावर हिमशिखरें दिसलीं असतीं तर श्रमपरिहार झाला असता. या घाटापुढील मार्ग मात्र रमणीय होता. हिरवळीनें आच्छादलेल्या जमिनीवरून वळणें घेत वाट हळूंहळूं उतरत होती. खालीं खिमटी खोल्याचा प्रवाह दूरवर दिसत होता. नेपाळ हिमालयांतील मार्गावर आवाज करीत जाणाऱ्या बैलगाड्या नाहींत. दौडत जाणारे घोडे नाहींत. वेगानें धांवणाऱ्या व धूळ उडवणाऱ्या मोटारी नाहींत. शांतपणें, कुणाचाही उपद्रव न होता रमत गमत चालत जाण्याचें सौख्य हिमालयांतच अनुभवावें. खिमटी खोल्यापाशीं पोंचल्यावर आम्ही आंघोळ केली. पाणी अत्यंत थंड असून वेगानें वहात होतें. म्हणून आंघोळ चटकन उरकावी लागली. पलीकडच्या तीरावर चाळीस पन्नास रेड्यांचा एक तांडा होता. जोरानें वाहणाऱ्या त्या प्रवाहांतून रेड्यांना ह्या तीरावर आणण्याची खटपट कांहीं माणसें करीत होतीं. ती गंमत पहात आम्ही बसलों. एक माणूस प्रवाहांतून, पायाखालीं असलेल्या दगडावरून उड्या मारीत इकडे आला. त्यानें आपल्याबरोबर एक लांब दोराचें टोंक आणलेलें होतें. त्या दोराला दुसरा मोठा जाड दोर बांधून तो इकडे खेंचून घेतल्यावर तिकडे असलेल्या माणसांनीं पांच रेडे दोराला बांधून त्यांना पाण्यांत ढकलिले. ते रेडे पोहून इकडे येऊं लागले. प्रवाहाबरोबर वाहून न जातां त्यांनीं सरळ इकडे यावें म्हणून इकडचीं माणसें दोर ओढून घेत होतीं. किनाऱ्याला लागण्यापूर्वी रेडे जवळजवळ गारठून जात. परंतु किनाऱ्याला लागल्यावर एक दोन मिनिटांतच प्रवाह ओलांडण्याचें आपलें साहस विसरून जाऊन संथपणें गवतावर चरूं लागत. हे रेडे काठमांडूला

दसऱ्याच्या दिवशीं बळी देण्यासाठीं नेले जात होते. काठमांडूला दसऱ्याचा उत्सव जोराचा होतो. पूर्वीच्या राजवटींत दसऱ्याच्या दिवशीं शेंकडों रेड्यांचें बलिदान होत असे. प्रत्येक लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांनीं एकेक रेड्याचा बळी दिला पाहिजे असा रिवाज होता. दसऱ्याचें दिवशीं हनुमान चौकांत काळभैरवाच्या मूर्तीपुढें, बळी पडलेल्या रेड्यांचा ढीग होत असे. आतां हें कमी झालें आहे. तरी अजूनही रेड्यांचा बळी दिला जातोच.

त्यादिवशीं गायतोंडे सकाळीं आमच्याबरोबर चालत निघाले, ते नंतर कित्येक तास दिसलेच नाहींत. ते कुठें गेले असतील याचें आश्चर्य करीत खिमटी खोल्यापाशीं आम्ही विश्रांति घेत बसलों होतों. कांहीं वेळानें ते आले. ते आम्ही कल्पना केल्याप्रमाणें ते वाट चुकून भलतीकडेच गेले होते. वाट चुकल्यामुळें त्यांना तीनचार मैल जास्त पायपिटी करावी लागली. खिमटी खोल्याच्या बाजूनें पुढे चालत जाऊन आम्ही झुलत्या पुलावरून पलीकडे गेलों. थोड्याच अंतरावर मेकचन गांव होतें. तेथें नेपाळ सरकारची एक लष्करी चौकी होती. तेथील नाइक भक्तबहादुर यानें आमचा परवाना पाहण्यास मागितला. परवाना पाहिल्यावर मात्र त्यानें आमच्या तेथील मुक्कामांत आम्हांला चांगली मदत केली. मेकचन गांव पूर्वीपासून लोखंडी सामानाबद्दल प्रसिद्ध आहे. तेथें जवळच लोखंडाच्या खाणी आहेत. जंगलतोड खूप झाल्यामुळें पुरेसा कोळसा जवळपास तयार होत नाहीं म्हणून खाणींतून लोखंड काढून तें शुद्ध करण्याचें काम जोरांत चालत नाहीं. पूर्वी तेथें सरकार बंदुका तयार करीत असे. त्या कारखान्याची यंत्र सामुग्री अद्याप जशीच्या तशी ठेवलेली आहे. आम्ही कॅमेरे घेऊन गांवांत हिंडत असल्यामुळें वीसतीस माणसांचा थवा आमच्यामागें हिंडत होता मेकचन येथें पत्र लिहून त्यावर नेपाळी पोस्टाचीं तिकिटें लावून आम्ही नाईक भक्तबहादुर यांजजवळ दिलीं व सरकारी टपाल घेऊन जाणाऱ्या माणसाबरोबर पाठवून देण्यास सांगितलें.

भारवाहकांना धान्य व मीठ वगैरे वस्तु घेण्यास वेळ लागला म्हणून दुसऱ्या दिवशीं आम्हीं उशीरा निघालों. मी, नवनीत, नाइक भक्तबहादूर याला बरोबर घेऊन मेकचनहून तीन मैलांवर असलेल्या चुचुरी या गांवीं बिर्खबहादूर नांवाच्या गृहस्थास भेटण्यास गेलों. कांहीं वर्षांपूर्वी मीरतचे प्रोफेसर बानर्जी नेपाळमध्यें



खुंबु बर्फप्रवाहावरील मनोऱ्याच्या पायथ्याशीं



बर्फाचे मनोरे

परिभ्रमणासाठीं आले होते. त्यांनीं बिर्खबहादुरच्या कुटुंबाचा फोटो काढला होता. आम्ही नामचे बझारला जाणार हें कळल्यावर तो फोटो त्यांनीं आमच्याकडे पाठवला होता. चुचुरी गांवीं बिर्खबहादुरांना भेटून तो फोटो दिला. आम्हांला ताजें दूध देऊन त्यांनीं आमचें स्वागत केलें. डोंगरांतील एका खेड्यांत राहणारे ते सद्गृहस्थ सुखवस्तु दिसले. त्यांना हिंदुस्तानी येत नव्हतें, व आम्हांला त्यांची भाषा येत नव्हती. नाइक भक्तबहादुर दुभाष्याचें काम करीत होता. बिर्खबहादुरांच्या पत्नीच्या कानांत मोठा दागिना होता. तो पाहून नवनीतनीं त्या पति-पत्नींचा नेपाळी पेहेरावांत फोटो काढण्याची इच्छा दर्शविली. बिर्खबहादुर व सुब्रलक्ष्मी घरांत जाऊन उत्तम पोषाक करून आले. तेथें जवळच गुम्बा होता. त्यांत इकडच्या पद्धतीप्रमाणें बुद्ध देव व आणखी दोन देवतांच्या मूर्ति होत्या. बिर्खबहादुरांचा निरोप घेऊन आम्ही निघालों, आणि जवळजवळ एक हजार फूट चढण सपाट्यानें चढलों. चढत चढत च्यांग्माला घाटावर आलों. त्या घाटाची समुद्रसपाटीपासून उंची सुमारें दहा हजार फूट होती. घाटमाथ्यावर माणि भिंती होत्या, त्यावर "ओम् मणि पद्मे हुं" हा मंत्र कोरलेले दगड रांगेनें लावलेले होते. अशा भिंती वाटेंत जागोजागीं व विशेषतः वळणावर व घाटमाथ्यावर आढळून येतात. घाटमाथ्यावर असलेल्या मणिभिंतींना 'देवराली' असें सुद्धां म्हणतात. यापुढें आम्ही ज्या प्रदेशांत पायचाल करीत होतों, त्यांतील रहिवाशी बहुतेक बौद्धमार्गी असल्यामुळें अशा मणिभिंती व चोर्टेन ठिकठिकाणीं आढळून येत होते. चोर्टेन म्हणजे छोटा स्तूप. त्यावरही "ओम् मणि पद्मे हुं" हा मंत्र कोरलेला असतो. रस्त्यांत मणिभिंत व चोर्टेन भेटले कीं त्याच्या डाव्या बाजूनें जायचें असा प्रघात आहे. पुढें पुढें शेर्पांच्या सोलाखुंबु नांवाच्या प्रदेशांत मणिभिंती व चोर्टेना यांचा सुळसुळाट दिसून येत होता. त्यांना वळसा देऊन जायचें थकलेल्या पायांना नकोसें वाटे, "ओम् मणि पद्मे हुं" या मंत्राचा अर्थ नीट लागत नाहीं. पण (हृदय) कमळामध्यें असणाऱ्या (रत्नाचा) देवाचा जयजयकार असो" असा कांहींसा त्याचा अर्थ आहे.

च्यांग्माला घाटावरून एक तासांत सुमारें दीड हजार फूट उतरल्यावर बामडीभांडार हें गांव लागलें. तेथें धर्मशाळेंत वस्ती केली. दिवसेंदिवस उंच

प्रदेशांत जात असल्यामुळें थंडी भासूं लागली होती. येथें मीं माझे गरम कपडे व झोंपण्याची पिशवी वापरण्यास काढली. उंच पर्वतावर गिर्यारोहण करण्यासाठीं ' स्लिपिंग बॅग ' अवश्य लागते. ती जलाभेद्य कापडाची रजईसारखी बनवलेली असून तिच्यांत बारीक बारीक व निवडक पिसें भरलेलीं असतात. त्यामुळें ती खूप उबदार होते. तिचा आकार पिशवीसारखा असल्यामुळें झोंपण्यासाठीं पाया-कडून आंत शिरावें लागतें.

रात्रीं लवकर झोंपण्यामुळें सकाळीं लवकर जाग आली. साडेचार वाजतां उठून शौचमुखमार्जन केलें. चहा पिऊन साडेपांच वाजतां निघालों. आम्ही आटीव दुधाचे बंद डबे बरोबर नेले होते. रोज एक डबा उघडत होतों. त्यामुळें जागोजागीं दुधाचा तपास करण्याची गरज भासली नाहीं. वाटेंत अनायासें कोठें दूध मिळालें तर तें चहासाठीं किंवा नुसतें पिण्यासाठीं घेत होतों. परंतु आमचा एकंदर अनुभव असा कीं, दूध किंवा दही मागितल्या-बरोबर लगेच क्वचितच मिळालें. वाटेंत झोपडी भेटली कीं, " आम्ही दूध, दही, अंडीं वगैरे आहेत काय ? " म्हणून विचारायचें. त्याला बहुतेक " छाइ ना " म्हणजे ' नाहींत ' असें नेपाळी भाषेंत उत्तर यायचें. भारवाहक बहुतेक सकाळीं खाऊन निघायचे. ते भात किंवा मक्याचें पीठ शिजवून खात असत. इकडे भाकरी किंवा चपात्या खाण्याचा प्रघात नाहीं.

बामडीभांडारहून निघाल्यावर लिखुखोला ओलांडण्यासाठीं दीड हजार फूट खालीं उतरलों. काठमांडू ते नामचे बझार या प्रवासांत आम्ही उत्तर दक्षिण असणारी नद्यांचीं खोरीं ओलांडून जात असल्यामुळें रोज चढावें व उतरावें लागत होतें. एका डोंगरावर चढायचें; डोंगर उतरून तळाशीं असलेल्या नाल्याच्या पलीकडे जायचें व पुन्हां डोंगर चढूं लागायचें. कधीं आधीं चढण तर कधीं आधीं उतरण, एवढाच फरक व्हायचा. वाटेंत एक छोटा नाला लागला त्यावर झाडांचे दोन ओंडे टाकून पूल बनविला होता. त्यावरून चालण्याची कसरत करावी लागली. नाल्याजवळच्या गवताळ व दलदलीच्या भागांतून चालूं लागले म्हणजे जळवांचा त्रास होत असे. जळवा मार्गातील उंच गवतावर किंवा झुडुपांवर बसलेल्या असतात, व त्या गवताला किंवा झुडुपाला स्पर्शून आपण गेले म्हणजे

नकळत आपल्या कपड्यावर व अंगावर चढतात आणि रक्तशोषण करूं लागतात. कांहीं वेळानें खाज सुटूं लागली किंवा शरिरावर रक्ताचा डाग दिसूं लागला कीं आपल्या लक्षांत येतें. मग ती रक्त पिऊन फुगलेली जळू चिमटींत धरून जोरानें ओढून काढून फेंकून द्यावी लागते. शर्टच्या कॉलरजवळील पोकळींतून बुटाच्या वरच्या भागांतून किंवा लेसेससाठीं केलेल्या भोंकांतून त्या आंत जातात. जळवा असलेल्या प्रदेशांतून जातांना आम्हांला दर एकदोन मैलांनीं बूट काढून पायावर जळवा आहेत कीं काय हें बघावें लागे. कांहीं कांहीं माणसांवर जळवांचा हल्ला जोराचा होतो. आमच्यापैकीं नवनीत व गायतोंडे यांना जळवांचा विशेष त्रास होई. त्यांनीं बूट मोजे काढले म्हणजे दोनतीन तरी जळवा त्यांच्या गोड रक्ताचा आस्वाद घेत असलेल्या सांपडत. जळवा असलेल्या प्रदेशांतून जाऊं लागलें कीं गायतोंडे बेचैन होऊन जात असत. त्या दिवशीं दुपारीं आम्ही तीन वाजतां साडेदहा हजार फूट उंचीवर असलेल्या सेंटे या गांवीं जाऊन पोंचलो. तेथें एक गुम्बा होता, पण तो बंद करून लामा परगांवीं गेलेला होता, म्हणून जवळच्या एका घरांत रहायची सोय करून घेतली. त्या गुम्बाजवळच आठ फूट उंचीचें मोठें माणिचक्र होतें. हें माणिचक्र म्हणजे ज्यावर "ओम् माणि पद्मे हुं" हा मंत्र हजारों वेळां लिहिलेला आहे असा एक मोठा फिरता ड्रम होता. तो एकदां फिरविला म्हणजे त्यावर जितके वेळां तो मंत्र लिहिलेला असेल तितके वेळां तो मंत्र जपल्याचें पुण्य मिळतें. त्या चक्राची प्रदक्षिणा पुरी झाली हें कळण्यासाठीं वरचे बाजूला एक छोटी घंटा अडकविलेली असते. कांहीं कांहीं गांवीं जेथें डोंगरांतून पाट काढून पाणी आणलेलें असतें, तेथें तर पाण्यावर चालणारीं माणिचक्रें बांधलेलीं असतात. ती अव्याहत चालू राहून गांवकऱ्यांना दररोज लाखो वेळां मंत्र जपल्याचें पुण्य प्राप्त करून देतात.

नेपाळांतील हिमालयांत प्रवास करतांना आम्हांला पाण्याचें दुर्भिक्ष क्वचितच आढळलें. मार्गावर थोड्या थोड्या अंतरावर, डोंगराच्या खोबणींतून वाहत येणाऱ्या जलधारा दिसायच्या. प्रथम प्रथम मी मुक्कामावरून निघतांना, गळ्यांत अडकविण्याची पाण्याची बाटली भरून घेत असे. परंतु जागोजाग आढळणारें ताजें व स्वच्छ पाणी पाहून, पाण्याचें ओझें वाहण्याचें मीं सोडून दिलें. माझ्या पाठीवरील रकसॅकमध्यें मी कॅमेरा, स्कार्फ, नोटबुक, नकाशा, छोटी दोरी,

वाटेंत खाण्यासाठीं घेतलेलीं बिस्किटें, वाटेंत आंघोळ करण्यासाठीं टॉवेल व चड्डी व लोंकरीचा स्वेटर एवढ्या वस्तू ठेवीत असे.

सेंटेहून निघाल्यावर सुमारें अडीच हजार फूट वर चढून आम्ही लाम्जुरा भन्यांग् या घाटावर पोंचलों. त्याची उंची समुद्र सपाटीपासून साडेबारा हजार फूट होती. आतांपर्यंत ओलांडलेल्या कुठल्याही घाटापेक्षां हा घाट सर्वांत अधिक उंच होता. घाटमाथ्यावर देवराळीपाशीं गार व झोंबणारा वारा वाहात होता. तेथून दूरवरचीं शिखरें दिसतील या आशेनें मी जोरांत चालत सर्वांच्या पुढें गेलों होतों. परंतु ढगांमुळें कांहीं दिसलें नाहीं. ढग नसते तर तेथून आम्हांला एव्हरेस्टचें दर्शन झालें असतें. सोबत्यांची वाट पहाण्यासाठीं मला तेथें कांहीं वेळ थांबावें लागलें. वाऱ्यापासून बचाव करण्यासाठीं एका मणिभिंतीच्या आडोशाला बसून राहिलों होतों. ते आल्यावर आम्हीं सर्वजण खालीं उतरूं लागलों. पाऊस पडूं लागला. आधींच थंड वाटत होतें, त्यांतून पावसाचा मारा सुरू झाला. पण सुदैवानें ओलेंचिंब होण्याचें आंतच वाटेंत एक झोंपडी आढळली. तेथें आश्रय घेऊन पाऊस थांबल्यावर पुढें उतरूं लागलों. बरेंच उतरून गेल्यावर ठाक्टो गुम्बा नांवाचें गांव लागलें. तेथें गुम्बा होता. त्यांस लागूनच शेर्पा कुटुंबाचें घर होतें. त्या घरांत तिबेटी पद्धतीची चहा बनवण्याची नळकांडी पाहून नवनीतनीं "चहा बनवून द्याल कां?" असें घरमालकिणीला विचारलें. तिनें ताबडतोब 'हो' म्हणून पांच मिनिटांत चहा बनवून दिला. तिबेटी चहा पिण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग, तो आपल्यासारखा गोड नसतो. पाण्यास आधण आल्यावर त्यांत चिनी चहाची पत्ती घालतात. चहा तयार झाल्यावर त्यांत लोणी व मीठ घालून तो दोंग्मु नांवाच्या नळकांडेवजा पात्रांत घालून दट्ट्यानें घुसळतात. पुरेसा घुसळला कीं तो सुरईत ओतून मग पाहुण्यांच्यापुढें ठेवलेल्या चिनी मातीच्या पात्रांत तो ओततात.

त्या चहाची चव खारट आणि आपल्या चहापेक्षां अगदींच वेगळी अस-ल्यामुळें तो आवडत नाहीं, परंतु अगदीं टाकाऊही वाटत नाहीं. कदाचित् बरेच वेळा प्याल्यावर तो आवडूं लागेल. त्यांनीं केलेल्या आतिथ्याबद्दल, स्त्रियासुद्धां घरांतील सर्व लोकांना आम्ही सिगारेट्स दिल्या. साहजिकच ते खूष झाले.

ठाक्टो गुम्बाहून निघून तासाभराच्या चालीनंतर आम्ही जुनबेसी गांवांला जाऊन पोचलों.

बेनी खोल्याच्या तीरावर वसलेलें जुनबेसी हें बऱ्यापैकीं गांव होतें. तेथें एक मोठा गुम्बा होता. त्याच्या पडवींत आम्ही मुक्काम केला. गुम्बामध्यें बुद्धाची खूप मोठी मूर्ति होती. भिंतीमध्यें शंभर दोनशें कोनाडे होते. त्या प्रत्येक कोनाड्यांत हस्तलिखित पोथी होती. या पोथ्यांना तंजूर आणि कंजूर असें म्हणतात. त्या प्रत्येकीं एकशें आठ असतात. त्यांची लिपि तिबेटी असते, व फारच थोड्यांना ती वाचतां येते. भिंतीवर जेथें कोनाडे नव्हते तेथें सुंदर चित्रें काढलेलीं होतीं. काठमांडूपासून आम्ही शंभर मैल आलेलों होतों. यापुढें आम्ही शेर्पांच्या सोलाखुंबु तालुक्यांत प्रवेश करणार होतो. चौबास व मांगा देव-राली येथें घेतलेलें भारवाहक परत गेले व जुनबेसी येथें कांहीं नवे भारवाहक घेतले. जुनबेसीच्या पुढें रिम्मा या गांवावरून जाण्याचा आमचा मूळचा बेत होता. पण जुबिंगजवळ दुधकोसी नदीवर पूल नाहीं, असें आम्हांला कळलें. म्हणून राचेवा व कार्योलंग या मार्गानें नामचे बझारला जायला निघालों. आमच्या कांहीं भारवाहकांनीं आपल्याला एक दिवसाची विश्रांति मिळावी म्हणून कांहीं उपभारवाहक घेतले होते. त्यांत कांहीं स्त्रियाही होत्या. थंडी बरीच होती. सूर्य वर आल्यावर बरें वाटलें. एका नाल्याच्या बाजूनें देवदार वृक्षाच्या राईतून सुमारें पांच मैल चढणीचा मार्ग आक्रमल्यावर राचेवा या ठिकाणीं देवदारच्या वनांत एक झोंपडी लागली. तेथें एक गुराखी आपल्या गायी व झब्बू ( याकसारखीं जनावरें ) घेऊन रहात होता. पुढें वाटेंत मुक्काम करण्यास जागा मिळणार नाहीं म्हणून येथेंच मुक्काम करावा असें भारवाहकांनीं सुचवलें. त्यावेळेस सकाळचे अकरा वाजले होते. आणखी काटतां येईल तितकें अंतर काटून पुढें जाण्याची इच्छा होती. परंतु भारवाहक पुढें येण्यास तयार होईनात. तेव्हां शेवटीं नाईलाजानें तेथेंच मुक्काम करण्याचें ठरवलें. दुसऱ्या दिवशीं खूप उंच चढण व उंच पर्वतावरील निर्जन प्रदेशांतून जात असलेली वाट पाहिल्यावर भारवाहकांचें म्हणणें बरोबर होतें, हें आम्हाला पटलें.

# प्रवासांतील दोन खडतर दिवस

त्या दिवशीं राचेवा येथें प्रथमच आम्ही आमचे तंबू उभारले व त्यांत राहिलों. आम्ही हिमालयन क्लबकडून हलक्या वजनाचे व वाताभेद्य तंबू भाड्यानें घेतले होते. कांहीं तंबू दोन माणसें जेमतेम झोंपूं शकतील एवढ्या आकाराचे होते. सायंकाळीं आम्ही तंबूंत शिरल्यापासून पाऊस पडूं लागला. तंबू वाताभेद्य होते, तरी जलाभेद्य नव्हते. पाऊस पडूं लागल्यावर थोड्या वेळांतच पाणी आंत येऊं लागलें. मी व नवनीत एका तंबूत झोपलों होतों. पाणी आंत आल्यानें आमच्या झोपण्याच्या पिशव्या ओल्या झाल्या. परंतु आसऱ्याकरितां कोठें जावें ? गुराख्याची जी झोपडी होती तींत सर्व भारवाहक पहुडले होते. पाऊस थांबेना, झोपण्याच्या पिशव्या ओल्याचिंब झाल्या. सायंकाळीं खिचडी व दही यावर वाजवीपेक्षां जास्त ताव मारल्यामुळें, आणि त्यावर रात्रीं दूध प्याल्यामुळें मला अपचन होऊन वांत्या झाल्या. भर पावसांत मला तंबूचे बाहेर जाऊन यावें लागलें. झोपण्याच्या पिशव्या ओल्या झाल्यामुळें थंडी वाजूं लागली. तंबूच्या छतावरून पाणी खालीं ठिपकतच होतें. मध्यरात्रीचे सुमारास मी गांधी बंधूंचें तंबूपाशीं जाऊन, मला झोपण्यांस थोडी जागा द्या असें त्यांना सुचविलें. त्यांचा तंबू जरा मोठा होता व आंतील जागा बरीच कोरडी राहिली होती. मी त्यांचें तंबूंत झोपलों. नवनीतनीं तंबूतून बाहेर येण्याचा कंटाळा केला. त्याचा परिणाम म्हणजे त्यांना हुडहुडी भरली व ते दुसऱ्या दिवशींची मोठी चढण मोठ्या कष्टानें चढले.

सकाळीं उठल्यावर ओले तंबू व ओल्या झोपण्याच्या पिशव्या तशाच गुंडाळून घेऊन चालायला सुरवात केली. रात्रीची झोप अपुरी व अस्वस्थ होती. त्यामुळें सकाळीं पुरेसा उत्साह वाटत नव्हता. त्या दिवशींची चढण एवढी जबरदस्त असेल याची आम्हांला कल्पना नव्हती. त्या चढणीनें सर्वांची खात्री केली. रात्रीं त्रास झाल्यामुळें विशेषतः मी व नवनीत पारेख चांगलेंच दमून गेलों होतों. आम्ही बारा हजार फुटांवर चढत असल्यामुळें विरळ हवेचा परिणाम जाणवूं लागला. मी लवकर लवकर दमूं लागलों. विरळ हवा हा एक प्रकारचा

अज्ञात शत्रूच आहे. उभी चढण, खडबडीत किंवा धोक्याची वाट, जंगल, पाऊस व वादळ या गोष्टी प्रत्यक्ष दिसत असल्यानें त्रास कां होतो हें कळतें. पण दहा हजार फुटाचेवर चढतांना हवा व ऑक्सिजनची कमतरता यामुळें आपण लवकर लवकर थकून जात आहोंत हें लक्षांत येत नाहीं, राचेवा येथें आम्ही सुमारें बारा हजार फुटावर होतों. सुमारें साडेतेरा हजार फुटांपर्यंत झाडेंझुडपें होतीं. आदल्या रात्रीच्या पावसामुळें सगळीकडे ओलें ओलें झालें होतें साडेतेरा हजार फुटाचें पुढें वनस्पती दिसेनाशीं होऊन चोहींकडे उघडे खडक दिसूं लागले. जसजसें उंच चढूं लागलों तसतसे चढण्याचें श्रम अधिक होऊं लागले. अज्ञात शत्रूचा हल्ला जोरदार वाटूं लागला. मी व नवनीत आस्ते आस्ते चढत होतो. आमच्यापुढें गेलेले आमचे सोबती व भारवाहक दूरवर चढतांना दिसत होते. परंतु त्यांना गांठण्यासाठीं आम्हाला झपाट्यानें चढतां येत नव्हतें; आजूबाजूला मोठ्या मोठ्या शिळा, दरडी, डोंगराची उघडीं बोडकीं टोकें, आणि पूर्ण शांतता यांच्यामुळें एका नव्याच जगांत आल्यासारखें वाटत होतें. तिथल्या लोकांनीं त्या निर्जन व उंच प्रदेशांतून वाट कशी शोधून काढली असेल असा विचार मनांत येत होता. सुमारें साडेचौदा हजार फुटावर "लापचाचूच" नांवाची पहिली बारी लागली. नवनीत मागें राहिले होते. त्यांची वाट पहात तेथें कांहीं वेळ बसलों. कांहीं भारवाहकांना मुद्दाम मागें थांबवून ठेवलें. कारण वाट चुकलों असतो तर एवढ्या उंचीवरील निर्जन व थंड प्रदेशांत आमचे हालच झाले असते. नवनीतबरोबर येत असलेल्या भारिया नाइकाला हा मार्ग माहीत नव्हता. उंचीवर ढग व धुकें असल्यामुळें एवढें उंच चढून गेलों असतांही बारीवरून हिमशिखरांचें दृश्य दिसलें नाहीं. दीड दोन हजार फूट उतरून एका ओढ्यापाशीं आलों. तेथें रूसी व होमी गांधी व गायतोंडे आमची वाट पहात बसलेले होतें. तेथें बिस्किटें व लोणी खाऊन पुन्हां पुढें चालण्यास सुरवात केली. भारवाहक आमच्या इतके थकलेले दिसत नव्हते. आमच्यावर मात्र विरळ हवेचा चांगलाच परिणाम होत होता. वीस दिवसांपूर्वींच मी समुद्रसपाटीवर होतों. पंधरा हजार फुटाच्या उंचीवर मी प्रथमच गेल्यानें ती उंची मला खूप जाणवत होती. समुद्रसपाटीवर हवेचा जो दाब असतो, तो अकरा हजार फूट उंचीवर एक तृतीयांशानें कमी होतो. हवेचा दाब अठरा हजार फुटांवर निम्मा व अठ्ठावीस

हजार फुटांवर एक तृतीयांश होतो. आपल्या श्वासाबरोबर फुफ्फुसांत जाणारा पुरवठाही त्याच प्रमाणांत कमी होत जातो. त्यामुळें दमछाट होतें. अन्न मिळालें नाहीं तर पोटाची उपासमार होतें; प्राणवायु मिळाला नाहीं तर छातीची उपासमार होते. ऑक्सिजनचा पुरवठा कमी झाल्यामुळें रक्त शुद्ध करण्याचें काम फुफ्फुसें आवश्यक तितक्या वेगानें करू शकत नाहींत. इकडे शारीरिक कष्ट होत असल्यामुळें रक्त शुद्धीची गरज तर अधिकाधिक भासूं लागतें. त्यामुळें थोडेसें श्रम केलें कीं, अंगांतील शक्ति गेल्यासारखें होऊन थकवा वाटूं लागतो. अशावेळेस रक्तशुद्धीचें काम लवकर होण्यासाठीं जोरानें व मोठा श्वास घ्यावा लागतो. विरळ हवेंत चालतांना कसे श्रम होतात तें मी पूर्वी गिर्यारोहणावरील पुस्तकांत वाचलें होतें. त्या दिवशीं प्रत्यक्ष अनुभव आला. कितीही वेळ विश्रांति घेतली तरी पुन्हां दहापंधरा पावलें टाकलीं कीं, पायांतील शक्ति जात असे. असें वाटें कीं विश्रांति घेतली होती कीं नाहीं. मनाचा निर्धार करून पावलें टाकावीं लागत होतीं. आम्ही आमच्याबरोबर कृत्रिम ऑक्सिजनचा सांठा घेतला नव्हता. उंच पर्वतावर साधारणतः पंचवीस हजार किंवा अधिक फूट उंचीच्या शिखरावरील मोहिमेसाठीं ज्या पथकांना शक्य असेल तीं पथकें कृत्रिम ऑक्सिजनचीं उपकरणें बरोबर घेऊन जातात. गेल्यावर्षीच्या यशस्वी ब्रिटिश चढाईचें कांहीं श्रेय त्यांच्याजवळ असलेल्या कृत्रिम ऑक्सिजन पुरवणाऱ्या अद्यावत् साधनांना आहे. ऑक्सिजन पुरवणारीं साधनें एव्हरेस्टवर प्रथम १९२२ सालीं वापरलीं गेलीं होतीं. त्यानंतर ३० वर्षें होऊन गेलीं तरी तीं अजूनही प्रयोगावस्थेंत आहेत. त्यांत सुधारणा करून क्लोज्ड् सर्किट म्हणजे फक्त कृत्रिम ऑक्सिजन पुरवणारीं आणि ओपन सर्किट म्हणजे थोडा कृत्रिम ऑक्सिजन व थोडीं बाहेरचीं हवा पुरवणारीं अशीं दोन्ही प्रकारचीं साधनें गेल्या वर्षीच्या ब्रिटिश एव्हरेस्ट पथकानें नेलीं होतीं. ऑक्सिजन पुरवणारीं हीं साधनें फार खर्चाचीं असतात व तीं अशा मोठमोठ्या मोहिमेसाठीं मुद्दाम बनवून घ्यावी लागतात. ऑक्सिजन ज्यांत सांठवलेला असतो त्या टांक्या हलक्या पण मजबूत असाव्या लागतात. शिवाय त्यांची बनावट अगदीं उत्तम असावी लागते. नाहींतर वर चढत असतांना एखाद्या उपकरणांत बिघाड झाला तर पुढें चढणें अशक्य व्हायचें, इतकेंच नव्हे तर तीं वापरीत असलेल्या गिर्यारोहकाचा प्राण

घोक्यांत यायचा. उत्तम भरंवशाचीं साधनें मिळविणें आमच्यासारख्या स्वतंत्रपणें जाणाऱ्या लहान पथकांना शक्य नसतें. साधारणपणें २५।२६ हजार फुटांवर मनुष्य कृत्रिम ऑक्सिजन शिवाय जाऊं शकतो. एव्हरेस्टवरील युद्धपूर्व चढायांत कांहीं गिर्यारोहक कृत्रिम ऑक्सिजन न घेतां अठ्ठावीस हजार फुटापर्यंतसुद्धां जाऊन आलेले आहेत. त्या उंचीचेवर मात्र ऑक्सिजनशिवाय जाणें अशक्य होईल असें तज्ञांचें म्हणणें आहे. उंच पर्वतावर चढाई करतांना, कृत्रिम ऑक्सिजन पुरविणारें साधन बरोबर नसलें तर विरळ हवेचा परिणाम तीव्रतेनें भासतो. पण अशा वातावरणांत कांहीं दिवस घालविलें तर ऑक्सिजनच्या अपुऱ्या पुरवठ्यावर कसेंबसें निभावून नेण्याची शरिराला संवय होते.

त्या दिवशीं आम्हांला दोन घाट ओलांडायचे होते. दुसऱ्या घाटाची बारी पंधरा हजार फूटांचे वर कार्योलंग नांवाच्या हिमशिखराजवळ होती. ती चढून जातांना जीव अगदीं मेटाकुटीस आला, नवनीत फारच दमले होते. मीही दमलों होतों. "श्रीराम जयराम जयजय राम", हें भजन मनांत म्हणत, एक एक पाऊल टाकत होतों. आतां वाटतें कीं, देवाचें एकेरी नांव घेण्याऐवजीं हा तेरा अक्षरी मंत्र त्यावेळेस मीं मुद्दामच म्हणावयास घेतला असेन, म्हणजे दुसरें पाऊल टाकण्यापूर्वीं तेवढाच अधिक अवधी मिळावा. शेवटीं एकदांची कार्योलंग बारी गांठली. त्या बारीच्या जवळच कांहीं अंतरावर एक ओडार होतें. ओडार म्हणजे गुंफा. प्रचंड शिळेखालीं कांहींशा नैसर्गिक रितीनें झालेल्या व कांहींशा कृत्रिम रितीनें बनविलेल्या पोकळीला ओडार म्हणतात. हिमालयांत मार्गावर जेथें घरें नसतात तेथें अशा ओडारांत वस्ती केल्यानें पाऊस वाऱ्यापासून बचाव करता येतो. भारवाहक ओडारमध्यें राहिले, व आम्ही आमच्यासाठीं तंबू ठोकले. आग पेटवून त्या आगीवर ओल्या झालेल्या झोंपण्याच्या पिशव्या वाळवून घेतल्या. आग पेटवायला सर्पण थोडेसेंच होतें. भारवाहकांनीं वर चढत असतांना जळणासाठीं ज्यूनिपरचीं झुडपें तोडून बरोबर आणलीं होतीं, ज्यूनिपरचीं झुडपें हिरवीं असलीं तरी जळतात हा त्यांचा विशेष आहे.

सर्वजण थकून गेले होते. अतिश्रमांमुळें भूकही फारशी नव्हती. गेबीलालनें प्रायमस स्टोव्हवर पुरी भाजी बनवून प्रत्येकाच्या तंबूवर पाठवून दिली थोडीशी खाऊन मी झोंपण्याच्या तयारीस लागलों. पंधरा हजार फुटांवर थंडी खूप वाजेल

म्हणून झोंपण्याची पिशवी काढून ती पडिलीवर चढ़पून आंत झोंपीं गेलों. अंगावरील गरम कपडे तसेंच ठेवले होते, मला थोडा खोकला झाला होता. त्या दिवशीं डोळेही दुखूं लागले. नवनीत माझ्या शेजारींच झोंपण्याच्या पिशवींत पडून कण्हत होते. त्यांच्या प्रकृतीबद्दल आम्हांला काळजी वाटूं लागली. थंडी वाढत होती. सन १९५२ मध्यें पावसाळ्यानंतर एव्हरेस्टवर चढून जाण्याचा दुसरा प्रयत्न करणारे पथक याच मार्गानें गेलें होतें. त्यावेळीं तीव्र थंडीमुळें पावसाचें रूपांतर हिमवर्षावांत झालें होतें. व या कार्योलंग घाटांत दोघे भारवाहक थंडीमुळें गारठून मरण पावले होते, असें आम्हांला आमच्या भारवाहकाकडून कळलें.

सकाळीं जागे झाल्यावर पडल्यापडल्याच मीं तंबूच्या छताला हात लावून पाहिला तो हाताला बर्फ लागला. म्हणून तंबूच्या बाहेर डोकावून पाहिलें तों जमिनीवर, सामानावर सगळीकडे पांढरें पांढरें दिसूं लागलें. रात्रीं उष्णतामान हिमबिंदूच्या ( फ्रीझिंग पॉईंट ) खालीं गेल्यामुळें दंव गोठून त्याचें हिमकणांत रूपांतर झालें होतें. थर्मामीटर पाहिलें तो कमींतकमी उष्णतामान २८ डिग्री फॅरनहीट झालेलें होतें. तंबूच्या बाहेर पडल्यावर जवळ असलेल्या 'कार्योलंग' हिमशिखराचें दर्शन झालें. नकाशांत कार्योलंग शिखराची उंची २१९२० फूट दाखविली होती.

सकाळीं उठून तंबू गोळा करून सात वाजतां पुढें जाण्यास निघालों. आज सुद्धां खूप चढ उतर करायची होती. परंतु पुढचा मुक्काम कमी उंचीवर असल्यामुळें, त्या मुक्कामावरील वातावरण सुसह्य असेल या विचारानें मनाला बरें वाटत होतें. प्रथम तास दीड तास हळुंहळुं उतरून, मग पुन्हां कांहीं वेळ चढून 'नमरेपा देवराली' पाशीं आलों. वाटेंत टँगा नांवाचें दुसरें एक ओढार लागलें. नमरेपा देवराली पासून एकदम उतरण सुरू झाली. ती उभी उतरण जवळजवळ दोन तास उतरत होतो. त्या दोन तासांत चार हजार फूट खालीं उतरलों असूं. आम्हांला समोरच्या घाटावर जायचें होतें, परंतु हिमालयांतील प्रवासाच्या शिरस्त्याप्रमाणें दोन घाटांमधील असलेला नाला ओलांडून जाण्यासाठीं, घाट उतरणें भाग होतें. घाट उतरून लुंडिंग खोल्यापाशीं मी व गाय-

तोंडे साडेबारा वाजतां पोचलों. नवनीत व गांधी बंधू दीड वाजतां आले. तेथें गेबीलालकडून चहा बनवून घेऊन, चहा व बिस्किटें खाऊन दुपारीं दोन वाजतां पुढें चढण्यास सुरवात केली. पुढली चढण अडीच हजार फुटांची होती. नवनीत अत्यंत थकलेले होते. ते कसे चढतील याची काळजी वाटत होती. घाटावर गेल्यावर पुन्हां एक हजार फूट उतरून आम्ही टाटे या गांवीं येऊन पोंचलों. पूर्वीचे दोन मुक्काम आम्ही बिनवस्तीच्या प्रदेशांत केले होते. टाटे येथें मात्र पूर्वीप्रमाणें एका शेतकऱ्याच्या घरांत आश्रय घेतला. त्या दिवशींची चाल आठ मैल झाली. पण एकूण जवळजवळ सात हजार फूट उतरलों, व दोन अडीच हजार फूट चढलों.

रात्रीं टाटे येथें ज्या घरांत वस्तीला होतों, तेथील एका म्हाताऱ्यानें छांग पिऊन खूप गडबड माजविली होती. त्यामुळें चांगली झोंप आली नाहीं. छांग म्हणजे मका किंवा तांदूळ यापासून बनवलेली हलक्या प्रतीची दारू. ही छांग नेपाळच्या पहाडी भागांत सर्वत्र पितात. मार्गांत मिळेल तिथें भारवाहक छांग पिण्यासाठीं थांबत असत.

## दूधकोसीच्या तीरावरून

टाटे हें पांच सहा दारांचें लहानसें खेडें दुधकोसीच्या तीरावर उंच डोंगरावर वसलेलें आहे. तेथून खालीं खोल दुधकोसीचें पात्र दिसत होतें. पलीकडच्या तीरावरील डोंगरपठारावर चौन्रीखारका या नांवाचें गांव दिसत होतें. नदीपाशीं सखल जागा मुळींच नव्हती. दूधकोसी नदी थेट एव्हरेस्टजवळील प्रदेशाचें पाणी आपणांबरोबर आणतें म्हणून तिला महत्त्व आहे. एव्हरेस्ट व त्याच्याजवळच्या पर्वतांवर पडणारें हिम, खुंबु बर्फप्रवाहांतून वहात येत असतां त्याचें पाणी होऊन तें लोबुजा खोला, इम्जा खोला अशा नाल्यांतून वहात येत थ्यांगबोचे गुम्बाजवळ दूधकोसीला मिळतें. पुढें नामचे बझार येथें भोतेकोसी ही नदी मिळाल्यावर तेथून दुधकोसी नदी सरळ दाक्षिण दिशेनें वहात येऊन अखेरीस सुनकोसी नदीला मिळतें. नेपाळांतून एव्हरेस्ट शिखरांवरून ज्या

मोहिमा झाल्या, त्यांच्या वर्णनांत या दूधकोसीचा वारंवार उल्लेख आलेला आहे. उंच उंच हिमशिखरांच्या पायथ्याशीं मोठमोठ्या दगडांच्या राशी, वनस्पतिरहित खडकाळ टेकड्या यामुळें जें उजाड वातावरण असतें त्या वातावरणांत या दूधकोसीनें आपल्या दुधासारख्या शुभ्र खळखळणाऱ्या जलप्रवाहानें व तिच्या दोन्ही तीरावरील हिरव्या वृक्षराजीमुळें रम्यपणा आणला आहे. वरती पाहिलें असतां एव्हरेस्ट आणि ल्होट्से सारखे महान् पर्वत सूर्य प्रकाशांत चकाकणाऱ्या आपल्या हिमाच्या शुभ्र चिलखतानें, डोळे दिपवून टाकतात; तेंच खालीं पाहिलें असतां दूधकोसी नदी तिच्या कांठावरील वनश्रीमुळें हिरवी साडी नेसलेल्या, चपल व तरतरीत तरुणीप्रमाणें आपली नजर खेचून घेते.

टाटेहून आम्ही दूधकोसीच्या उजव्या तीरानें सुमारें आठ मैल चालत जाऊन बेन्कॉर या गांवीं पोंचलों. दूधकोसी दरीच्या सौंदर्याचें वर्णन कितीही केलें तरी अपुरेंच होईल. सर्वात खालीं दूधकोसीचा जोरानें खळखळत वाहणारा जलप्रवाह, त्यावर दोन्ही बाजूस उभ्या भिंतीसारखे डोंगर, वर उतरतीं पठारें, त्या पठारावरील गवताचीं कुरणें, शेतें व मधून मधून असलेलीं पांढरीं घरें, त्यावरती पाइन व इतर वृक्षांनीं आच्छादिलेले डोंगर, व त्या डोंगरांच्या पाठीमागें जणुंकाय खालच्या प्रदेशाशीं आपला संबंध नाहीं अशी बेफिकिर वृत्ति धारण करून उभीं असणारीं हिमशिखरें, उजव्या बाजूला मेरा शिखर (२१२०० फूट), कांग्टेगा (२२३४० फूट), व डाव्या बाजूला कार्योलंग (२११२० फूट) हीं हिमशिखरें होतीं. समोर खोऱ्याच्या टोकाशीं खुमिल्ला नांवाचा हिमविरहित व खडकाळ डोंगर (१९२९७ फूट), आणि तावेचें हिमशिखर (२१३८८ फूट) होतें. या देखाव्याकडे पाहात पाहात चिंचोळ्या पायवाटेवर चालत होतों. कांहीं कांहीं वेळां देखावा पाहण्याच्या नादांत पायवाट सोडून कड्याच्या टोकाशीं येऊन थबकत होतों नेत्र व मन हीं दोन्ही देखावा पाहण्यांत गुंगून गेलीं असतां आपण एखाद्या धोक्याच्या जागीं जाऊन पोंचलों तर एक प्रकारच्या अंतर्ज्ञानानें तें शरिराला कळून चाल एकदम थबकते, नाहींतर आजूबाजूचा देखावा पहात डोंगरावरील पायवाटांवरून जात असतां मी कितीतरी वेळां पडलों असतो किंवा निदान ठेंचाळलों तरी असतो. कड्याच्या किंवा खड्ड्याच्या टोकाशीं जाऊन असे एकदम थबकल्यावर मी निश्चय करायचा कीं चिंचोळ्या वाटेवरून

देखावा पहायचा नाहीं. पहायचा असेल तर थांबून, उभे राहून वाटेल तितका वेळ पहायचा पण तें सहसा व्हायचें नाहीं आणि पुन्हां निश्चय करायची पाळी यायची. टाटेहून तीन मैलांवर घाट गांव लागतें. तेथें दूधकोसी नदीवर लाकडाचा पूल आहे. पुढें चार मैल गेल्यावर बेन्कॉर गांव लागलें. तेथें दोर्जे नांवाच्या शेर्पाच्या घरांत आम्ही मुक्काम केला. तेथून नामचे बझार फक्त सहाच मैल होतें. परंतु शेवटची दोन हजार फुटाची चढण उभी होती. एवढें चालून आल्यावर ती चढण चढत जाणें भारवाहकांना शक्य नव्हतें म्हणून बेन्कॉर येथें मुक्काम केला. दोर्जे शेर्पाच्या घराच्यामागें दरडीवरून पाणी पडत होतें. त्याच्याखालीं मी, नवनीत व गायतोंडे यांनीं स्नान केलें. पाणी फार गार होतें. म्हणून तीन चार मिनिटांतच स्नान उरकावें लागलें.

## नामचे बझार येथें आगमन

दुसरे दिवशीं लवकर निघून नामचे बझारला जायला आम्ही उत्सुक होतों. आमच्या पायीं प्रवासाचा पहिला मोठा टप्पा गांठणार होतों. नामचे बझारला एक दिवस थांबून पुढें खुंबु बर्फप्रवाह व पुमोरी पर्वतावर जाण्यासाठीं शेर्पा भारवाहक घ्यायचे होते. नामचे बझार येथें आम्हांला भारत सरकारच्या चेकपोस्टमधील देशबांधव भेटणार होते. बेन्कॉरहून सर्वजण मोठ्या उत्साहानें निघून दूधकोसीच्या तीरावरून चालूं लागलों. वाट मधून मधून दूधकोसीच्या दुसऱ्या तीरावरून जात असल्यामुळें लाकडी पुलावरून एकदोनदां नदीपार गेलों. कांहीं वेळानें चेकपोस्टमधील एक सरकारी नोकर श्री. मदनसिंग भेटले. एका गांवीं धान्य खरेदी करून ते नामचे बझारला चालले होते. त्यांच्याबरोबर संभाषण करीत आम्ही चालत होतों. त्यांचेकडून नामचे बझारसंबंधीं बरीच उपयुक्त माहिती आम्हांला मिळाली.

दूधकोसीच्या तीरावरील त्या मार्गावर वारंवार चढउतार करावी लागत होती, परंतु मार्ग रम्य होता. वाटेंत रानटी रासबेरीचीं फळें खूप खाण्यास मिळालीं. भोतेकोसी व दूधकोसी यांच्या संगमाचेवर, दरींत खालीं उतरून, दूधकोसीवरील

पुलावरून पलीकडे जाऊन, नामचे बझारची शेवटची दोन हजार फुटांची चढण चढूं लागलों. चढण उभी होती, पण प्रदेश रमणीय, हवा आल्हादकारक व मन उत्साही; त्यामुळें चढण्याचें कांहीं वाटलें नाहीं. जसजसें वर चढत होतों तसतशीं नवींनवीं हिमशिखरें दिसत होतीं. मार्गावरील डौलदार पाइनचीं झाडें, रंगीत पानें असलेलीं छोटीं छोटीं झुडपें, गालिचावरील फुलांसारखी, जमिनीवरील जेन्शिअनचीं छोटीं फुलें यामुळें एखाद्या मोठ्या बगीच्यांतून जात आहोंत असें वाटत होतें. ऊन स्वच्छ होतें तरी त्यामुळें त्रास न होतां बरेंच वाटत होतें. जवळजवळ दीड हजार फूट चढून गेल्यावर नामचे बझार गांव दिसूं लागलें. नालाकृति डोंगराच्या बाजूवर एकावर एक रांगेनें एकसारख्या आकाराचीं व तोंडवळ्याचीं घरें असलेल्या नामचे बझार गांवाचे फोटो आम्ही गिर्यारोहण विषयक पुस्तकांत आणि मासिकांत पाहिले होते. तें नामचे बझार गांव प्रत्यक्ष पाहतांना गंमत वाटली. काठमांडूहून निघाल्यापासून बरोबर पंधराव्या दिवशीं म्हणजे ता. ६ ऑक्टोबर रोजीं आम्ही नामचे बझारमध्यें पाऊल टाकलें.

गांवांत शिरल्यावर तेथील चेकपोस्टचे अधिकारी श्री. तिवारी व त्यांचे मदतनीस श्री. राणा, श्री. विभूतिभूषण वगैरे मंडळींना भेटलों. आम्ही येत आहोंत हें त्यांना भारतीय वकिलाकडून जासूदामार्फत कळलें होतें. आम्हांला भेटण्याची व आमच्याकडून भारतांतील व परदेशांतील बातमी कळून घेण्याची त्यांना उत्सुकता होती. चेकपोस्टमध्यें वायरलेस सेट होता. पण एक महत्वाचा भाग नादुरुस्त झाल्यामुळें तो महिना दीड महिना बंद होता. नेपाळ सरकारच्या सौजन्यानें भारतसरकारनें नेपाळांतून तिबेटकडे जाण्यायेण्याचे जेवढे मार्ग आहेत त्या मार्गावर चेकपोस्ट ठेवल्या आहेत. आपलें सरकार आपल्या संरक्षणाबाबत एवढें सावधान आहे हें कळून बरें वाटलें. भारतसरकारनें संरक्षणाची अशी काळजी घेतली नाहीं तर गेल्या हजार वर्षांत जो इतिहास घडला त्याची पुनरावृत्ति होऊन आणखी कुणाला भारतामध्यें घुसण्याची बुद्धि व्हायची. या चेकपोस्टमधील अधिकारी भारतांतील निरनिराळ्या राज्यांतील गुप्त पोलीस खात्याकडून निवडले आहेत. चेकपोस्टचें कामकाजही गुप्त राखण्यांत येतें. त्यामुळें त्या चेकपोस्टचें नक्की काम काय, तें आम्हांला कळलें नाहीं. तिबेट मधून इकडे येणाऱ्या जाणाऱ्या लोकांवर नजर ठेवावयाची व सरहद्दीपलीकडे कांहीं हालचाली अथवा महत्वाच्या

घडामोडी होत असल्या तर त्याची खबर, हस्तकांकरवीं काढून आणून भारत सरकारला कळवायची, असें त्यांचें काम असावें, असा अंदाज आहे. तिबेट देश आतां साम्यवादी चीनचा अंकित झाल्यामुळें, भारताच्या हिमालयीन सरहद्दीला पूर्वीपेक्षां जास्त महत्व प्राप्त झालें आहे.

चेकपोस्टमध्यें तिवारी आणि मंडळींबरोबर चहा घेत वार्तालाप करीत असतांना गांवांतील शेर्पा मंडळी आम्हांला भेटायला आली. त्यांत गॅलजेन व पासंग फुटर हे नामांकित शेर्पा होते. ते दोघेही गेल्या यशस्वी ब्रिटिश पथकाबरोबर, एव्हरेस्ट पर्वतावर २६००० फुटांवर ओझीं घेऊन जाऊन आलेले होते. त्यांनीं आमच्याबरोबर पुमोरी पर्वतावर येण्याची तयारी दाखविली. गॅलजेननें सुचविल्यावरून आम्ही त्याचेंच घरांत जाऊन मुक्काम करण्याचें ठरविलें. त्याच्या घराकडे जात असतांना गांवच्या पोलीस पाटलानें आमचा परवाना पाहण्यास मागितला. देवनागरी लिपींत लिहिलेला तो परवाना पूर्णपणें वाचण्यास त्याला पांच दहा मिनिटें लागलीं.



# नामचे बझार ते पुमोरी

## नामचे बझार येथें दोन दिवस

नामचे बझार हें शेर्पा लोकांचें मुख्य गांव भोतेकोसी व दूधकोसी नद्यांच्या संगमाजवळ उंच डोंगरावर वसलेलें आहे. येथूनच नंग्पाळा नांवाच्या १९५०० फूट उंचीच्या घाटामधून तिबेटमध्यें एक महत्त्वाचा मार्ग जातो. नेग्पाळा येथें जाण्यास तीन चार दिवस वाटचाल करावी लागते. येथील शेर्पा लोक तिबेटमधील भोतियांशीं व्यापार करतात. नेपाळांतून तांदूळ, कागद, केरोसीन वगैरे तिबेटला जातें. तिकडून खाणीचें मीठ, टाकणखार व लोकर नेपाळांत येते. शेर्पा लोक व्यापार करीत असल्यामुळें हिमालयांतील इतर लोकांपेक्षां ते जास्त सुस्थितींत आहेत. नामचे बझारजवळच खुमजुंग व खुंदे अशीं शेर्पांचीं आणखीं दोन गांवें आहेत. खुमजुंग येथें लंडन विद्यापीठांतील मानवशास्त्राचे प्रोफेसर हायमन्डॉर्फ व त्यांच्या पत्नी, शेर्पा जमातीची माहिती गोळा करण्यासाठीं येऊन राहिले आहेत, असें आम्हांला कळलें. पुमोरीला जाण्यापूर्वी त्यांना भेटायला जाणार होतों. परंतु त्यांची आमची चुकामूक झाली, म्हणून पुमोरीहून परत येताना त्यांना भेटलों.

नामचे बझारजवळ शेती बेताचीच आहे. नामचे बझारची उंची सुमारें बारा हजार फूट व खुमजुंगची उंची सुमारें साडेबारा हजार फूट आहे. येथें राइ, बटाटे व बार्ली यांचें पीक येतें. बटाटे हें शेर्पा लोकांचें मुख्य अन्न आहे. येथें तुम्ही कोणाकडे गेलात तर तो गरीब असेल तर उकडलेले बटाटे, श्रीमंत असेल तर तिबेटी चहा देऊन तुमचें सहास्य मुद्रेनें स्वागत करील. शेर्पा लोक आनंदी व आगत्यशील आहेत. तेनसिंगमुळें शेर्पांची कीर्ति जगभर पसरली आहे. तेनसिंग नामचे बझारजवळील थाम्मु गांवचे रहिवासी. तेथें त्याची आई राहते. गेल्या पंचवीस तीस वर्षांत झालेल्या हिमालयांतील गिर्यारोहणांत महत्त्वाचा भाग घेऊन आणि धाडसाची व कर्तबगारीचीं कामें करून शेर्पा लोकांनीं आपल्या जातीचें वैशिष्ट्य प्रस्थापित केलें



एव्हरेस्ट शिखर, बर्फाचा धबधबा व खुंबु बर्फप्रवाह

आहे. तेनसिंगनीं गेल्या वर्षी हिलरीबरोबर एव्हरेस्टच्या शिखरावर चढून जाऊन शेर्पांच्या कीर्तिमंदिरावर सोनेरी कळस चढवला. साहजिकच सर्व शेर्पांना तेनसिंग-बद्दल अभिमान व आदर वाटतो. परंतु कांहीं शेर्पांना वाटतें कीं, आपल्याला गिर्यारोहक म्हणून वर जाण्याची संधि मिळाली असती तर आपणही असा पराक्रम करून दाखवला असता. तेनसिंगनीं शिखरावर जाण्याचा विक्रम करून अखिल मानवजातीचे डोळे दिपवून टाकले हें खरें, पण अंगनिमा, दावाथोंडूप, दातेन्सिंग, पासंग, दानमगयाल, गॅळजेन वगैरे शेर्पांनीं गेल्या वर्षीच्या मोहिमेंत बहुमोल कामगिरी केलेली आहे मोहिमेंत भाग घेणाऱ्या इतर गिर्यारोहकांनीं व शेर्पा भारवाहकांनीं आपापलीं कामें कसोशीनें केलीं. म्हणूनच तेनसिंग व हिलरी यांना शिखर गांठणें शक्य झालें हें आपण विसरतां कामा नये.

नामचे बझारच्या लोकांशीं बोलतांना दुसरी एक गोष्ट आढळून आली. तेनसिंगनीं शेर्पा लोकांचें नांव दुनियेंत गाजवलें म्हणून त्यांना आनंदच वाटतो. परंतु एव्हरेस्टवर चढून जाण्याचें कठीण काम त्यानीं उरकून टाकल्यामुळें सोला-खुंबु तालुक्यांत राहणाऱ्या लोकांच्या पोटावर पाय आला असें त्यांना वाटलें. एव्हरेस्टवरील चढाई यशस्वी झाल्यामुळें आतां मोठमोठीं पथकें घेऊन इकडे कोण येणार ? एव्हरेस्टवर चढाई करावयास एखादें पथक तिकडे गेलें म्हणजे तिकडच्या लोकांचें महत्त्व वाढतें. मजुरांना मजुरी मिळते. अंडीं व फळें वगैरे जिनसांना चांगला भाव येतो. शेर्पांना भारवाहकांचा पगार व गिर्यारोहणाची हौस भागविण्याची आणि मर्दुमकी गाजविण्याची संधि मिळते. हें सर्व आतां मिळणार नाहीं असें त्यांना वाटतें. स्विस लोकांचीं दोन पथकें आलीं तेव्हां त्यांचेकडून शेर्पांना चांगली मजुरी, शिवाय उत्तम लोकरीचे कपडे, आणि गिर्यारोहणाचीं साधनें मिळालीं. ब्रिटिशांकडून स्विस लोकांइतकी भारी मजुरी व बक्षिसें मिळालीं नाहींत, तरी ब्रिटिश चढाई मोठ्या प्रमाणावर असल्यामुळें अनेक शेर्पांना काम मिळालें. स्विस लोक तर अमुक इतक्या फुटांवर ओझीं वाहून नेणाऱ्या शेर्पांना, अमुक इतक्या रुपयांचें बक्षीस, अशी बक्षिसांची खैरात करीत होते. साहजिकच शेर्पा लोक स्विस गिर्यारोहकांची प्रेमानें आठवण काढतात. या दोन्ही तिन्ही मोहिमांमध्यें भाग घेणाऱ्या शेर्पांना गिर्यारोहणाचे पोशाख व साधनें मिळालीं आहेत. हिमालयांतील पाश्चात्य लोकांच्या गिर्यारोह-

णाचा असा एक शिरस्ता आहे कीं, मोहिमेंत भाग घेणाऱ्या एखाद्या शेर्पाला ज्या वस्तु वापरण्यास दिल्या त्या मोहिम संपल्यावर त्यानें आपणांकडेच ठेवायच्या. त्यामुळें सोलाखुंबु तालुक्यांतील शेर्पांजवळ पिसांच्या उबदार झोपण्याच्या पिशव्या, वाताभेद्य पोशाख, बर्फावर चढण्यासाठीं खास बनविलेले मोठे उबदार बूट, उत्तम लोकरीचे हातमोजे, स्वेटर, गरम टोप्या, बर्फ–कुदळी वगैरे, उंच पर्वतावरील चढायासाठीं खास बनविलेलें सामान आढळून येतें. आम्हांला ॲलजेननें ब्रिटिश लेमन पावडर, स्विस कॉफी यांची लज्जत चाखण्यास दिली. वर उल्लेखिलेल्या जिनसांचा सांभाळ शेर्पा लोक नीट करीत नाहींत. वाटेल तसा उपयोग केल्यानें त्या वस्तु लवकरच खराब कुचकामाच्या होऊन जातात. शेर्पांजवळ राहिलेल्या या किंमती व दुर्मिळ साधनांचा दुरुपयोग झाल्यानें गिर्यारोहणांचें एक प्रकारचें नुकसानच होतें. कारण या वस्तू भारतांत मुद्दाम आणूं म्हटलें तरी आयातीवरील निर्बंधामुळें त्या परदेशांतून आणतां येत नाहींत. कोणी आणण्याची व्यवस्था केली तरी त्यांच्या किंमती फार असल्यानें सामान्य माणसाला त्या विकत घेणें परवडणार नाहीं. शेर्पांना या वस्तू देण्याऐवजीं, त्यांना रोख पैसे देऊन हिमालयन क्लबसारख्या संस्थांना या वस्तू दिल्या तर कितीतरी उपयोग होईल.

शेर्पांजवळ या वस्तू असण्याचा आम्हांला मात्र दुहेरी फायदा झाला. आमच्या स्वतःजवळ जीं साधनें होतीं तीं अपुरीं होतीं. नामचे बझारला आम्ही शेर्पांकडून आम्हांला हवीं असलेलीं साधनें विकत घेतलीं. त्यांच्या दृष्टीनें त्यांना समाधानकारक किंमत मिळाली. उलट आम्हांला या दुर्मिळ वस्तु स्वस्त किंमतींत मिळाल्या. शेर्पा भारवाहकांना वापरण्यास देण्यास आमच्याजवळ फालतु कपडे व साधनें नव्हतीं. आमच्याबरोबर पुमोरीवर येतांना त्यांनीं आपल्याजवळचीं साधनें वापरलीं हा आमचा दुसरा फायदा झाला. आम्ही नामचे बझारला होतों त्या दोन दिवसांत गांवांतील शेर्पा आपल्याजवळील गिर्यारोहणाचीं साधनें विकावयास आणीत होते व आम्ही तीं भाव करून खरेदी करीत होतों. आमच्यापैकीं प्रत्येकालाच त्यांतील चांगल्या चांगल्या वस्तु हव्या होत्या. त्या कशा वाटायच्या ? म्हणून आम्ही एक युक्ति काढली. त्या वस्तु आमच्या पथकासाठीं शक्य तितक्या स्वस्तांत खरेदी करून, मग त्या वस्तूंचा आमच्या

आमच्यांत लिलांव केला. जो जास्त भाव देईल त्याला पथकातर्फे ती वस्तु विकायची. आम्ही सुमारें सोळाशें ( नेपाळी ) रुपये किंमतीच्या वस्तू खरेदी केल्या. त्या आमच्या मधील लिलावांत बावीसशें रुपयांस गेल्या. त्यांत जो नफा झाला तो आम्ही सारखा वांटून घेतला व या लिलावांत आमची करमणूकही झाली, आणि ज्या वस्तूची ज्याला गरज होती, त्यानें जास्त भाव बोलल्यामुळें, ती त्याला मिळाली.

नामचे बझारच्या मुक्कामांत आम्ही पुढें खुंबू बर्फ प्रवाह व पुमोरी पर्वत यावरील गिर्यारोहणासाठीं आम्हांला जरुर असलेल्या शेर्पा भारवाहकांची व्यवस्था केली. नामचे बझार गांवांत चाळीस पन्नास घरें आहेत. तीं अर्धगोलाकार टेकडीवर एकावर एक अशीं बांधलेलीं आहेत. त्यामुळें गांवात कुठेंही घडामोड झाली कीं सर्वांना दिसतें. एरव्हीं शांत व सुस्त असलेल्या त्या गांवांत आमच्यासारखे प्रवासी गेल्यावर एक लहानशी खळबळच उडून गेली. गांवांतील सर्व घरें एका पद्धतीचीं आहेत. खालच्या एका बाजूला चमरी व गाईसाठीं गोठा, व दुसरें बाजूस सरपण व गवत ठेवलेलें असतें. जिना चढून वरतीं गेले म्हणजे एक मोठी खोली लागते. त्या एका खोलींतच त्यांचें स्वैपाकघर, जेवणघर, माजघर, निजायची खोली वगैरे सर्व असून एका बाजूस अग्निहोत्रासारखी चूल कायमची पेटलेली असते. चुलीला लागूनच जवळ दोन लांब बांक असतात. एक बसण्यासाठीं व एक खाद्यपदार्थ व पेयें ठेवण्यासाठीं. भिंतीला लागून शेल्फवर पितळेचीं भांडीं, धान्य, कपडे वगैरे सामान रचलेलें असतें. जमीन तक्तपोशीची असते. कांहीं घरांतून खिडकीला कांचेचें तावदान आढळून येतें. आपल्याकडील किती खेडेगांवांत अशीं व्यवस्थित व सुस्थितींतील घरें आढळतील ! नामचे बझारमधील बहुतेक सर्व घरें अशीं सुस्थितींत आहेत. मोठ्या खोलीच्या दोन बाजूस दोन छोट्या खोल्या असतात. एका बाजूचा उपयोग गुम्बा किंवा देवघरासारखा व कोठीच्या खोलीसारखा होतो. त्या खोलींत एका बाजूस बुद्धाची मूर्ति, तिबेटांतील लामांच्या तसबिरी व कांहीं पोथ्या ठेवलेल्या असतात. मूर्ति व तसबिरीपुढें दीपधूप जळत असतो. खोलीच्या दुसऱ्या भागांत बटाटे वगैरे वस्तू करंड्यांतून ठेवलेल्या असतात. जिन्याजवळची खोली शेतखाना म्हणून वापरण्यांत येते. शेतखाना वरच्या मजल्यावर व मैला खालच्या मजल्यावर.

कोणीही वापर केला कीं त्यानें बाजूला ठेवलेल्या वाळलेल्या पानांच्या ढिगांतून कांहीं पानें छिद्रांतून खालीं टाकून द्यायचीं. मैला व वाळलेलीं पानें वर्षभर अशींच सांचत रहातात. वर्षाकाठीं शिशिर ऋतूंत तिबेटमधील तीव्र थंडीपासून बचाव करण्यासाठीं भटके व शिकारी नामचे बझारला येतात तेव्हां त्यांचेकडून तो ढीग बाहेर काढून शेतांत खतासाठीं वापरतात तो मैला खालच्या मजल्यावरील बंद खोलींत साठलेला असला तरी इकडच्या थंड हवेमुळें त्यास दुर्गंधी सुटत नाहीं.

शेर्पांची एकंदर राहणी आपल्यास गलिच्छ वाटते. वर्षांतून एकदां तरी स्नान करीत असतील कीं नाहीं कोण जाणे! थंड हवेमुळें घाम येत नाहीं म्हणून त्यांना स्नान करण्याची आवश्यकता नाहीं हें खरें. परंतु हे लोक महिनेच्या महिने स्नान करीत नाहींत. कांहींशा अतिशयोक्तीनें असें म्हणतात, कीं शेर्पांचें दोनदांच स्नान होतें. एकदां जन्मल्यावर मुलांस स्नान घालण्यांत येतें तेव्हां व दुसऱ्यांदा मृत्युनंतर प्रेताला अंघोळ घालतात तेव्हां. शेर्पांच्या इतरही संवयी घाणेरड्या आहेत. चुलीशेजारी हात धुणें, थुंकणें, कपडे सहसा न बदलणें, क्वचित्काळीं कपडे धुणें इत्यादि. आपल्या खेडेगांवांतून, नदीकांठावर धुणें घेऊन जाणाऱ्या स्त्रिया दिसतात, तसें दृश्य नामचे बझारला क्वचितच दिसतें.

शेर्पालोक हे असे असले तरी त्यांच्या आगत्यशील वर्तनामुळें त्यांच्या गलिच्छपणाकडे दुर्लक्ष करावेसें वाटतें. गॅलजेन शेर्पाची बायको एक साधी खेड्यांतील स्त्री. पण ती व्यवहारचतुर व आतिथ्यशील होती. आमच्या तेथील मुक्कामांत, तिनें बटाट्याचे एकदोन चवदार पदार्थ, हौसेनें तयार करून आग्रहानें खाऊं घातले. पुमोरीवर गिर्यारोहण करून आम्ही नामचे बझारला परत आलों, तेव्हा प्रत्येकापुढें तिनें गरम दुधाचा पेला केला. दुसरीकडेसुद्धां ज्या शेर्पांच्या घरांत गेलों त्यांनीं चांगलें आतिथ्य केलें.

शेर्पांचा धर्म रीतिरिवाज व राहणी, तिबेटांतील लोकांप्रमाणें आहे. त्यांचा संबंध नेपाळांतील गुरख्यांपेक्षां भोटियांशीं जास्त येतो. भोटिया म्हणजे तिबेटी. नेपाळांत तिबेटला भोट म्हणतात. जे भोटिया कांहीं शतकापूर्वी नेपाळांत राहायला आले, त्यांना पुढें शेर्पा हें नांव पडलें. अजूनही, यात्रेसाठीं व व्यापारासाठीं त्यांचे वारंवार तिबेटला जाणें येणें होत असतें. साम्यवादी चीननें मूळच्या दलाई लामांला हुसकून लावून तिबेटवर लाल ध्वज फडकाविला असला तरी

१५०.८८
म.ग्रं.
१८७७
मल्प४८



नेपाळच्या शेर्पांना तिबेटमध्यें जाण्यायेण्यास कांहीं मज्जाव नाहीं. मात्र आपल्या-सारखा कोणी भारतीय घाट ओलांडून तिबेट हद्दींत प्रवेश करूं पाहील तर कम्यु-निस्ट सैनिकांकरवीं तपासासाठीं ल्हासाला नाहींतर पेकिंगला रवानगी व्हायची.

शेर्पा लोक भोटियांप्रमाणें बौद्धमार्गी आहेत. परंतु भोटियाप्रमाणेंच त्यांचा धर्म बुद्धाच्या मूळ शिकवणीनुसार राहिलेला नसून त्याचें रूपांतर लामाधर्मांत ('लामाइझम' मध्यें) झालेलें आहे. नेपाळमधील थ्यांगब्रोचे, च्यांगमुंब्रा व तिबेटमधील शिगत्से व रॉंगबुक या मठांतील लामा हे त्यांचे धर्मगुरु मानले जातात. शेर्पांच्या धार्मिक जीवनांत लामांचें फार मोठें प्रस्थ असतें. आधुनिक सुधारलेल्या जगापासून दूर राहिल्यामुळें व आधुनिक जगाशीं थोडासाच संबंध येत असल्यामुळें त्यांच्यांत अंधश्रद्धा व जुनाट रूढी आहेत. असें असलें तरी गिर्यारोहणाच्या काळांत शेर्पाइतका आनंदी वृत्तीचा व निधड्या छातीचा दुसरा सोबती मिळणें दुरापास्त आहे. त्यांच्या बायकांत पडद्याची चाल नाहीं एवढेंच नव्हे तर पुरुषांच्या बरोबरीनें त्या व्यवहारांत व गप्पागोष्टींत भाग घेतात. इतिहासकाळांत भारतांत घुसून अखंड भारतांतील एक तृतीयांश जनतेचें सांस्कृतिक जीवन बदलून टाकणाऱ्या मुसलमानी टोळ्या नेपाळमध्यें घुसल्या नाहींत. त्यामुळें नेपाळी लोक स्त्रीस्वातंत्र्याच्या बाबतींत पुरोगामी राहिले आहेत. नाहींतर त्यांची राहणी वायव्य सरहद्दीवरील पठाणांसारखी झाली असती. व आपल्या सारख्यांना त्यांच्या प्रदेशांत प्रवास करतांना जीव मुठींत घेऊन जावें लागलें असतें. हिमालयाचा गाभा असलेल्या या प्रदेशाला अल्लानें अ-पाक राहूं दिलें याबद्दल त्याचे उपकारच मानले पाहिजेत.

काठमांडूहून आलेल्या भारवाहकांजवळ गरम कपडे, बूट वगैरे कांहीं नव्हते. म्हणून त्यांना नामचे बझारहून काठमांडूला परत पाठवून द्यायचें आम्हीं ठरविलें. परतीच्या प्रवासासाठीं किती मजुरी द्यायची यासंबंधीं थोडी वाटाघाट व तक्रार झाली. यावयास लागलेल्या पंधरा दिवसांची मजुरी व परतीच्या प्रवासासाठीं सहा दिवसांची मजुरी घेण्याचें त्यांनीं कबूल केल्यावर त्यांची मजुरी देऊन टाकली. पैसे मोजून देण्यांत व फाटक्या नोटा बदलून देण्यांत जवळ जवळ दीड तास गेला. आपापली मजुरी घेऊन, पाठीवर बोजे नसल्यामुळें झपाझप पावलें टाकीत, ते तेवीस भारवाहक नामचे बझारहून निघून गेले. रोज दुप्पट

प्रवास करून ते आठ दिवसांत काठमांडूला पोचणार होते. त्यांना निरोप देतांना वाईट वाटलें. गेले पंधरा दिवस रानावनांत, दऱ्याखोऱ्यांत, सकाळीं व दुपारीं प्रवास करतांना, रात्रीं मुक्कामाचे ठिकाणीं, ते आमचे व आम्ही त्यांचे साथीदार होतो. कांहीं थोडे लहान सहान प्रसंग व शेवटच्या दिवसाची तक्रार सोडली तर त्यांनीं आमची नोकरी आनंदानें व इमानानें केली होती. नेपाळी साडेतीन रुपये रोजाची मजुरी लागोपाठ पंधरावीस दिवस मिळण्याच्या आशेनें आमच्याबरोबर काठमांडू सोडून शंभर दीडशें मैल ते आले होते. पाऊस वाऱ्याच्या गैरसोयी, आजारपण व प्रवासांतील इतर धोके आमच्याप्रमाणेंच त्यांनींही पत्करले होते. ओझें घेऊन चढत असतां गाणें गाणारा तो मानबहादुर, तो गंभीर वृत्तीचा बिस्किटवाला, माझा बिस्तरा उचलणारा जुनबेसीचा भोटिया, त्यांचे चेहरे डोळ्यांपुढें उभे रहातात. प्रामाणिक कष्ट करून उपजीविका करणाऱ्या व अल्प प्राप्तींत संतुष्ट राहणाऱ्या त्या भारवाहकांचें कौतुक वाटतें.

खुंबु बर्फप्रवाहावरील पायचालींत ज्याची जरूरी नाहीं असें सामान व परतीच्या प्रवासास लागणाऱ्या खाद्य पदार्थांच्या पेट्या आम्ही नामचे बझारलाच ठेवून जाणार होतों. म्हणून आम्हांला पुढील प्रवासासाठीं सहा गिर्यारोहक शेर्पा व आठ भारवाहक पुरे होते. भारवाहकाची मजुरी पूर्वीप्रमाणेंच सात मोहोरा ठरली. पर्वतावर ओझें वाहणाऱ्या शेर्पांचा भाव जरा जास्त. त्यांना रोज आठ मोहोरा व पायथ्याच्या तळाच्यापुढें गेल्यावर रोज दहा मोहोरा व जेवण असे दर ठरले. नामचे बझारला म्हणून हे शेर्पा आम्हांला एवढ्या स्वस्त दरांत मिळाले. दार्जिलिंगहून शेर्पा न्यावे लागले असते तर शेर्पांना याच्या दीडपट दुप्पट मजुरी द्यावी लागली असती. नामचे बझारला येऊन गेलेल्या स्विस व ब्रिटिश पथकांनीं आमच्यापेक्षां जास्त दर दिले होते. परंतु आमच्याबरोबर गिर्यारोहणास येतांना त्यांना एव्हरेस्टवरील मोहिमेइतकें धोक्याचें व कष्टाचें काम करावें लागणार नव्हतें. शिवाय गिर्यारोहणाची त्यांना जात्याच हौस असल्यामुळें आमच्याबरोबर आल्यास थोडे फार पैसे मिळून कंटाळवाण्या नित्यक्रमांत जरा पालट होईल असें त्यांना वाटत असावें.

वरील सर्व व्यवस्था करण्यांत दिवस कसा निघून गेला तें कळलें नाहीं. नामचे बझारला आम्ही तारीख सहा ऑक्टोबर रोजीं पोचलों. नामचे बझारहून

तारीख आठ रोजीं पुढील प्रवासास निघण्याचें ठरविलें. त्यामुळें तारीख सात ऑक्टोबर हा दिवस आम्हांला विश्रांतीचा मिळाला. आधीचे पंधरा दिवस रोज पायपिटी करीत होतों. काठमांडू येथें असतांनासुद्धां रोज कुठेना कुठें तरी प्रेक्षणीय स्थळें पाहण्यास जातच होतों. त्यामुळें हा विश्रांतीचा, दगदग न करण्याचा दिवस बरेंच दिवसांनीं मिळाल्यासारखें वाटलें. तो दिवससुद्धां गडबडींत गेला. फक्त पायांना रोजच्या इतके श्रम झाले नाहींत, एवढेंच.

पंधरा दिवसानंतर सकाळीं सावकाश उठलों. नामचे बझारला ठेवायचें सामान व पुमोरीवर नेण्याचें सामान वेगवेगळें केलें. त्यापुढील प्रवासांत फक्त गरम कपडेच न्यायचे होते. चहापानानंतर आम्ही वेगवेगळे कॅमेरे, स्टँड इत्यादि लवाजमा घेऊन बाहेर पडलों. लवकरच आमच्यापाशीं गर्दी गोळा झाली. कुणीतरी शेर्पा लोकांचा सणासुदीचे दिवशीं घालण्याचा पोशाख आणविला. किंमती फर लावलेली व जरीचें काम असलेली मोठी टोपी, बाराबंदी, ढगलेवजा काळा गरम कोट असा तो पोशाख घालून प्रत्येकानें आपला फोटो काढविला. शेर्पांचे, त्यांच्या मुलांचे, शेर्पांणींचें ( शेर्पा बायकांचे ) फोटो व सिनेफिल्म काढली.

## नामचे बझारहून एव्हरेस्टचें दर्शन

नवनीत व रूसी वरील कार्यक्रमांत गुंतले असतांनाच मीं व गायतोंडे यांनीं एव्हरेस्टचें दर्शन घेण्यासाठीं जवळच्या टेकडीवर जायचें ठरविलें. एव्हरेस्टचें दर्शन घेण्याची मला तीव्र उत्सुकता होती. काठमांडूहून केलेल्या पंधरा दिवसांचे वाटचालींत विशेषतः नामचे बझार जवळ जवळ येऊं लागल्यावर कुठेंही घाटावर चढलें कीं तेथून एव्हरेस्ट दिसेल अशी आशा वाटायची, पण आकाश आभ्राच्छादित असल्यामुळें ती सफल झाली नाहीं. दैवाला आमचें औत्सुक्य वाढवायचें होतें. नामचे बझारला आल्यापासून हवा निवळली व आकाश अगदीं निरभ्र झालें. नामचे बझारच्या जवळील टेकडीवरून एव्हरेस्ट दिसतें असें मीं ऐकलें होतें. झपाझप पावलें टाकीत व दमछाक झाल्यानें नाइलाजास्तव क्षण दोन क्षण विश्रांति घेत टेकडीवर जाऊन पोहोंचलों. तेथून दूरवरचीं हिमशिखरें

दिसत होतीं. पण गंमत अशी कीं आमच्याबरोबर टेकडीवर आलेल्या चेक-पोस्टमधील आमचे मित्रास ईशान्य दिशेकडे दूरवर दिसणाऱ्या हिमशिखरांच्या रांगेंत एव्हरेस्ट कोणतें तें दाखवितां येईना. एव्हरेस्टवर तिबेटचे बाजूनें झालेल्या चढायांचा मीं अभ्यास केला होताच. शिवाय अलिकडे नेपाळमधून झालेल्या चढायांचीं वर्णनेंही मीं वाचलीं होतीं. स्वतः एव्हरेस्टच्या परिसरांत जाण्याचें ठरविल्यावर तर एव्हरेस्टचीं वर्णनें, नकाशे व छायाचित्रें यांचा मीं कसून अभ्यास केला होता. छाया चित्रांत पाहिलेलीं, नामचे बझार, थ्यांगबोचे व खुंबू बर्फ-प्रवाह येथून दिसणारीं एव्हरेस्टचीं दृश्यें माझ्या डोळ्यापुढें अगदीं स्पष्टपणें उभीं होतीं. मग समोर प्रत्यक्षांत दिसणारें एव्हरेस्ट शिखर हुडकून काढण्यांत मला कितीसा उशीर लागणार ? लोट्से व नुप्ट्से या शिखरांना जोडणाऱ्या पर्वतांच्या रांगेच्या मागें डोकावत असलेलें तें एव्हरेस्टचें उदात्त शिखर पाहून माझा आनंद पोटांत मावेनासा झाला. माझ्याबरोबर आलेल्यांना तें शिखर दाखवून, मी माझ्या स्वतःच्या विचारांत गर्क झालों. ज्या एव्हरेस्ट शिखरावरील चढायांचा साहसपूर्ण व करुणरम्य इतिहास मीं एवढ्या भक्तिभावानें वाचला व लोकांना ग्रंथ रूपानें सांगितला, तें एव्हरेस्टचें शिखर- पृथ्वीवरील सर्वोच्च बिंदु, माझ्या डोळ्यांनीं मी पहात आहे, ह्या भावनेनें मला अतिशय आनंद झाला. एव्हरेस्टच्या कथा मी जेव्हां वाचत असें, तेव्हां आपल्या आयुष्यांत एव्हरेस्ट पहायला मिळेल अशी कल्पनासुद्धां माझ्या मनांत आली नव्हती. त्या काळीं एव्हरेस्टजवळ जाण्यास सिक्कीम–तिबेटच्या मार्गानें महिनाभर प्रवास करून जावें लागे. एवढें मोठें परिभ्रमण करून आपल्याला एव्हरेस्टजवळ जातां येईल हें असंभवनीय होतें. नेपाळमधून एव्हरेस्टकडे जाण्याचा पूर्वीपेक्षां सोपा व जवळचा मार्ग खुला होईल अशी त्यावेळेस कुणाची अपेक्षा नव्हती. नेपाळमधील मार्ग तिबेटपेक्षां जवळचा खरा, पण तोही उंच डोंगरावरून, खोल दऱ्याखोऱ्यांतून जाणारा आहे. अशा खडतर प्रवासास योग्य ते मित्र, योग्य तीं साधनें व सुरक्षित प्रवास होण्यास लागणारी देवाची कृपा इतक्या गोष्टींची जरूरी होती. परंतु माझी पूर्वजन्मींची पुण्याई व या जन्मांत माझ्या लेखणीनें केलेली एव्हरेस्टची सेवा ध्यानांत घेऊन एव्हरेस्टनें आपल्या चरणापाशीं बोलावून आपलें दर्शन दिलें. मी धन्य झालों !

एव्हरेस्टकडे पहात असतांना माझ्या मनोवृत्ति उचंबळून आल्या व मनांत विचारांची एवढी गर्दी झाली कीं मीं माझ्या सोबत्यांना म्हटलें, मला पांच दहा मिनिटें कांहीं न बोलतां स्वस्थ बसूं द्या. माझ्या मनांत किती आनंदाच्या उर्मी येत असतील यांची त्यांना काय कल्पना? हिमाशिखरांच्या रांगांतून एव्हरेस्ट निश्चितपणें दाखवून दिलें. एवढ्यावरून एव्हरेस्ट पर्वताचा माझा अभ्यास चांगला आहे एवढेंच त्यांना कळून आलें असेल. पंढरपूर येथें प्रथमच जाऊन विठ्ठलाच्या मूर्तीचें दर्शन घेणाऱ्या विठ्ठलभक्ताप्रमाणें किंवा मानससरोवरापाशीं जाऊन कैलास पर्वताचें दर्शन घेणाऱ्या शिवभक्ताप्रमाणें मला झालें होतें. मी मनन करूं लागलों. प्रथम एव्हरेस्टचें इतक्या जवळून दर्शन घेण्याचें भाग्य आणून दिल्याबद्दल ईश्वराचे आभार मानले. नंतर माझ्या सर्व प्रिय नातलगांची व मित्रांची आठवण काढून "माझ्या नेत्रांनीं तुम्ही हिमालयाचें हें श्रेष्ठ शिखर पहा" असें म्हटलें. माझ्या धाकट्या बहिणीनें एव्हरेस्टचें पहिल्यांदा दर्शन घडल्यावर माझी आठवण करा, असें मला व माझ्या सोबत्यांना सांगून ठेविलें होतें. माझ्या वडिलांनीं निघण्यापूर्वी मला व माझ्या सोबत्यांना एक लेखी संदेश दिला होता तो तेथें बसून वाचला. त्यांनीं पुण्यास आपल्या घरांतील खोलींत बसून लिहिलेलें पुढील वाक्य जणुं काय या प्रसंगासाठींच लिहिलें होतें, असें वाटलें. "In visiting Himalayas you are not merely reckoning over the famous highest mountains of the world, but in my opinion, you are out to get an actual glimpse of "The Divine"."

ज्या टेकडीवर मी उभा होतों तेथून चारही बाजूला, जवळच असलेलीं उंच उंच हिमशिखरें दिसत होतीं. परंतु एव्हरेस्टच्या प्रथम दर्शनानें मी एवढा दिग्मूढ झालों होतों, कीं त्या सुंदर शिखरांकडे माझें पुरेसें लक्षच गेलें नाहीं.

## पुमोरीच्या मार्गावर

तारीख आठ ऑक्टोबर रोजीं आम्ही आमच्या पुढील खडतर प्रवासाला सुरवात केली. सकाळीं लवकर उठून शेर्पांना व इतर भारवाहकांना बोजे वांटून देऊन निघालों. ज्या टेकडीवरून आदल्या दिवशीं एव्हरेस्टचें दर्शन मिळालें ती

टेकडी मार्गावरच होती. तेथें जवळजवळ तासभर थांबून फोटो व फिल्मस् घेतल्या. एव्हरेस्टचें शिखर आम्ही होतों तेथून सरळ रेघ काढली असतां, सुमारें वीस मैलावर होतें. पण आकाशांत ढग तुरळक व हवा स्वच्छ असल्यामुळें एव्हरेस्ट अगदीं स्पष्ट दिसत होतें. अंतरावरील जवळचीं शिखरें एव्हरेस्टपेक्षां उंच दिसत असलीं तरी एव्हरेस्ट शिखरावरील प्रसिद्ध हिमाच्या तुऱ्यामुळें इतर शिखरांमध्यें तें उठून दिसत होतें. एव्हरेस्ट शिखरावर पडलेलें हिम वाऱ्यानें शिखरांपासून उडत असतें व त्याची मैल दोन मैल लांबीची पताका एव्हरेस्टवर फडकत असते. एव्हरेस्टच्या अलीकडे, लोट्से व नुपट्से या शिखरांना जोडणारा पंचवीस हजार फूट उंचीचा व चार मैल लांबीचा कणा किल्ल्याच्या तटाप्रमाणें खडा होता. प्रत्येक अभेद्य किल्ल्याप्रमाणें एव्हरेस्टच्या या किल्ल्यास सुद्धां आंत शिरण्यास एक द्वार आहेच. एव्हरेस्ट व त्याच्याजवळील भूप्रदेशाची मांडणी स्थूलमानानें पुढीलप्रमाणें आहे. एव्हरेस्ट (२९००२ फूट), लोट्से (२७८९० फूट) नुपट्से (२५६८० फूट) हीं तीन शिखरें ज्या पर्वतावर आहेत तो पर्वत नालाच्या आकाराचा आहे. त्यामध्यें असलेल्या भागाला वेस्टर्नकूम ( Western Coom ) असें नांव एव्हरेस्टवर सन १९२४ सालीं ज्याचें बलिदान झालें त्या प्रसिद्ध गिर्यारोहक मॅलरीनें दिलें आहे. कूम हा शब्द वेल्स भाषेतील आहे. त्याचा अर्थ वाटीसारखी खोलगट जागा. या नालाची उघडी बाजू वायव्य दिशेला आहे. या तिन्ही पर्वतांच्या आंतील बाजूवर जें हिम पडतें तें वेस्टर्न-कूममध्यें सांचतें. तेथून तें वायव्य दिशेला असलेल्या खिंडारांतून बाहेर पडतें. त्या खिंडाराच्या टोकाशीं सुमारें तीन हजार फूट उंचीचा उतार आहे. त्या उतारावरून तें हिम मोठमोठ्या टेकड्या एवढ्या आकारांच्या गोळ्यांच्या रूपांत गडगडत खालीं येतें. म्हणून त्या खिंडाराला आइस फॉल उर्फ बर्फाचा धबधबा असें म्हणतात. तो धबधबा असला तरी ज्याप्रमाणें पाणी जोरानें वहात खालीं आपटतें तसें त्या बर्फाच्या धबधब्यांत होत नाहीं. वर पडत असलेल्या व सांच-लेल्या हिमाच्या भारानें तो हिमाचा ढिगारा त्या धबधब्यांतून हलकें हलकें सरकत खालीं येतो. त्याच्या अशा बारीक हालचालीमुळें त्या हिमाच्या ढिगांत उंचवटे, खड्डे, व खोल भेगा पडतात. ते खड्डे व भेगा हिमाच्या अगदीं मंद अशा प्रवाहामुळें बदलत असतात. कधीं कधीं बाजूवरील पर्वतावरून हिम

कोसळण्याची भीति असते. म्हणून एव्हरेस्टच्या तटाला हें जें खिंडार आहे तें आतिशय दुर्गम झालेलें आहे. शिप्टन, हिलरीसारखे ब्रिटिश व न्यूझिलंडर गिर्यारोहक लॅम्बर्ट, व शेवालीसारखें स्विस गिर्यारोहक हे आपल्या कलेंत निष्णात असल्यामुळेंच या बर्फाच्या धबधब्यांतून वर जाण्याचा मार्ग काढूं शकले. येरा गबाळाचें तें काम नाहीं.

त्या धबधब्यांतून गडगडत आलेल्या हिमाचें बर्फांत रूपांतर होतें. तो बर्फाचा लोंढा दिशा बदलून, दक्षिण दिशेकडे खुंबु बर्फ प्रवाह ( ग्लेशिअर ) हें नांव धारण करून मंद गतीनें वहात जातो. 'वहात जातो' असें म्हटलें तरी त्या प्रवाहाची गति इतकी मंद असतें कीं तो वाहतांना मुळींच दिसत नाहीं. म्हणून तो वहात जातो असें म्हणण्यापेक्षां सरकत जातो असें म्हणणें जास्त योग्य होईल. त्या बर्फप्रवाहांत हिम नसून बर्फ असतें, हिम भुरभुरीत, दमट व पांढऱ्या शुभ्र पिठासारखें असतें तर बर्फ कठिण दगडासारखें असतें. वर सांगितल्याप्रमाणें बर्फाचा हा लोंढा नदीसारखा वहात नाहीं. त्यामुळें ग्लेशिअरला हिमनदी म्हणण्या-ऐवजीं बर्फप्रवाह म्हटल्यानें त्याची चांगली कल्पना येते. या बर्फप्रवाहास केवळ बर्फच असतें असें नव्हे तर बर्फाबरोबर खालीं आलेली माती, मुरुम, मोठमोठे दगड, बर्फाचें झालेलें पाणी, अशीं सर्वांची गल्लत झालेली असते. एखाद्या ठिकाणीं बर्फावर दगड व मातीचे मोठे ढीग झालेले असतात, तर दुसऱ्या ठिकाणीं दगडमातीवर बर्फाचे मोठे मनोरे उभे असतात. वरून केवळ दगडांची रास दिसत असलेल्या टेकडीखालीं बर्फ असतें. कांहींवेळां बर्फाच्या खालून वरील दाबामुळें बर्फाच्या झालेल्या पाण्याचा प्रवाह झुळझुळ वहात असतो. बर्फ प्रवाहांतून जातांना दगडांच्या राशीवरून चढून बर्फाच्या मनोऱ्यांतून बाजूला वाट काढून, बर्फांतील भेगा टाळून किंवा त्या भेगांवर पडलेल्या हिमानें बनलेल्या चिंचोळ्या पुलावरून जावें लागतें.

खुंबु बर्फप्रवाह जेथें दक्षिणेकडे वळतो तेथेंच समोरचें बाजूस पुमोरी हें २३१९० फूट उंचीचें शिखर आहे त्या शिखरावर जितकें चढतां येईल तितकें चढायचें व तेथून कूम, आइस फॉल, वेस्टर्न कूम, साउथ फॉल इत्यादि एव्हरेस्टवरील चढणीच्या मार्गावरील प्रसिद्ध स्थळें पाहायचीं असा आमचा बेत होता.

तो खुंबु बर्फप्रवाह तसाच खाली चार पांच मैल वहात येतो व पुढें त्याचें रूपांतर लोबुजा खोल्यांत होतें. लोबुजा खोल्यास उजव्या बाजूनें चोला खोला येऊन मिळतो व पुढें ते दोन्ही इम्जा बर्फप्रवाहांतून येणाऱ्या इम्जा खोल्याला मिळतात. तो इम्जा खोला पुढें नैर्ऋत्येला वळून पांगबोचे गांव, थ्यांगबोचे मठ, यांच्या जवळून वाहात उत्तरेकडून येणाऱ्या दूधकोसीला मिळतो. ती दूधकोसी नदी पुढें नामचे बझार येथें भोतेकोसीला आपल्यांत सामावून घेऊन दक्षिणेकडे वाहात जाते. एव्हरेस्टजवळील भूप्रदेश वरीलप्रमाणें आहे.

एव्हरेस्टच्या परिसरांत वीस हजार फुटांवरील अनेक शिखरें आहेत. नामचे बझारच्या जवळील टेकडीवरून आम्हांला चारही बाजूला हिमशिखरें दिसत होतीं. समोरचे बाजूस एव्हरेस्ट, लोट्से, नुप्ट्से हीं शिखरें, आमा डब्लाम शिखर ( २२३०० फूट ), उजवे बाजूला कांग्टेगा व ठमसेर्कू हीं जुळीं शिखरें ( २२१८० फूट ), डावे बाजूला तावेचे ( २१३९० फूट ), खुमिल्ला नांवाचें शैलशिखर ( १९३०० फूट ), पश्चिमेचें बाजूस क्वांगडे शिखरसमूह ( २०३२६ फूट ) अशीं उच्च उंच शिखरें आपल्या डौलदार आकारांनीं चारही दिशा शोभवीत होतीं. उजवे बाजूस, खालीं दोन अडीच हजार फूट खोल, दूधकोसीचा प्रवाह दिसत होता, समोर चार पांच मैलांवर, उजवीकडून पुढें आलेल्या एका डोंगराच्या कण्यावर थ्यांगबोचेचा गुम्बा व मठ दिसत होता. निसर्गानें आपला अत्यंत सुंदर चित्रांचा अल्बमच आमचेपुढें खोलून ठेविला होता. आम्ही रमत गमत तो मन मानेल तितका वेळ पाहात बसावें. त्यावेळेस कुठलेही शारिरिक कष्ट होत नसल्यामुळें चित्ररम्य देखावे पाहण्याचा आनंद लुटण्यास योग्य अशी आमची मनस्थिती होती, त्या दिवशींचा प्रवास थोडाच असल्यामुळें पुढें जाण्याची कोणाला घाई नव्हती. निसर्गानें उघडलेल्या त्या चित्र प्रदर्शनांत आम्ही स्वस्थपणें गुणग्रहण करीत होतों. पुढें गेलों असतां याच्याहीपेक्षां उत्तम चित्रें दिसणार होतीं हें आमच्या तेव्हां लक्षांत आलें नाहीं.

टेकडीवरून उतरून दूधकोसीच्या उजव्या तीरानें चालण्यास सुरवात केली. मार्गावर देवदार, भोजपत्र व रोडोडेंड्रॉन यांचे वृक्ष व इतर झुडपें विपुल होतीं. जगांतील सर्वांत उंच शिखराच्या परिसरांतील ही वनश्री अपूर्व व सुंदर आहे. नामचे बझारहून थ्यांगबोचे व थ्यांगबोचेहून पांगबोचे येथें जातांना एखाद्या

मोठ्या उपवनांतून गेल्यासारखें वाटतें. थ्यांगबोचेला जाण्यासाठीं दूधकोसी ओलांडणें जरूर होतें. त्यासाठीं दीड हजार फूट खालीं उतरून दूधकोसी लांकडी पुलावरून पार करून थ्यांगबोचेचा दोन हजार फूट उंचीचा डोंगर चढण्यास सुरवात केली. चढण उभी होती व उंचीमुळें पायांतील शक्तीवर विरळ हवेचा प्रतिकूल परिणाम होत होता. म्हणून मंदगतीनें वर चढत गेलों. पायवाटेच्या आजूबाजूचीं रंगीबेरंगी पर्णफुलें, आभाळाचा ठाव घेणारें जवळच असलेलें कांग्रेगा हिमशिखर, त्यावर असलेल्या हिमाच्या आकृत्या आणि त्या शिखराच्या पायथ्याखालचें रान या सर्वांचा देखावा नेत्रांस रिझवून श्रमपरिहार करीत होता.

## थ्यांगबोचे येथील प्रसिद्ध गुम्बा

थ्यांगबोचे गुम्बा ज्या कण्यावर बांधलेला आहे त्याची उंची सुमारें तेरा हजार फूट आहे. तेथें एक मोठा गुम्बा ( बौद्ध मंदिर ) व लामांचा मठ आहे. तेथील मुख्य लामास शेर्पांच्या प्रदेशांत खूप मान आहे. आम्ही तेथें गेलों त्यावेळेस मुख्य लामा तिबेटमध्यें यात्रेसाठीं गेला होता. मठांतील दुसरेही बरेच लामा बाहेरगांवीं धर्मकार्यासाठीं निघून गेले होते. तेथें तीनचारच लामा होते. तेथें पोंचल्यावर आम्ही एका लामाला भेटण्यास त्याचें खोलीत गेलों. खोलींत धुनी पेटविलेली होती. त्यावर चहाचें भांडें उकळत होतें. तेथल्या दुय्यम लामानें आमच्यापुढें प्यालें ठेवून त्यांत चहा ओतला. चढत असतांना आमच्या आजुबाजूला नयन-रम्य देखावे, आणि थकून भागून तेथें पोंचल्यावर आमच्यापुढें गरम गरम चहाचे प्याले– हें वर्णन वाचून वाचकांना आमचा हेवा वाटू लागेल. पण इतका हेवा वाटण्याचें कारण नाहीं. तो चहा होता हें खरें. परंतु तो तिबेटी चहा होता. त्याचें वर्णन मागें केलेलेंच आहे. मीं एक कपापेक्षां अधिक चहा पिऊं शकलों नाहीं आणि तोसुद्धां अगदीं गरम गरम होता म्हणून. लामाशीं थोडावेळ संभाषण करून आम्हीं गुम्बा पहावयास गेलों. गुम्बासमोर आपल्याकडील देवळा-सारखें आवार असून बाजूला ओवऱ्या व पडवी होती. तेथें एक घंटा टांगली

होती. ती घंटा म्हणजे सन १९२४ च्या ब्रिटिश पथकानें वापरलेलें ऑक्सिजनचें मोकळें नळकांडें आहे. रॉंगबक येथून नंग्पाला घाटांतून कोणीतरी शेर्पानें तें येथें आणून गुम्बास नजर केलें असलें पाहिजे. गुम्बाभोंवतीं प्रार्थना चक्रें हारीनें लावलेलीं होतीं. माणिमंत्र कोरलेलीं तीं चक्रें उजव्या हातानें फिरवीत आम्हीं आधीं गुम्बाला प्रदक्षिणा घातली व त्यानंतर आंत शिरलों. पश्चिमेच्या बाजूला दोन गवाक्षें होतीं. त्यांतून थोडा उजेड आंत येत होता. आंत बुद्धदेव व त्याचे बाजूस दुसऱ्या दोन देवतांच्या मूर्ति होत्या. मूर्तींच्या पुढें दोर्जे, घंटा वगैरे उपकरणीं ठेवलेलीं होतीं. दोन बाजूला लामांसाठीं आसनें होतीं. भिंतीवर रंगीत चित्रें होतीं. भिंतीवरील कोनाड्यांतून तंजुर आणि कंजुर ( पोथ्या ) ठेवलेल्या होत्या. खांबावरून कापडावर काढलेलीं रंगीत चित्रें ( ठंका ) लोंबत होतीं. गुम्बाचे आंत आमचेबरोबर दोन लामा आले होते. तेथेंही पुन्हां एकदां ( तिबेटी ) चहापान झालें. दुय्यम लामानें सुरईतून सर्वांच्या पेल्यांत चहा भरला. त्या सर्वांनीं तो पेला एकदां तोंडाला लावून पिऊन टाकला. आम्ही मात्र घुटके घेत प्यालों. फारच आवडला म्हणून नव्हें तर एकदम पिणें कसेंसेंच वाटत होतें म्हणून. चहा पिऊन कप खालीं ठेवला कीं पुन्हां सुरई घेऊन चहा ओतायला लामा हजर. निग्रहानें नको सांगितलें तरच त्यांचा आग्रह थांबायचा.

जिना चढून वरती गेल्यावर तेथें एकदोन खोल्या आढळल्या. एक मुख्य लामाची खोली होती. दुसऱ्या खोलींत नाचाच्यावेळीं वापरण्यांत येणारे मुखवटे, पोषाख, वाद्यें, पोथ्या वगैरे वस्तू ठेवलेल्या होत्या. दिवंगत लामांचे पुतळेहि होते. थ्यांगबोचेचा मठ जुना आहे. परंतु पूर्वीची जुनी इमारत पंचवीस वर्षांपूर्वी झालेल्या भूकंपांत पडून गेली. त्या भूकंपांत तेथील मुख्य लामाही सांपडून स्वर्गस्थ झाला. सध्यांची इमारत पुन्हां बांधण्यांत आली. इमारत लांकडी होती.

गुम्बा पाहून बाहेर आलों व गॅलजेन शेर्पाच्या भावाच्या खोलींत वस्ती केली. त्याचा भाऊ तेथें लामा होता, पण तोही तिबेटांत गेला होता. रात्री थंडी बरीच वाढली. पुढें खुंबु बर्फप्रवाह व पुमोरीवर थंडी कशी असेल याची चांगलीच कल्पना येऊं लागली. आमचे शेर्पा भारवाहक आमच्या खोलीच्या बाहेरील पडवींत झोपले होते. त्यांत कांहीं शेर्पाणीही होत्या. त्या ओझें वाहण्यांत पुरुषांच्याबरोबरीनें काटक होत्या. एक शेर्पाणी पाठीवर ओझें घेऊन चालत

असतांना मधुन मधुन स्वेटर विणीत असे. आणि एवढें असूनही, तिचा फोटो काढण्यास मी उभा राहिलों असतां, ती स्मित करीत होती. "Smile please" असें तिला सांगावें लागलें नाहीं.

दुसरे दिवशीं पहाटे उठून बाहेर गेलों, तेव्हां उजाडूं लागलें होतें. जवळच असलेल्या हिमशिखरांचा देखावा पाहून चित्त वेधून गेलें. कांग्टेगा शिखर तर अगदीं जवळ दिसत होतें. त्यावरील प्रत्येक दगड आणि खड्डा दिसत होता. एक क्षण वाटलें कीं त्यावर चढून जावें. पण त्या शिखराच्या उभ्या भिंतीमुळें व हिमाच्या लोंबत्या गोळ्यांमुळें त्या शिखरांवर जाणें अशक्य होतें. शिवाय तें शिखर दिसत होतें तितकें चालत जायला जवळ नव्हतें. त्या शिखराच्या पायथ्याशीं पोचायलाच दोन दिवस लागले असते. थ्यांगबोचेहून केवळ कांग्टेगाचेंच नव्हे तर तावेचें व आमा डब्लाम हीं शिखरेंही अगदीं जवळ दिसत होतीं. अरुणोदय झाल्यावर त्यांची शोभा वाढूं लागली. ईशान्य दिशेला लोट्से नुपट्से भिंत व मागें एव्हरेस्ट शिखर हें नामचे बझारला पाहिलेलें दृश्य दिसत होतें. फरक एवढाच झाला होता कीं, त्या भिंतीच्या आम्ही जवळ आल्यानें त्या मागील एव्हरेस्ट शिखराचा भाग कमी दिसत होता. एव्हरेस्ट लोट्से नुपट्से या पर्वतसमूहाला इकडचे लोक 'छोमोलुंग्मा' असें म्हणतात. पश्चिमेकडे क्वांगडे शिखर व दूरचें कार्योलंग शिखरही दिसत होतें. त्याचेखालीं दूधकोसीचा प्रवाह नामचे बझारहून आम्ही आलों ती वाट स्पष्ट दिसत होती. मंदिर व मठ बांधण्यासाठीं लामांनीं किती सुंदर स्थळ निवडलें आहे. "थ्यांगबोचे हें अखिल जगांतील सुंदर स्थळांपैकीं एक आहे." असें कर्नल हंटनीं आपल्या एव्हरेस्टवरील ग्रंथांत म्हटलें आहे. तें पूर्णपणें पटतें. थ्यांगबोचे मठाच्या बाहेर हिरवळ असलेलें मोठें मैदान आहे. गेल्या ब्रिटिश एव्हरेस्ट पथकानें आपला मोठा तळ त्या मैदानांतच बनवला होता.

बांधाबांध करून फेरिचेला जाण्यास निघालों. प्रथम घनदाट वनांतून डोंगर उतरीत गेलों. भोजवृक्षाच्या फांदीवरून सुटी झालेलीं भोजपत्रें व हिरवी जाळी-दार शेवाळें लोंबत होतीं. थोडथोड्या अंतरावर मणिभिंती, मणिमंत्र कोरलेल्या मोठ्या शिला, व चोर्टेन भेटत होतीं. आम्हांला प्रथम देऊबोचे हें छोटें गांव लागलें. तेथें बौद्ध जोगिणींचा मठ व गुम्बा आहे. थ्यांगबोचे मठांत फक्त पुरुष

लामा व येथील मठांत फक्त स्त्रीलामा राहतात. इम्जा खोलाच्या डाव्या तीरावरून जात असतां एका लहानशा कड्यावर उभा असलेला कस्तुरी मृग गॅलजेननें दाखवला. तो छोट्या हरणाच्या आकाराचा करड्या रंगाचा होता. जरा पुढें गेल्यावर जारल नांवाचा हरणासारखा प्राणी दिसला. एका कड्यावर उभ्या असलेल्या जारलाचा मला फोटो घेतां आला. या प्रदेशांत बौद्ध मठ असल्यामुळें प्राण्यांची शिकार कोणी करीत नाहीं. त्यामुळें ते निर्भयपणें वावरतात. इम्जा खोला ओलांडून आम्ही उजव्या तीरावर गेलों व चढूं लागलों. वाटेंतील मणिभिंती व चोर्टेन यांना रिवाजाप्रमाणें डावी घालून जाण्याचा कंटाळा येई. परंतु आमच्याबरोबर असलेल्या शेर्पांच्या भावना दुखवूं नयेत म्हणून, आम्ही शक्य तोंवर डाव्या बाजूनें जाण्याचा रिवाज पाळत होतों. थोड्याच वेळांत पांगबोचे हें गांव लागलें. त्या गांवाची समुद्रसपाटी पासून उंची सुमारे चौदा हजार फूट असेल. एव्हरेस्टच्या मार्गावरील कायमची वस्ती असलेलें हें शेवटचें गांव. यापुढें फेरिचे, दिगुबोचे वगैरे ठिकाणीं कांहीं झोपड्या आढळतात. पण तेथें कायम वस्ती नसतें. फक्त गुराखी लोक याक उर्फ चमरी यांना घेऊन, चारण्यासाठीं तेथें जातात, व कांहीं दिवस राहतात. दिंबोचे येथें उन्हाळ्यांत बटाटे व बार्लीची लागवड करण्यासाठीं खालच्या गांवांतून शेर्पा लोक जातात. आम्ही गेलों तेव्हां कांहींजण शेतांतील बटाटे उकरून गोळा करीत होते.

पांगबोचे येथें कांहीं चमरी चरत असलेल्या पाहून दूध मिळेल कां, अशी चौकशी केली. एका शेतकऱ्याकडे दूध होतें. तें पिण्याचें आधीं गरम करण्यास सांगून आम्ही बाहेर चटई टाकून बसलों. एवढ्यांत घराचे मागील बाजुकडून, दाढी वाढलेला व मळकट कपडे घातलेला गोरा साहेब व त्याच्या पाठीमागें लांब केस असलेला व उग्र दिसणारा असा एक शेर्पा अशी जोडी आमचेकडे येतांना दिसली. तो गोरा साहेब डॉ. एव्हन्स आहे हें आमच्या लगेच ध्यानांत आलें. गेल्या ब्रिटिश चढाईंत शिखरावर चढाई करणाऱ्या पहिल्या जोडींत जाऊन डॉ. एव्हन्स २८५०० फुटांवर म्हणजे एव्हरेस्ट शिखराच्या केवळ पांचशें फूट खालीं असलेल्या दक्षिण शिखरावर ( साऊथ समिटवर ) जाऊन आलेले होते. हे पट्टीचे गिर्यारोहक. सर्वांचे बरोबर स्वदेशांत न जातां हिमालयाच्या दऱ्याखोऱ्यांतूनच ज्यावर पूर्वी कोणीं पाऊल टाकलेलें नाहीं असे भूप्रदेश पहात भटकत आहेत.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



खुंबु बर्फप्रवाहामधील 'आइस टेबल' जवळ हातांत बर्फाची काठी घेऊन उभे असलेले श्री. नवनीत पारेख



शेर्पा गॅलजेन त्याच्या हातांत हिम-मानवाच्या डोक्याचें कातडें आहे.

असें आम्हीं काठमांडू येथें ऐकलें होतें. आम्हीं त्यांना आमच्याबरोबर दुग्धपानास बोलावलें. त्यांच्याशीं हस्तांदोलन करतांना मला प्रसिद्ध शोधक प्रवासी डॉ. लिव्हिंग्स्टन व त्याचा शोध करण्यास आफ्रिकेंत गेलेल्या वृत्तपत्राचा बातमीदार स्टॅन्ले यांच्या भेटीच्या प्रसंगाचें वाचलेलें वर्णन आठवलें. डॉ. लिव्हिंग्स्टन यांस आफ्रिकेच्या अंतर्भागांत जाऊन कांहीं वर्षें होऊन गेलीं होतीं. तो जिवंत होता किंवा नाहीं याची लोकांना शंका वाटूं लागली होती. त्यावेळेस एका अमेरिकन वृत्तपत्रानें स्टॅन्लेच्या प्रवासाचा खर्च सोसून त्याला आफ्रिकेंतील जंगलांत डॉ. लिव्हिंग्स्टनचा शोध करण्यासाठीं पाठविलें. स्टॅन्लेनें आफ्रिकेंत जाऊन तेथील रानटी लोकांमध्यें चौकशी करून लिव्हिंग्स्टनचा ठावठिकाणा काढण्यास सुरवात केली. कांहीं महिन्यांच्या वाटचालीनंतर अखेर टांगानिका सरोवराजवळ त्याची व लिव्हिंग्स्टनची गांठ पडली. तेव्हां त्याच्याशीं हस्तांदोलन करतांना स्टॅन्लेनें त्यावेळेस म्हटलेल्या प्रसिद्ध वाक्यांत नांवाचाच बदल करून मीं म्हटलें, " Dr. Evans, I presume " माझें वाक्य ऐकून डॉ. एव्हन्सनीं स्मित केलें.

हस्तांदोलन व परिचय झाल्यावर, त्यांनीं आमच्याशीं तासभर गप्पागोष्टी केल्या. त्यांच्यासारख्या व्यासंगी व कुशल गिर्यारोहकांच्या संगतींत, एव्हरेस्टच्या छायेंत तासभर घालवितां आल्यानें मला फार आनंद वाटला. ते नुकतेच चोळा-खोल्याच्या उगमाकडील बर्फप्रवाह व पर्वत यावर परिभ्रमण करून परत येत होते. आमच्या पुमोरीवरील गिर्यारोहणांविषयीं त्यांनीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या. पुमोरीजवळील शिखरें व घाट दाखविण्यासाठीं त्यांनीं माझ्या टिपण वहींत चटकन् एक रेखाचित्र काढून दिलें. खुंबु बर्फप्रवाहाच्या बाजूनें पुमोरीच्या टोंकावर जाणें शक्य होणार नाहीं, पुमोरी चढून वर जायचें असेल तर तिबेटच्या बाजूनें जाण्याची शक्यता आहे असें त्यांनीं आपलें मत दिलें. पुमोरी शिखरावर खुंबु बर्फप्रवाहाचे बाजूनें चढणें कठिण आहे याची कल्पना आम्हांला दुसऱ्या एका ब्रिटिश गिर्यारोहकानें दिलेली होती. परंतु आमचें ध्येय केवळ पुमोरीचें शिखर गांठणें हें नसून, एव्हरेस्टचें जवळून दर्शन घेणें हें होतें, व तें पुमोरी पर्वता-वरूनच चांगलें साध्य होईल याची आम्हांला खात्री होती

बोलतां बोलतां डॉ. एव्हन्सकडून आम्हांला कळलें कीं, पांगबोचे येथील गुम्बात ' हिममानवाचें ' किंवा ज्याला शेर्पा लोक ' येति ' म्हणतात. त्या

प्राण्याच्या डोक्याचें कातडें जपून ठेविलेलें आहे. तें बघण्यासाठीं आम्ही त्यांचे बरोबरच टेकडीवर असलेल्या गुम्बात गेलों. तेथील लामानें गुम्बाच्या वरच्या सामानाच्या खोलींतून तें कातडें काढून आम्हां सर्वांना दाखविलें. आम्ही त्याचे फोटो घेतले. डॉ. एव्हन्सनींही फोटो घेऊन शिवाय त्या कातड्यावरील दोन कैंस अधिक निरीक्षणासाठीं तोडून घेतले. तें कातडें निमुळत्या टोपीच्या आकाराचें असून त्यावर उदी रंगाचे कैंस होते. ज्या शेर्पोनीं येति प्रत्यक्ष पाहिला आहे असें सांगतात त्यांनीं केलेल्या वर्णनास जुळणाऱ्या आकाराचें व रूपाचें तें डोक्याचें कातडें होतें. असें डॉ. एव्हन्स यांचें मत दिसलें, अर्थात् हिमालयांत हिममानव ( Abominable Snowman ) आहे कीं नाहीं व असल्यास तो मानव आहे कीं वानर किंवा अस्वल यासारखा एखादा प्राणी आहे हा विषय अजून वादग्रस्त आहे. आपण येती पाहिला असल्याच्या गोष्टी कांहीं शेर्पा सांगतात पण त्यांच्या त्या गोष्टी भुतांच्या गोष्टींसारख्या मनःकल्पित व अतिरंजित वाटतात. शिप्टन, टिलमन इत्यादि कांहीं गिर्यारोहकांचा हिममानवाचे अस्तित्वावर विश्वास आहे असें दिसतें. तर दुसरे कांहीं गिर्यारोहक हिममानव हा शेर्पोच्या कल्पनेचा खेळ आहे असें मानतात. या हिमपुरुषाचा छडा लावण्यासाठीं ब्रिटनमधून एक पथक यंदा हिमालयांत येत आहे. हें पथक तरी याचा कायमचा छडा लावूं शकेल कीं नाहीं कोण जाणें.

डॉ. एव्हन्सचा निरोप घेऊन आम्ही पुढें निघालों. वेळ बराच गमाविल्यानें झपाट्यानें चालूं लागलों. इम्जा खोला व लोबुजा खोला यांच्या संगमापाशीं पोचल्यावर, ओंड्याचे पुलावरून लोबुजा खोलाच्या पलीकडील तीरावर गेलों. मी, रूसी व होमी पुढें होतों. नवनीत व गायतोंडे, आणि आमचे भारवाहक मागून येत होते. आम्ही दोन वाजतांच फेरिचे नांवाच्या स्थळीं पोचलों. साडेतीन चारचे सुमारास, सूर्य पश्चिमेकडील पर्वताच्या आड गेला, व थंडी वाजूं लागली. वारा फार गार व झोंबणारा होता. म्हणून तेथेंच एका दगडी झोंपडीचे आडोशास जाऊन, मागून येणारांची वाट पाहात बसलों. फेरिचे येथें हिरवळ असलेलें मोठें मैदान आहे. एकावर एक दगड रचून तयार केलेल्या भिंती घालून त्या मैदानाचे तुकडे पाडलेले आहेत. ते तुकडे निरनिराळ्या लोकांच्या मालकीचे आहेत. प्रत्येकाचे आवारांत दगडांच्या भिंती व लाकडी फळ्यांचें छप्पर अस-

लेली एकएक झोपडी आहे. कांहीं झोपड्यांना कुलपें लावलेलीं होतीं व कांहीं उघड्या होत्या. तेथें वस्ती मुळींच नव्हती. आमचे सोबती व शेर्पा आल्यावर, त्या मोकळ्या झोंपड्यांतून मुक्काम करायचें आम्ही ठरविलें. सायंकाळीं मावळत्या सूर्याचे किरण, दक्षिणेच्या बाजूस जवळच असलेल्या हिमशिखरांवर पडून तीं सोनेरी कळसांसारखीं चकाकूं लागलीं. त्या दिवशीं रात्रीं उष्णतामान हिम-बिंदूच्या ( फ्रीझिंग पॉइंटच्या ) खालीं गेलें.

सकाळीं उठलों तेव्हां उगवत्या सूर्याचीं किरणें जवळच्या हिमशिखरांवर आलेलीं होतीं. पण फेरिचेच्या खोऱ्यांत अजून उन्हें आलेलीं नव्हतीं. त्यामुळें थंडी तीव्र भासत होती. गरम कपडे अंगावर घालून दोन फर्लांग अंतरावर ऊन आलें होतें तेथें जाऊन भारवाहकाची तयारी होण्याची वाट पहात उभे राहिलों. शेर्पा भारवाहक सकाळीं संपा म्हणजे सातूचें पीठ शिजवून केलेला पदार्थ खात असत. भारवाहक शेर्पा व शेर्पांणी थोड्याशा जागेंत खेळीमेळीनें रहात. आम्ही त्यांना रात्रीं राहण्यासाठीं खडकांचे आधारानें पाल बांधीत असूं. शीतप्रदेशांत कायमचे रहात असल्यामुळें त्यांना आमच्यासारखा थंडीचा त्रास होत नसे. आम्हांला मात्र जसजसें वर जाऊं लागलों तों तों थंडीची तीव्रता जाणवूं लागली व जीवन असह्य होऊं लागलें.

## खुंबु बर्फप्रवाहाचे बाजूनें

भारवाहकांची तयारी झाल्यावर फालांग खर्पा या फेरिचेसारख्या वाडीवजा स्थळाच्या दिशेनें चालूं लागलों. उंची जवळजवळ सोळा हजार फूट झाल्यानें दमछाट अधिक होऊं लागली. दर एकदोन तासांनीं विश्रांति घ्यायला बसावें लागत होतें. उन्हांत बसून विश्रांति घ्यायला मजा वाटत होती. फालांग खर्पाचे पुढील चढण चढून गेल्यावर ज्या शिखरावर आम्ही चढाई करणार होतों, त्या पुमोरी शिखराचें दर्शन झालें. लगेच सर्वांनीं भराभरा कॅमेरे काढून पुमोरीचे फोटो घेतले. आकाश अगदीं निरभ्र व निळें दिसत होतें नवनीतनीं तेथून काढलेले रंगीत फोटोही उत्तम आले. लवकरच आम्ही खुंबु बर्फप्रवाहाच्या मुखाशीं

जाऊन पोंचलों व बर्फप्रवाहाचें उजवे तीरानें चालूं लागलों. वाटेंत दगडांच्या मोठमोठ्या राशीवरून चढून व उतरून जावें लागत होतें, जरा पुढें गेलों असतां, खुंबु बर्फप्रवाहांतील बर्फाच्या वितळून झालेल्या पाण्याचा एक ओढा भेटला. तो ओढा उतरणीवरील मोठमोठ्या दगडावरून वहात होता. तो ओलांडून जाण्याची अडचण उभी राहिली. पाण्यांतुन जावें तर पायांतील बूट काढून त्या गार पाण्यांत उघड्या पायांनीं चालावें लागलें असतें. ओढ्यांतील पाण्यावर आलेल्या दगडांवर बर्फ सांचलें होतें. त्यामुळें त्यावरून उड्या मारून जाण्याचीही पंचाइत झाली. कारण पाय घसरला तर पायच काय, सर्व शरीरच त्या गार पाण्यात भिजायचें. माझे तिघे सोबती व बहुतेक भारवाहक पुढें निघून गेले होते. मी ओढ्यापाशीं पोचलों तेव्हां तेथें कोणी नव्हतें. पुढें गेलेले लोक ओढा कसे ओलांडून गेले तें कळेना. एक दोन वेळां दगडावरून उड्या मारून जाण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण जमेना. तेव्हां तेथेंच थांबून, मागून नवनीत व एक शेर्पा येत होते त्यांची वाट पहात बसलों. शेर्पा तेथें आल्यावर त्यानें बूट काढून पाण्यांतून चालण्यास सुरवात केली. मग मीही त्याचें अनुकरण करून बूट, मोजे काढून पाण्यांतून चालत गेलों. पाय अगदीं गारठून गेले. त्या दिवशींचा मुक्काम आणखी एक दोन मैल होता. चालतां चालतां अगदीं दमून गेलों. विरळ हवेच्या परिणामामुळें डोकें दुखूं लागलें होतें. जेमतेम एकापुढें एक पाऊल टाकीत चाललों होतों. पुढें गेलेले लोक केव्हांच नजरेआड झालेले होते. मी व नवनीत एके ठिकाणीं फोटो काढण्यास थांबलों ( आणि थोडा दमही खाल्ला ) म्हणून मागें राहिलों होतों. आज आम्ही लोबुचे नांवाच्या ठिकाणीं एका दगडाच्या झोंपडींत व ओडारमध्यें मुक्काम करणार होतों. पुढें गेलेल्या शेर्पा भारवाहकांनीं स्वैंपाक करण्यासाठीं आग पेटवली होती. त्या आगीचा धूर लांबून दिसला. तो पाहून जिवांत जीव आला व राहिलेले तीनशें चारशें यार्ड ( झपाझप नव्हे पण ) उत्साहानें पावलें टाकीत मी ती झोंपडी गांठली. शेर्पानें बिछाना पसरला होताच, त्यावर जाऊन हुश्श करीत बसलों. लोबुचे तळाची उंची सुमारें सतरा हजार फूट होती. पोंचलों तेव्हां चार वाजतांच उष्णतामान हिमबिंदूच्या दोन अंशाखालीं गेलें होतें. रात्रीं तें आणखी नऊ अंश खालीं गेलें.

सकाळीं उन्हें आमच्या तळावर आल्यावर आम्ही सुमारें साडे आठ वाजतां पुढें जायला निघालों. सतरा हजार फुटांवर प्रत्येक पाऊल टाकायचें म्हणजे कष्ट पडत होतें. श्वास जोरानें घ्यावा लागत होता. मी यापूर्वी अकरा हजार फुटांवर कधीं गेलों नव्हतों. त्यामुळें एवढ्या उंचीवरील अनुभव मला नवीन होता. आमच्या पथकांतील कांहीं सोबती सतरा अठरा हजार फुटांवर हिमालयांतील दुसऱ्या ठिकाणीं जाऊन आलेले होते आम्ही हळूहळू चालत दुपारीं दीड वाजतां एका लहान तळ्यापाशीं गोरूचे नांवाच्या तळावर जाऊन पोंचलों. आमची आणखी पुढें जाण्याची इच्छा होती, पण भारवाहकांनीं पुढें जाण्याचें नाकबूल केलें म्हणून कांहीं वेळ विचार विनिमय झाल्यावर आम्ही तेथेंच मुक्काम करण्याचें ठरविलें. तेथें झोंपडी वगैरे नसल्यामुळें तंबू, ठोकून त्यांत वस्ती केली. एवढ्या उंचीवर चालण्याच्या श्रमामुळें अशक्तता आली होतीच. त्याशिवाय, शेर्पोशीं विचार विनिमय चालू असतांना, मी अर्धा तास एका उंचवट्यावर, झोंबणाऱ्या वाऱ्यांत बसलों होतों, त्यामुळें थंडीभरली, व केव्हां एकदां तंबूंत जाऊन झोंपण्याच्या पिशवींत शिरतों असें झालें. सायंकाळीं साडे पांच वाजतांच झोंपण्याच्या पिशवींत शिरलों. तासदीडतासानें फक्त जेवण्यासाठीं थोडा वेळ बाहेर आलों होतों. रात्रीं पुरेशी विश्रांति घेऊन, सकाळीं पुढें चालत जाण्यासाठीं खडखडीत बरें होणें प्राप्त होतें. ईश्वराची प्रार्थना व मनाची तयारी करून झोपीं गेलों. रात्रीं उष्णतामान हिमबिंदूच्या वीस अंश खालीं गेलें. गोरूचे तळाची उंची सुमारें साडे सतरा हजार फूट असावी.

दुसरे दिवशीं सकाळीं ऊन येईपर्यंत म्हणजे आठ वाजेपर्यंत तंबूच्या बाहेर आलोंच नाहीं. कारण आधीं बाहेर येऊन, तयारी करून उभे राहिले कीं, इतर सर्वांची तयारी होईपर्यंत वेळ काढणें कठिण होतें. नामचे बझार सोडल्यापासून पुन्हा नामचे बझारला परत जाईपर्यंत स्नान करणें शक्य नव्हतें. इतके दिवस सकाळीं तोंड धुतल्याशिवाय, गेबीलालनें तयार केलेला चहा पीत नव्हतों. नामचे बझारचे पुढें आल्यावर तोंड धुणें राहिलें पण निदान चूळ तरी भरत होतों. आतां यांतील तीव्र थंडींत तेंही बंद करून 'बेड टी' घेण्यास सुरवात केली. गलिच्छपणाबद्दल शेर्पोनाच नांवें कशाला ठेवायचीं ? आज आम्ही पुमोरीच्या पायथ्याच्या तळापर्यंत जाणार होतों. गेल्या दोन वर्षांत तीन मोठीं पथकें

एव्हरेस्टला जाऊन आल्यामुळें इकडच्या शेर्पांना एव्हरेस्टच्या पायथ्याकडे जाण्याचा मार्ग माहीत झालेला होता. पण तो मार्ग बर्फप्रवाहावरून जात असल्यामुळें थोडे दिवसानंतर त्यांत फरक पडत असतो. पुमोरीच्या पायथ्याचा मार्ग एकदोघानांच माहीत होता. त्यांना पुढें करून आम्ही सर्वजण चालूं लागलों. वाटेंत मोठमोठ्या दगडांनीं भरलेल्या टेकड्या होत्या, त्यांतून पायवाट तयार होणें शक्यच नव्हतें. म्हणून मार्ग चुकण्याची भीति होती. टेकडीच्या उतारावरील दगडांच्या राशीवरून जाणें धोक्याचें होतें. कांहीं कांहीं मोठे दगड लहान दगडांच्या आधारानें कसे तरी टेकलेले असत. त्यांतला एखादा दगड आपल्या वजनानें किंवा पायाच्या दाबानें हलला तर दोनचार दगड खालीं घसरत येत. घसरणाऱ्या एखाद्या मोठ्या दगडाखालीं शरिराचा अवयव सांपडला तर हाडच मोडायचें म्हणून मी शक्य तोंवर मोठ्या दगडाच्या वरच्या बाजूनें जात होतों. म्हणजे आपल्या हालचालीमुळें तो दगड घसरला तरी आपल्या हातापायावर यायला नको. त्या ठिकाणीं हातापायाचें हाड मोडलें असतें तर–तर काय केलें असतें याचा विचारसुद्धां करवत नाहीं. आमच्याबरोबर डॉक्टर नव्हता. फार झालें तर मोडक्या हातापायाला काठी बांधून बँडेज बांधलें असतें. पण शेदीडशें मैल डोंगरावरून, दऱ्याखोऱ्यांतून भारतांत परत यायचें कसें ? एखाद्या शेर्पाच्या पाठीवरून किंवा स्ट्रेचरवरूनच यावें लागलें असतें. अन्नपूर्णा शिखरावर यशस्वी चढाई करून आलेला फ्रेंच पथकाचा नेता मॉरीस हेर्झोग याचे हात व पाय, वरच्या तळावर हिमदग्ध झाले. त्याला शेर्पांनीं पाठीवर उचलून वरचे तळावरून खालीं आणला, व पुढें स्ट्रेचरवरून अनेक मैल भारताच्या सरहद्दीपर्यंत वाहून आणला. पण असे आमच्यापैकीं एखाद्याला उचलून किंवा वाहून आणलें असतें, तरी वाकड्या तिकड्या जुळलेल्या हाडामुळें कायमचेंच व्यंग नसतें कां आलें ? हे विचार मी कागदावर उतरवीत असतांना कल्पनेला खुशाल संचार करूं देत आहे. कारण मी या दिव्यांतून पार पडलेलों आहे. त्यावेळेस असा कांहीं विचार डोक्यांत आला तरी तो कपड्यावरील झुरळासारखा झटकून देऊन इतर गोष्टींत मन घालीत होतों. “ असं झालं तर काय होईल ? ” असा दूरवर विचार केला असता तर पाऊल पुढें पडायच्या ऐवजीं मागेंच पडलें असतें.

गिर्यारोहकांच्या पथकांत डॉक्टर बरोबर असण्यामुळें त्यांचा आत्मविश्वास वाढेल. मी पुमोरी पर्वतावर वीस हजार फुटांवर चढून परत आलों. तेवढें चढून गेल्यावर तेथूनपरततांना मनांत हा विचार होता कीं, या साहसांतून ठीकपणें पार पडलें पाहिजे. आजारी पडलों, दुखापत झाली, किंवा एखादा अवयव हिमदग्ध झाला तर औषधोपचार करण्यास डॉक्टर नाहीं. म्हणून, हातपाय शाबूत आहेत तोंपर्यंतच परतावें. आमचेबरोबर डॉक्टर असता तर कदाचित् आणखी वर चढून जाण्याचें साहस केलें असतें. गिर्यारोहकांच्या पथकांत डॉक्टर असावा हें खरें पण भाडोत्री डॉक्टर असून चालणार नाहीं. त्या डॉक्टरला स्वतःला गिर्यारोहणाची हौस हवी व ती भागवतां येण्याजोगा काटकपणाही अंगीं हवा. नाहींतर डॉक्टरलाच इतरांनीं शारीरिक व मानसिक उपचार करण्याची पाळी यायची. पाश्चात्य देशांत गिर्यारोहणाची हौस असलेले डॉ. एव्हन्ससारखें अनेक तरुण आहेत. त्यामुळें गिर्यारोहकांच्या पथकांत एखाद्या डॉक्टरला सहज सामील करून घेतां येतें. आपल्याकडील डॉक्टरांनीं फुरसतीच्या वेळांत असे छंद लावून घेतले तर किती बरें होईल?

● ● ●



# पुमोरीवरून एव्हरेस्टचें दर्शन

## तयारीचें स्वरूप

त्या दिवशीं दुपारीं एक वाजतां पुमोरीच्या पायथ्याशीं तळ बनवला. तळाच्या आसपास मोठे दगड होते. दोन्ही बाजूस टेकड्या होत्या. जवळच झरा होता. सूर्य तळपत असला कीं त्या झऱ्यांतून पाणी वाहूं लागे. एरवीं गोठून जाई.

पुमोरीच्या पायथ्याच्या तळावर रात्रीं उष्णतामान हिमबिंदूच्या २६ अंश खालीं गेलें होतें. अंगांत गरम कपडे घालून, झोपण्याच्या दोन पिशव्या एकावर एक चढवून त्यांत झोपलों. डोकें दुखत होतें. गेले कांहीं दिवस खोकला येत होता. तो आज वाढला. येथें कसें निभावणार असें वाटूं लागलें. येथील दोन शत्रु म्हणजे विरळ हवा आणि थंडी. ऊन्ह तळावर येण्यापूर्वी तंबूच्या बाहेर गेलें किंवा सूर्य ढगाआड गेला कीं, हातमोजे व पायमोजे असले तरी हातपाय गारठत. तंबूमध्यें झोपण्याच्या पिशव्यांत मात्र थंडीचें निवारण होत होतें

येथून पुढें पुमोरीवर चढाई व खुंबु बर्फप्रवाहावर जाणें या गोष्टी ज्याच्या त्यानें आपल्या ताकदीप्रमाणें कराव्यात असें आमच्यांत ठरलें. गायतोंडे यांची तब्येत ठीक नव्हती म्हणून त्यांनीं तो दिवस पायथ्याच्या तळावर काढावयाचें ठरविलें. रुसी व होमी गांधी यांनीं कांहीं शेर्पा घेऊन वरती एका ठिकाणीं मुक्काम करण्याचें ठरविलें. मी व नवनीत पारेखनीं प्रत्येकीं एक एक शेर्पा बरोबर घेऊन, जितकें चढतां येईल तितकें पुमोरीवर चढायचें व तेथून एव्हरेस्टचें दर्शन घेऊन, सायंकाळच्या आंत पायथ्याच्या तळावर परत यायचें असें ठरविलें. गांधीबंधू पूर्वी दोन-तीन वेळां हिमालयांत जाऊन आलेले होते. नवनीतनीं कैलास, मानस-सरोवर, गंगोत्री वगैरे स्थळांची यात्रा केलेली होती. गायतोंडे तीन वर्षांपूर्वी पंचचुलीवर गेलेल्या भारतीय गिर्यारोहकांच्या पथकाबरोबर सुमारें अठरा हजार फुटांवर जाऊन आलेले होते. हिमालयांत परिभ्रमण व गिर्यारोहण करण्यास प्रथम जाणारा मीच काय तो होतों. म्हणून माझ्या अनुभवाच्या दृष्टीनें जें काय करतां येईल तेवढेंच करून पहायचें मीं ठरविलें.

सकाळीं चहापान केल्यावर मी सर्व गरम कपडे अंगावर चढविले. बारीक



लोकरीचें बनिअन व पायजमा, फ्लॅनेलचा शर्ट, त्यावर लोकरीचा स्वेटर, वरती लष्करी बॅटल ड्रेसचें जॅकेट व पॅंट हे कपडे घालून त्यावर ग्रेनफेल कापडाचा हिरवा वाताभेद्य पोशाख (विंडप्रूफ सूट) चढविला. शेर्पोकडून वापरावयास घेतलेलें वाताभेद्य कापडाचे हातमोजे घातले. डोक्यावर लोकरीची बॅलाक्लाव्हा टोपी, पायांत लोकरीच्या पायमोजाच्या तीन जोड्या, वरती उंच बूट, हातांत बर्फ-कुदळ, डोळ्यावर स्नो-गॉगल्स, हिमावरून परावर्तित होणाऱ्या किरणांमुळें चेहरा तडकून व काळवंडून जाऊं नये म्हणून चेहऱ्याला ग्लॅशिअर क्रीम लावलें होतें. वर हिमावर चढण्यासाठीं लागणारे क्रॅम्पन्स, जाड कातडी बूट, दोर वगैरे साहित्य पाठीवरील रॅकसॅकमध्यें होतें. माझ्याबरोबर अंगदावा नांवाचा शेर्पा येणार होता. त्यानेंहि तशीच तयारी केली.

## पुमोरीवरील चढाई

पायथ्याच्या तळाजवळील टेकडी चढून मी वर आलों. वर आल्याबरोबर पुमोरी, एव्हरेस्ट व इतर शिखरें दिसूं लागलीं. पुमोरीचें शिखर न्याहाळून मी आपल्याला कोठपर्यंत जाता येईल याचा विचार केला. वर बुरुजासारखा एक

खडक दिसत होता. त्यापुढें बर्फमय चढण व त्यावर एक मोठा खडक दिसत होता. तेथपर्यंत चढत जाऊन यायचें असें मीं ठरविलें. तें स्थळ समुद्रसपाटी-पासून सुमारें वीस हजार फूट उंचीवर होतें, सुमारें साडेएकोणीस हजार फुटांवर गेल्यावर नवनीत थांबले. "कांहीं फिल्म व फोटो काढून मी वरतीं येतों" असें ते म्हणाले. शेर्पा अंगदावा व मी पुढें चढूं लागलों.

माझ्या परिभ्रमणांतील या सर्वांत उंचीच्या स्थळीं वेळेवर पोंचून परत येण्यास मला बळ यावें यासाठीं मी ईश्वराची प्रार्थना करीत होतों. प्रियजनांची आठवण करून त्यांच्या सादिच्छेच्या पाठिंब्याची मागणी करीत होतों. देवाचें नांव घेत हळूं हळूं चढूं लागलों. दम घेण्यासाठीं वारंवार थांबावें लागत होतें. चढूं लागलें कीं श्वास जोराचा व एकसारखा घ्यावा लागे. त्याचा कंटाळा केला कीं पायांतील शक्ति नाहींशी होई.

कांहीं वेळ लागोपाठ श्वास जोरानें घेतल्यावर. आतां छाती फुटते कीं काय असें वाटूं लागे. म्हणून श्वासाची लय कमी होण्यासाठीं पुन्हा थांबावें लागे.

चढणीचा मार्ग लहानमोठ्या धोंड्यांवरून जात होता. पायाखालचा दगड घसरला कीं मीहि घसरत असे. एकदोन वेळां आपटलों. खडक व दगड यांवरील ही चढण संपल्यावर हिमावृत्त जमीन लागली. तिजवर चढूं लागण्यापूर्वी पायांतील साधे बूट काढून टाकून चढण्याचे मोठे जाड बूट घातले. त्या बुटांना क्रॅम्पन्स ( अणकुचीदार खिळे असलेल्या पोलादी पट्ट्या ) बांधल्या. हें करण्यास शेर्पा अंगदावानें बरीच मदत केली. कारण तीव्र थंडीमुळें हातमोजे काढून हातानें काम करणें मला कठीण होत होतें. त्यानेंहि स्वतःच्या बुटांना क्रॅम्पन्स बांधले, मग त्यानें माझ्या व आपल्या कमरेला दोर बांधला. तो दोर आम्ही डाव्या हातांत धरला. उजव्या हाताला बर्फकुदळीचा आधार होता. हिमावर चढण्याची अशी तयारी करून दोघेहि चढूं लागलों. मी पुढें होतों, मी घसरल्यावर साव-रून धरतां यावें यासाठीं दोराचें दुसरें टोंक त्यानें धरलें होतें. पायांत क्रॅम्पन्स असल्यामुळें हिमावरून न घसरतां चालतां येण्याची सोय झाली होती. बर्फहि घसरडें नव्हतें. शरद् ऋतूंत हिम साधारणपणें स्थिर असतें. चढतांना बर्फकुद ळीची मदत होत होती. इतकें असतांहि जाड बूट घालून व क्रॅम्पन्स लावून

चालण्याची संवय नसल्यामुळें, पायाला स्केट्स् प्रथमच लावून चालणाऱ्या माणसासारखी माझी अवस्था होत होती. दोनतीन वेळां पाय नीट न पडल्यामुळें मी घसरून पडलों. हिमावर पडल्यावर लागत नाहीं म्हणून बरें.

## एव्हरेस्ट–दर्शन

याप्रमाणें मी श्वास जोरानें घेत, मधूनमधून विश्रांतीसाठीं उभे रहात वर चढत होतों. हिमाची उभी चढण संपल्यावर वरचा खडक आला. त्यावर थोडें चढून मी इच्छित स्थळीं जाऊन पोचलों. आता माझ्यासमोर एव्हरेस्टचें स्थिर चित्र होतें. तें मी मनसोक्त पाहूं शकत होतों. एव्हरेस्टचें शिखर अतिशय स्पष्ट व जवळ दिसत होतें.

मी बसलों होतों त्या स्थळापासून एव्हरेस्टचें शिखर पांच मैल दूर व नऊ हजार फूट उंच होतें. त्या स्थळापासून मीं घेतलेलें एव्हरेस्टचें छायाचित्र कोणी पाहिलें तर एव्हरेस्ट एवढें दूर व एवढें उंच असेल असें त्याला वाटणार नाहीं. परंतु त्या स्थलापर्यंत पोंचण्यास एकेक फूट चढण्यासाठीं जिवाचें रान करावयास लागलेल्या मला माझ्यासमोर असलेल्या एव्हरेस्टची उंची पूर्णपणें जाणवत होती.

तेनसिंग व हिलरी यांजजवळ गिर्यारोहणाचें कसब होतें हें तर खरेंच, पण काटकपणा व एव्हरेस्टवरील असह्य वातावरणांत धोके पत्करून वर जाण्याची दुर्दम्य इच्छाशक्ति हे गुण त्यांना एव्हरेस्टवर चढून जाण्यासाठीं जास्त उपयोगी पडले असावेत.

आकाश अगदीं निरभ्र व हवा अगदीं स्वच्छ होती. पुमोरी पर्वतावरील वीस हजार फुटांवरील ज्या स्थळीं मी बसलों होतों, तेथूनच डावीकडून पाहिलें असतां लिंग्ट्रेन शिखर, ल्होळाखिंड, एव्हरेस्टच्या तिबेट बाजूकडील नॉर्थ पीक ( उत्तर शिखर ), एव्हरेस्टच्या युद्धपूर्व चढायांतील प्रसिद्ध स्थळ नॉर्थ कॉक, एव्हरेस्टचा वेस्ट शोल्डर ( पश्चिमेकडील कणा ), एव्हरेस्टचें शिखर व त्यावरील हिमपताका, एव्हरेस्टचें साऊथ समिट ( दक्षिणेकडील कळस ), गेल्या वर्षी

झालेल्या चढाईत ज्याला "जगांतील अत्यंत भयंकर स्थळ" (Worst Spot in the world) असें कर्नल हंटनें म्हटलें, तो साऊथ कॉल. लोट्से व नुपट्से हीं शिखरें एव्हरेस्टच्या इतिहासांतील सर्व नामांकित स्थळें एका दृष्टिक्षेपांत दिसत होतीं; खालीं नजर टाकली असतां वेस्टर्न कूममधून गडगडत येणारा सुप्रसिद्ध आईस फॉल, खुंबु बर्फप्रवाह, व त्यांतील बर्फाचे मनोरे (सिरॅक्स), यांचें विहंगम दृश्य दिसत होतें. पृथ्वीतलावरील महान् पर्वताच्या, महान् शिखराच्या सिंहासनापाशीं ओतलेल्या सृष्टिसौंदर्याच्या खाणींतील तें अमोल रत्नभांडार माझे डोळे दिपवून टाकीत होतें. आपण हें प्रत्यक्ष पहात नसून एखादें मोठें चित्र पहात आहोंत असा भास होत होता. समोरचा देखावा म्हणजे एक भव्य त्रिमितिचित्रच माझ्या डोळ्यांपुढें उभें होतें. एव्हरेस्टच्या मस्तकावरील हिमाचा तुरा वाऱ्यानें फडफडत होता.

त्याखेरीज कोठलीहि हालचाल ह्या प्रचंड देखाव्यांत दिसत नव्हती. लहानपणीं अरेबियन नाईट्समधील हिऱ्यामोत्यांनीं व माणकांनीं भरलेल्या गुंफा, आणि नानाप्रकारचीं फलपुष्पें असलेले बगीचे यांचीं वर्णनें वाचीत असतांना एखाद्या (अल्लाउद्दिनी) जादूच्या दिव्याच्या साहाय्यानें या गोष्टी आपल्याला पाहायला मिळाल्या तर किती गंमत होईल असें वाटे. त्या हिऱ्यामोत्यांनीं भरलेल्या गुंफा व फलपुष्पांचे बगीचे मी पाहत होतों त्या दृश्यापुढें तुच्छ होते.

तें दृश्य पाहत असतांना, गेल्या दिवसांचे कष्ट, एवढेंच नव्हे तर, पुमोरी पर्वतावरील त्या स्थळीं चढून जाण्यासाठीं त्या दिवशीं करावे लागलेले श्रम मी आतां विसरलों होतों. माझ्या परिभ्रमणांतील सर्वांत उंच स्थळीं मी बसलों होतों. तेथील कांहीं लहान दगड, माझ्या वडिलांच्या आदेशाप्रमाणें त्यांना नेऊन देण्यासाठीं मीं गोळा केले. त्यानंतर मीं समोरील देखाव्यांचे आणखी कांहीं फोटो काढले. शेर्पा अंगदावाजवळ कॅमेरा देऊन त्याच्याकडून माझा फोटो काढविला, थोड्या वेळानें, नवनीतबरोबर असलेला शेर्पा गॅलजेन तेथें येऊन पोंचला. नवनीत खालींच थांबले होते. थंडीमुळें त्यांचा सिने कॅमेरा बरोबर चालेना. मी बसलों होतों तेथून वरती पांचशें फुटांवर गांधीबंधूंचा तंबू दिसत होता. ते दुसऱ्या वाटेनें वर गेले होते. 'कांहीं वेळानें, उन्हानें बर्फ वितळूं लागलें तर उतरणें जरा धोक्याचें होईल म्हणून आपण खालीं उतरूं या' असें गॅलजेननें सुचविलें. तेव्हां

समोरील देखाव्याकडे पुन्हा दृष्टिक्षेप करून उतरूं लागलों. हिमावरील उतरण संपल्यावर क्रॅम्पन्स व चढण्याचे जाड बूट काढून साधे उंच बूट घातले. खालीं उतरल्यावर नवनीत व गेबीलाल भेटले. ठरविलेलें ध्येय साध्य केल्याबद्दल त्यांनीं केलेल्या अभिनंदनाचा मीं साभार स्वीकार केला. तेथें थोडावेळ थांबून तीन साडेतीन वाजतां पायथ्याच्या तळावर परत आलों. शेर्पा अंगदावानें त्या दिवशीं चांगलीच मदत केली; तसेंच वाताभेद्य पोषाख व हातमोजे आणि चढण्याचे जाड बूट यांच्या साहाय्यानें पुमोरीवरील वातावरण मला सुसह्य झालें. तळावरील ऊन गेल्यावर थंडी वाजूं लागली, लवकरच तंबूच्या आंत जाऊन झोपण्याच्या पिशवींत शिरलों व हा भाग्याचा दिवस दाखविल्याबद्दल ईश्वराची कृतज्ञता मानून झोपण्यासाठीं आडवा झालों.

परंतु त्या दिवशीं रात्रीं मला लवकर झोप आली नाहीं. गेले कांहीं दिवस येत असलेला खोकला फारच वाढला. अर्धी रात्र झोप आली नाहीं. खोकून खोकून बेजार झालों. आम्ही पेप्सच्या गोळ्या नेल्या होत्या त्याची बाटली गेल्या कांहीं दिवसांतच मीं अर्धी अधिक फस्त करून टाकली होती. त्या दिवशींहि चारपांच गोळ्या नेल्या होत्या. शिवाय व्हिस्कीहि वापरलं. रात्रीं अकरा बाराच्या सुमारास डोळा लागला. पुन्हां पहाटे डोळे दुखूं लागले. विरळ हवेचा व थंडीचा प्रत्येकावर कांहींतरी परिणाम झाला होता. गायतोंडेना कसर आल्यासारखें वाटत होतें. नवनीत पारेख अशक्त झाले होते. वरच्या तळावर रूसी गांधींना ताप भरून चक्कर आल्यासारखें वाटलें व वांत्याहि झाल्या, असें मागून कळलें. होमी गांधींची प्रकृति मात्र उत्तम होती. ते आम्हां सर्वांत वयानें लहान होते. सुदैवानें आमच्यापैकीं कुणालाच मोठा आजार झाला नाहीं.

११२०

## खुंबु बर्फप्रवाहावर

सकाळीं सहा वाजतां जाग आली, पण सव्वासातपर्यंत झोपण्याच्या पिशवींतून बाहेर आलों नाहीं. त्यादिवशीं आम्ही पुमोरीच्या पायथ्याच्या तळावरून खुंबु बर्फप्रवाहावर भ्रमण करून यायचें ठरविलें. बर्फप्रवाहावर बर्फांचे धबधबे व मनोरे

अशीं विविध दृश्यें पाहायला सांपडतात. तीं पाहायचीं व त्यांचे फोटो घ्यायचे असा बेत होता. दगडांच्या राशीवरून चढत, उतरत व घसरत, बर्फप्रवाहाच्या मध्य-भागीं जेथें बर्फ होता, तेथें गेलों. वाटेंत बर्फाच्या खड्ड्यावर दगड ठेवला आहे अशीं दृश्यें दोन तीन ठिकाणीं दिसलीं. इंग्रजींत त्याला आइसटेबल म्हणतात.

त्याची गंमत अशी कीं सूर्य आकाशांत तळपत असला तरी त्या दगडाची छाया, खालच्या बर्फावर पडत असल्यामुळें बाजूचा बर्फ कधीं वितळत नाहीं व त्या दगडाला बर्फाचा आधार असलेल्या टेबलाचें स्वरूप येतें. दुसऱ्या एका ठिकाणीं बर्फाच्या ढिगाऱ्यावरून वितळून आलेल्या पाण्याच्या मोठ्या धारेला आपले कपडे न भिजवितां मिठी मारतां येत होती; कारण ती मोठी धार गोठून जशीच्या तशी उभी होती ! आणखी एका ठिकाणीं बर्फाच्या ढिगाखालचें बर्फ वितळून पोकळी निर्माण झाली होती.



त्याच्या पलीकडे शेर्पा गॅलजेनला बसावयास सांगून इकडच्या बाजूनें मीं त्याचा फोटो काढला. बर्फावरून वाहत आलेल्या पाण्याच्या भिजून झालेल्या लोंबत्या कांड्यांनीं त्या छायाचित्राची शोभा वाढविली आहे. हीं दृश्यें पहात पहात आम्ही बर्फाच्या उंच मनोऱ्यापाशीं जाऊन पोचलों. जिकडे तिकडे हिरवट पांढरें बर्फ

होतें व सूर्याच्या प्रकाशामुळें तें चकाकत होतें. हिमाचे गॉगल्स वापरले नसते तर डोळ्यांना तात्पुरती अंधारी आली असती हिमाच्या मनोऱ्यापाशीं पोंचण्यासाठीं आम्हांला वाटेंत एक बर्फाचा उंचवटा ओलांडावा लागला. त्याच्यावर चढण्यासाठीं बर्फकुदळीनें पायऱ्या खोदाव्या लागल्या. अनुभवी शेर्पा गॅलजेननें पुढें होऊन आमच्यासाठीं पायऱ्या खोदून मार्ग काढला. जे मनोरे पुमोरीवरून मातीच्या ढिगाऱ्याएवढे उंच दिसत होते ते प्रत्यक्ष केवढे मोठे आहेत याची कल्पना आम्हांला त्यांच्याजवळ गेल्यावर आली. त्यांची उंची सत्तर ऐंशी फूट होती. वरून घसरत येणाऱ्या बर्फाच्या दाबानें बर्फप्रवाहावरील बर्फ वरतीं येऊन त्याचे मनोऱ्यासारखे आकार बनतात. सूर्याच्या उन्हानें त्यांतील थोडें थोडें बर्फ वितळतें. परंतु ज्याप्रमाणें उन्हामुळें समुद्राच्या पाण्याची वाफ झाली तरी तो आटत नाहीं, त्याप्रमाणें बर्फप्रवाहांतल्या कांहीं बर्फप्रवाहाचें पाणी झालें तरी तो बर्फ प्रवाहमयच राहतो.


खुंबु बर्फप्रवाहाकडे जातांना आम्ही आमच्या भारवाहकांना सामान घेऊन खालच्या लोबुचे येथील तळावर जाण्यास सांगितलें होतें. कारण आज आम्ही परतीच्या प्रवासाला सुरुवात करणार होतों. बर्फप्रवाहावरून आम्हांला पुमोरीवरील रात्रीच्या तळावरून वर चढत असलेले गांधी बंधु व त्यांचे शेर्पा पांढऱ्या हिमावर काळ्या ठिपक्यासारखे दिसले. थोड्याच वेळानंतर वर चढणें अशक्य झाल्यामुळें खालीं येतांनाहि ते आम्हांला दिसले. त्यांची व आमची गांठ नामचे बझारपर्यंत पडणार नव्हती; कारण ते त्या दिवशीं पुमोरीच्या पायथ्याच्या तळावर मुक्काम करणार होते; तर मी, नवनीत व गायतोंडे लोबुचेच्या तळावर मुक्काम करणार होतों.

बर्फप्रवाहांतून बाहेर पडून लोबुचेच्या मार्गावर लागण्यास जवळजवळ दीड तास लागला. एकापुढें एक असलेल्या शिलाराशी व बर्फराशी यांमधून मार्ग काढायला बराच त्रास पडला. अजून आम्ही सतरा हजार फुटांवर असल्यामुळें चालतांना लवकर लवकर थकवा येतच होता. या उंचीवर आल्यापासून गेले दोनतीन दिवस भूक अगदींच मंदावली होती. गेबीलालच्या स्वयंपाकावर एरवीं आम्ही खूष होतों. परंतु तेथें त्यानें तयार केलेलें जेवण बेचव लागत होतें. तो

तरी काय करणार ? त्या हवेंत अन्न चांगलें शिजणार कसें व रुचकर लागणार कसें ? आम्ही चॉकोलेट, पॉरिज् असे जिन्नसच जास्त प्रमाणांत खात होतों. अंगांतील बळ कायम राहावें म्हणून कांहीं कांहीं वेळां भूक नसतांना बळेंच खात असूं. त्या दिवशीं सुमारें तेरा मैल चालून आम्ही अंधार पडायच्या आंत लोबुचे तळावर जाऊन पोचलों.

## येतीचें कातडें मिळालें नाहीं

यापुढचा प्रवास म्हणजे परतीचा प्रवास. नामचे बझारपर्यंत आल्या रस्त्यानेंच परत जाणार होतों. पुढें तेथें एक दिवस राहून काठमांडूकडे न जातां सरळ दक्षिणेकडे बिहारमधील जयनगर नांवाच्या गांवीं जाऊन मुंबईस जाण्यासाठीं आगगाडी गांठणार होतों. प्रवासांतील अत्यंत कठीण दिवस निघून गेल्यामुळें आतां मनावरील दडपण व ताण नाहींसा झाला होता. आम्ही हळूहळू कमी उंचीवर येऊं लागल्यामुळें झपाट्यानें चालूं शकत होतों. दुसऱ्या दिवशीं लोबुचे-हून थेट पांगबोचेला आलों, फेरीचे येथें थांबलों नाहीं. त्या दिवशींही तेरा चौदा मैल चाल झाली. वाटेंत भांगबोचे येथें आम्ही दोन तास थांबलों. जातांना आम्ही तेथील गुम्बांत येतीच्या डोक्याचें जें कातडें पाहिलें होतें तें विकत घेऊन मुंबईला न्यावेंच असें नवनीतला वाटत होतें. त्यांनीं खूप प्रयत्न करून पाहिला. गांवांतील पंच जमवून त्यांना त्या कातड्यासाठीं दोनशें रुपयांपर्यंत किंमत देऊं केली, परंतु येतीचें कातडें विकल्यावर गांवांत कांहीं रोगराई झाली तर गांवांतील लोक त्याचें खापर या गोष्टीवर फोडतील व गुम्बांतील ती वस्तु पैशाच्या लोभानें देऊन टाकली म्हणून रोगराई झाली असें ते म्हणूं लागतील अशी भीति त्यांनीं व्यक्त केली. त्यांची भाषा समजत नसल्यामुळें आम्ही त्यांच्याशीं परस्पर बोलूं शकत नव्हतों. शेर्पा गॅलजेन दुभाषाचें काम करीत होता. अखेर तें कातडें मिळविण्याचा नाद सोडून देऊन आम्ही पुढें निघालों. जवळील शेतांत बटाटे उकरण्याचें काम चालूं होतें. शेर्पांचीं लहान मुलें हिंडत होतीं. परंतु फोटो काढायला गेलों कीं तीं पळून जायचीं. त्या दिवशीं थ्यांगबोचे येथें मुक्काम केला. तेथील वातावरण जाते वेळेप्रमाणेंच आल्हाददायक व



थ्यांगबोचे येथें एव्हरेस्टच्या पार्श्वभूमीवर श्री. पाटणकर

रम्य होतें. रात्रीं झोप आली नाहीं म्हणून कंदिलाजवळ बसून हिशेबाचें काम करीत बसलों. सकाळीं उठल्यावर लामांची भेट घेऊन त्यांच्या विशिष्ट पेहेरावांत त्यांचे फोटो काढले. नवनीत पारेख यांचें फिल्म काढण्याचें काम बराच वेळ चालू होतें. मी एव्हरेस्ट शिखराच्या देखाव्याकडे पाहत बसलों होतों. आज नामचे बझारलाच जायचें होतें त्यामुळें निघण्याची कोणाला घाई नव्हती. नामचे बझार सात मैलांवर होतें. परंतु आम्ही खुमजुंग या गांवीं जाऊन तेथें प्रोफेसर व मिसेस हायमनडार्फ यांना भेटून जाणार होतों.

## हायमनडार्फ पतिपत्नी

थ्यांगबोचेच्या डोंगरावरून खालीं उतरून दूधकोसी ओलांडली. पुन्हा डोंगर चढून खुमजुंग येथे गेलों. हायमनडार्फ पतिपत्नींनीं चांगलें स्वागत केलें. आम्हांला चहा दिला व तेथील रिवाजाप्रमाणें रक्सी नांवाचें मद्य पिण्याचा आग्रह केला. मिसेस हायमन्डार्फ अॅन्थ्रापॉलॉजी या विषयाच्या तज्ज्ञ आहेत.

ज्ञानसंग्रह करण्यासाठीं हिमालयांत एवढ्या दूर ठिकाणीं दोनतीन महिने वस्ती करून राहाणाऱ्या या दांपत्याचें आम्हांला कौतुक वाटलें. निवासासाठीं त्यांनीं शोधलेली जागा अप्रतिम होती. तेथील एका शेर्पाच्या घरापुढील अंगणांत तंबू ठोकून ते राहिले होते.

जवळच असलेलीं कांगटेका व ठमसेकू हीं हिमशिखरें खडीं उभीं राहून जणूं काय आकाश किती उंच आहे तें दाखवीत होतीं. चांदण्या रात्रीं चंद्राकडे पहाण्यांत व त्याच्या किरणांनीं न्हाऊन निघण्यांत जसा आनंद वाटतो तसा आनंद त्या हिमशिखरांकडे पाहून मिळत होता. तेथें त्या थंड हवेंत, सूर्यप्रकाशांत बसून आम्ही चांदण्या रात्रीचें सौख्य अनुभवीत होतों.

शेर्पांची माहिती गोळा करण्यासाठीं शेर्पांना प्रश्न विचारणें जरूर होतें म्हणून हायमनडार्फ यांनीं काठमांडूहून एक नेपाळी दुभाषा आपल्या बरोबर आणला होता. खुमजुंग येथें त्यांना अत्यंत साधी राहणी पत्करावी लागली होती. त्यांना

लागणाऱ्या शहरी जीवनाच्या वस्तु एवढ्या दूर मिळणें शक्य नव्हतें. तसेंच त्या वस्तूंचा भारवाहकांच्या पाठीवरून वाहून आणलेला सांठाहि फार दिवस टिकणारा नव्हता. म्हणून त्यांना आपल्या खाण्यापिण्याच्या संबयी थोड्याफार शेर्पासारख्या कराव्या लागल्या होत्या, पाश्चिमात्य लोकांची चॉकोलेटविषयींची आवड ध्यानांत घरून आम्ही आमच्या जवळचे दोन चॉकोलेट बार मिसेस हायमनडार्फ यांना दिले.

शेर्पोच्या मुलुखांत साखर किंवा गूळ मिळणें दुरापास्तच आहे. गोड पदार्थ अजिबात न खाणारी शेर्पा ही जगांतील अजब जात आहे. गोड खाल्ल्यानें आपण आजारी पडूं अशी त्यांना भीति वाटते. शेर्पा लोक दुसऱ्या कशाहीपेक्षां आजारी पडण्याला फार भितात. कारण आजारी पडल्यावर वैद्यकीय मदतीच्या अभावी रोगनिदान व रोगोपचार करणें त्यांना अशक्य होतें. त्यांचा चहासुद्धां मीठ घातलेला असतो. पाश्चिमात्य गिर्यारोहकांचे बरोबर गिर्यारोहण करून आलेल्या शेर्पांना आपल्या चहाची चव आलेली आहे. काठमांडूहून आणलेला आमचा साखरेचा सांठा संपला होता. मोठ्या मुष्कीलीनें दोन शेर साखर नेपाळी साडेतीन रुपये शेर या भावानें आम्हाला नामचे बझारला मिळाली.

एव्हरेस्ट इतके जवळ असतांनाहि हायमनडार्फ पतिपत्नी पांगबोचेच्या पुढें जाऊन आलेली नव्हतीं. “ खुंबुबर्फप्रवाहावर जाऊन तुम्ही एव्हरेस्टचा देखावा पाहून कां येत नाहीं ? ” मीं त्यांना विचारलें. तेव्हां प्रो. हायमन्डार्फ म्हणाले, “ आम्ही येथें गिर्यारोहण करण्याकरितां आलेलों नसून शेर्पा वंशाची माहिती मिळविण्यासाठीं आलेलों आहोंत. ” एव्हरेस्ट शिखराच्या इतक्या जवळ आल्यावर पायथ्यापर्यंत जाऊन एव्हरेस्ट जवळून पहावेसें त्यांना कसें वाटत नाहीं याचें मला जरा आश्चर्य वाटलें. तासभर गप्पा मारल्यावर आम्ही त्यांचा निरोप घेऊन नामचे बझारच्या वाटेला लागलों. खुमजुंगजवळच खुंदे नांवाचें शेर्पोचें दुसरें गांव आहे. डोंगर उतरून नामचे बझारला गॅलजेनच्या घरीं पोंचल्यावर प्रवासाहून घरीं आल्यासारखें वाटलें. नामचे बझारहून पुमोरीच्या पायथ्याशीं जाण्यास आम्हांला पांच दिवस लागले होते, तेंच अंतर येतांना आम्ही तीन दिवसांत तोडलें.

# नामचे बझारला आल्यावर

नामचे बझारला आल्याच्या दुसऱ्या दिवशीं दसरा होता. त्या दिवशीं सकाळीं गरम पाण्यानें स्नान केलें. गेले दहा बारा दिवसात आम्हीं स्नान केलें नव्हतें. दसऱ्यानिमित्त पुरणपोळ्या बनविण्यास गेबीलालला सांगितलें. त्यानें कुठून तरी थोडा गूळ व थोडी साखर मिळवून पुरणपोळ्या बनविल्या. दसरा सण मोठा खरा, परंतु नामचे बझारला त्या सणाचें कांहींच महत्त्व नाहीं. तेथल्या बौद्धमार्गी शेर्पांना हिंदु सणाची व हिंदु देवदेवतांची कांहींच माहिती नव्हती, असें आम्हांला दिसून आलें.

त्या दिवशीं, खुंबु बर्फप्रवाहावर आमच्याबरोबर आलेल्या शेर्पांना व भारवाहकांना मजुरी दिली. पुन्हां भारतांत परत जाण्याच्या प्रवासासाठीं बाधाबांध केली. जरूर तेवढे भारवाहक घेऊन आम्ही दुसऱ्या दिवशीं निघण्याचें ठरविलें. परंतु, त्या दिवशीं पुरेसे भारवाहक जमले नाहींत. जे जमले होते त्यानीं रविवार हा दिवस प्रवासास निघण्यास अशुभ आहे असें सांगून त्या दिवशीं निघण्याचें टाळलें. त्यामुळें त्या दिवशीं आम्हांला नामचे बझार येथें सक्तीची विश्रांती घ्यावी लागली. परंतु तोहि दिवस चांगला गेला. भारतीय चेकपोस्टमधील दोघे नोकर श्री. राणा व श्री. विभूतिभूषण यानीं आपल्या येथील सात आठ महिन्याच्या वास्तव्यांत शेर्पांच्या चालीरीतीविषयीं माहिती लिहून काढलेली होती. ती त्यांनीं आमच्या विनंतीवरून वाचून दाखविली. शेर्पांच्या कौटुंबिक जीवनाचें बारकाईनें निरीक्षण करून लिहिलेली ती माहिती आम्हांला खूप उद्बोधक व मनोरंजक वाटली. गॅलजेन दुसऱ्या दिवशीं आमच्याबरोबर येणार असल्यामुळें त्याच्याहि घरांत गडबड चालू होती. जाण्यापूर्वीं घरची व्यवस्था करणें, भारवाहकाशीं बोलणें करणें वगैरे कामें करण्यांत तो गुंतला होता. तो आपलीं टिपणें व हिशेब शुद्ध देवनागरी लिपींत लिहीत होता. हिंदी व मराठी भाषा ज्या लिपींत लिहितात ती देवनागरी लिपी नेपाळच्या थेट उत्तर सरहद्दीपर्यंत वापरली जाते हें पाहून माझ्यासारख्या मराठी भाषकास साहजिकच आनंद वाटला !

● ● ●

# नामचे बझार ते जयनगर

## नामचे बझार ते ओखलधुंगा

तारीख १९ ऑक्टोबर रोजीं नामचे बझार येथील मित्रांचा निरोप घेऊन भारतांत परत येण्यास निघालों. आम्हांला मुंबईहून निघून एक महिन्यापेक्षां अधिक दिवस झाले होते. या प्रदेशांत वृत्तपत्रें मिळत नसल्यामुळें जगांतील कांहीं बातमी कळत नव्हती. एव्हरेस्ट दर्शनाचा आमचा कार्यभाग उरकल्यामुळें आम्ही भारतांत परत जाण्यास उत्सुक होतो. आमचा प्रवास ठरविलेल्या वेळा-पत्रकाप्रमाणें होत असल्यामुळें दिवाळी मुंबईत घालविण्याची शक्यता निर्माण झाली होती. शेर्पा गॅलजेन घरच्या अडचणीमुळें आमचेबरोबर येण्यास तयार नव्हता. पण आम्ही आग्रह केल्यामुळें तो तयार झाला. आम्ही परतीचे प्रवासा-साठीं अठरा भारवाहक बरोबर घेतले होते. त्यांत तिघेजण अनुभवी शेर्पा होते.

नामचे बझारच्या डोंगरावरून दूधकोसीकडे उतरत असतांना अचानकपणें लोटसे नुपट्से कण्यामागील एव्हरेस्टचें दर्शन झालें. आतां पुन्हां एव्हरेस्ट दिस-णार नाहीं, म्हणून त्याकडे पहात, पांच मिनिटें अंतर्मुख झालो. नंतर घाट उतरून दूधकोसीच्या रमणीय खोऱ्यांतून पुढें चालूं लागलों. आतां खडतर प्रवास संपला होता व आम्ही आमच्या भारतांत परत चाललो होतो, म्हणून मन उत्साही होतें. मी एकटाच वेगानें पावलें टाकीत सर्वांच्या पुढें गेलों व इतरांची वाट पहात दूधकोसीच्या कांठावरील एका दरडीवरील माळावर कांहीं वेळ सृष्टि-सौंदर्य पहात बसलों. नंतर बेन्कॉर व घाट हीं गांवें मागें टाकून दूधकोसीच्या पुलावरून पलीकडे जाऊन चौन्रीखारका खेड्यापाशीं आलों. भारवाहकही लौकरच तेथें येऊन पोंचले. एका भारवाहकानें बकरीची एक तंगडी बरोबर घेऊन ती आपल्या पाठीवरील ओझ्यांत खुपसून दिली होती. त्या थंड प्रदेशांत कच्च्या मासांचा तो तुकडा खराब न होता दोन तीन दिवस त्या ओझ्या-बरोबर प्रवास करीत होता. आमच्या अहिंसावादी पारेखना त्या भारवाहकाच्या

जवळून जातांना कसेसेंच होई. इकडचे लोक बौद्धमार्गी असूनही मांस खातात. शक्यतोंवर स्वतः हत्या करीत नाहींत. परंतु दुसऱ्यानें मारलेल्या प्राण्यांचें मांस त्यांना चालतें.

त्या दिवशीं आमचा प्रवास तेरा मैल झाला होता. आणखी अडीच मैल पुढें जाऊन सुरक्या नांवाच्या गांवांत मुक्काम करायचा असा आमचा बेत होता. त्याप्रमाणें चौन्रीखारका गांवांतून बाहेर पडलों दोनतीन फर्लांग गेलों असूं नसूं तों एका ओहोळापाशीं भारवाहक व शेर्पा थांबलेले दिसले. आम्ही त्यांना पुढें जाण्याची सूचना करतांच त्यांतील शेर्पांनीं ओरडून सांगितलें कीं आम्ही पुढें येणार नाहीं. येथेंच मुक्काम करणार आहोंत. आम्हांला त्यांचा आडमुठेपणा समजेना. थकून गेल्यामुळें त्यांना थांबायचे होते तर त्यांना चौन्रीखारका गांवांतच थांबायला पाहिजे होते. पुढें येऊन जंगलांत हटून बसणें योग्य नव्हतें. परंतु आमच्याबरोबर भारवाहक म्हणून ओखलधुंगास येण्यास कबूल झालेल्या, त्या शेर्पांना त्यादिवशीं काय झालें होतें कुणास ठाऊक; त्यांनीं सकाळपासून तक्रारखोरपणा चालविला होता. आतां तर त्यांनीं पुढें येण्यास सरळच नकार दिला. आम्हाला पेंच पडला. पुढें जायलाच पाहिजे होतें, असें नव्हतें परंतु शेर्पा आपल्या लहरीप्रमाणें वागूं लागल्यास आम्हांला पुढें यापेक्षांही अधिक त्रास व्हायचा यासाठीं वेळींच त्यांना ताळ्यावर आणावें, म्हणून आम्ही खंबीर-पणानें त्यांना सांगितलें कीं पुढें यायचें असेल तर सुरक्या गांवापर्यंत चला, नाहींतर चौन्रीखारका गांवात वस्ती करण्यासाठीं परत मागें फिरा. असें आम्ही निक्षून सांगितल्यामुळें ते तीन शेर्पा भडकले. त्यांत पुमोरीवर माझ्याबरोबर आलेला शेर्पा अंगदावाही होता. पुमोरीच्या चढाओवर हे शेर्पा किती चांगले वागले होते अंगदावानें तर मला चांगलीच मदत केली होती. पण तोही दुस-ऱ्यांच्या नादानें बिथरला. खालच्या प्रदेशांतील उष्ण हवेचा त्यांच्या मस्तकावर परिणाम झाला कीं काय कोण जाणे. त्या शेर्पांनीं मोठ्यानें बडबडायला सुरवात केली. "आम्ही आजच परत जातो. आम्हांला एक दिवसाची मजुरी द्या. आम्ही कोणीच तुमचेबरोबर येणार नाहीं." असा गिल्ला त्यांनीं माजवला. शेर्पा गॅलजेनचें कोणी ऐकेना. तो दिङ्मूढ होऊन आमचेकडे बघूं लागला. तो स्वतः उत्तम शेर्पा असला तरी भारवाहकांचा सरदार होण्यास लागणारे गुण त्याच्या

अंगांत नव्हते. आधी चौन्रीखारका गांवांत तर चला मग पुढें पाहूं." असें आम्हीं म्हटलें व परत वळून चालूं लागलो. मनांत मात्र काळजी वाटूं लागली कीं सर्व भारवाहकांनीं संप केला व पुढें यायचें नाकारलें तर काय करायचें ? चौन्रीखारका गांवाच्या शिवाराबाहेरील एका घरापाशीं थांबल्यावर पाठीवरचें सामान आदळून ते तीन शेर्पा एका दिवसाची मजुरी मागूं लागले. त्यांचे उदाहरण पाहून इतर भारवाहकांतही कुजबूज सुरू झाली. गॅलजेनला भिती वाटूं लागली कीं साहेबांनीं नमते न घेतल्यामुळें हे सर्वच भारवाहक फितले तर पंचाईत निर्माण व्हायची. ते तिघे शेर्पा तणतणत गांवांत निघून गेले. आम्ही आपल्या पथाऱ्या पसरून झोंपायची तयारी केली. गेबीलालला कांहींतरी झटपट बनवावयास सांगितलें. भारवाहकांची कांहीं तरी समजूत करा नाहींतर तेही निघून जातील असें गॅलजेननें आंत येऊन आम्हांला सुचविलें. तेव्हां मी बाहेर जाऊन भारवाहकांना एकेक सिगारेट वांटली. त्यामुळें त्यांची डोकीं शांत होतील व पुढचा विचार उद्यां सकाळीं करूं असें म्हणून आम्ही झोंपायला गेलों. तो सबंध दिवस उत्तम गेला होता. परंतु त्या संध्याकाळच्या प्रसंगानें सर्व वातावरण बिघडून गेलें.

दुसरें दिवशीं सकाळीं उठल्यावर 'आज काय करायचें' हा प्रश्न आमच्या पुढें दत्त म्हणून उभा होता. गॅलजेननें त्या तीन तक्रारखोर शेर्पांना बोलवून आणलें. परंतु त्यांच्या मनोवृत्तींत फरक पडला नव्हता. ते नामचे बझारला निघून गेले. आम्ही ठरविलें होतें कीं, चौन्रीखारका गांवांत एक दोन दिवस राहावें लागलें तरी हरकत नाहीं, परंतु त्या तक्रारी शेर्पांना पुढें न्यायचें नाहीं. आठ दिवसांच्या मजुरीच्या आशेनें आलेल्या भारवाहकांची, परत जाण्याची इच्छा नव्हती हें आम्हीं ओळखलें होतें. केवळ शेर्पांच्या समोर ते स्पष्टपणें बोलूं शकत नव्हतें. असाच कांहीं वेळ गेल्यावर गांवांतील कांहीं लोक तेथें येऊन "काय झालें ?" अशी चौकशी करूं लागले. त्यामध्यें सोनम नांवाचा एक अनुभवी शेर्पा होता. गॅलजेननें त्यास सर्व हकीगत सांगून भारवाहकांचा सरदार होऊन आमचेबरोबर जाण्याची विनंती केली. एकीकडे आम्ही व दुसरीकडे तिघे हटवादी शेर्पा यांच्या कात्रींत सांपडलेला गॅलजेन रडकुंडीस आला होता. भारवाहकांच्या ताफ्याला बागवीत पुढें नेणें आपल्याला जमणार नाहीं, असें त्याला दिसून आलें

होतें. म्हणून पुढची व्यवस्था सोनमवर सोपवून त्यानें नामचे बझारला परत जाण्याची परवानगी मागितली. निरोप घेतांना त्याला आणि आम्हांला वाईट वाटलें. नामचे बझार येथें आम्ही त्याचे पाहुणे होतो, एवढेंच नव्हे तर तेथें पोंचल्यापासून परत निघेपर्यंत गेले बारा तेरा दिवस तो आमचा सोबती होता.

शेर्पा सोनमच्या नेतृत्वाखालीं सामान घेऊन भारवाहक व पाठीवर रुकसॅक घेऊन आम्ही पुढें चालूं लागलों. आमच्या चाळीस दिवसाच्या वाटचालींत भारवाहकांनीं आम्हांला त्रास दिल्याचा हा एकच प्रसंग घडला. नामचे बझार येथें भारवाहकांनीं भारतांतील रेल्वे स्टेशन जयनगर येथपर्यंत येण्याचें कबूल केलें होतें. तराईमधील गरमी आपल्याला सहन होणार नाहीं व आपण आजारी पडूं. म्हणून आम्ही ओखलधुंगा गांवापर्यंतच येऊं असें ते म्हणूं लागले. ओखलधुंगा-पर्यंत आल्यास आठ दिवसांची मजुरी व जयनगरपर्यंत आल्यास सोळा दिवसांची मजुरी देऊं असें आम्हीं त्यांच्याशीं ठरविलें. नामचे बझारपासून निघाल्यावर जरा वेगानें गेल्यास बारा दिवसांत जयनगरला पोंचूं असा आमचा कयास होता. तो पुढें बरोबर ठरला. त्या दिवशीं चौन्रीखारका येथें भारवाहकांची व्यवस्था सुरळीत करण्यांत वेळ गेल्यानें निघायला उशीर झाला म्हणून आम्ही केवळ आठ मैलांची वाटचाल करून पुइया नांवाच्या गांवीं पोंचलों. वाटेंत तीन हजार फूट उंचीचा डोंगर चढावा लागला.

दुसरे दिवशीं बारा मैल चालून दूधकोसीच्या तीरावरील जुबिंग गांवाजवळ आलो. परतीच्या प्रवासांत आम्हीं खाण्यावर सपाटा चालवला होता. वाटेंत शेतकऱ्याची झोंपडी लागली कीं दूध, दही, अंडीं व फळें यांची चौकशी करीत होतो. जें कांहीं मिळेल त्याच्यावर ताव मारायचा. खुंबु बर्फप्रवाहावर पळून गेलेल्या भुकेनें आतां आमच्या पोटांचा कबजा घेतला होता. बरोबर आणलेले व राहिलेले खाद्यपदार्थांचे डबे, आतां मुंबईला कशाला परत न्यायचें म्हणून आम्ही भराभरा खोलत होतो. दुधकोसीपाशीं पोंचलो तेव्हां अंधार झाला होता. नदी कांठचे शेवटचे दोन मैल तर संध्या प्रकाशांतून उंच गवतांमधून आस्ते आस्ते पावलें टाकीत जावें लागलें. शुक्ल चतुर्दशीचा चंद्र आकाशांत उगवलेला असला तरी बाजूच्या डोंगरांच्यावर आला नव्हता. दुधकोसीवरील पूल, नदीच्या पात्रां तील एका मोठ्या खडकावर दोन्ही बाजूंनीं झाडांच्या फांद्या टाकून तात्पुरता

बनविलेला होता. ध्यांगबोचें गांव सोडल्यानंतर दुधकोसी नदीला अनेक नाले मिळाले असल्यामुळें तिचा प्रवाह मोठा झाला होता. त्यांतून पाणी तुफान वेगानें चाललें होतें. झाडांच्या फांद्याच्या त्या पुलावरून जाणें म्हणजे एक रोमांचकारी अनुभव होता. सर्वजण हळूहळू सावधगिरीनें पलीकडे गेले. हा कच्चा पूल उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत पाणी वाढल्यामुळें टिकत नाहीं.

अंधारामुळें वर दोन मैल दूर असलेल्या अंधेरी गांवास जाणें शक्य नाहीं असें दिसून आल्यामुळें तेथेंच नदीकाठीं उघड्यावर मुक्काम करायचें ठरविलें. तेथील उंची समुद्र सपाटीपासून फक्त साडेसहा हजार फूट होती. थंडी बिलकुल वाटत नव्हती. याचें कारण आम्ही अठरावीस हजार फुटांवर जाऊन परत आलो होतो. मुंबईस आल्यावर माझी प्रवासांतील दैनंदिनी चाळतांना, "साडे सहा हजार फुटावर तेथें थंडी वाजत नव्हती." असा तिच्यांत केलेला उल्लेख पाहून मजा वाटते. दुधकोसीच्या प्रवाहाचा आवाज जोरानें येत होता. गवतामधील थोडी जागा साफ करून आम्ही उघड्यावर रमी खेळत बसलों. थोड्या वेळानें चंद्र वर आला. तेव्हां त्या स्थळाचें औदासिन्य जाऊन रमणीयता आली. डोंगरावर एका देवळापाशीं रात्रीं एक जत्रा होती. तेथें जुबिंग व आसपासच्या गांवांतील पुरुष व स्त्रिया जात होती. दुधकोसीचे कांठीं सखल व मोकळी जागा असल्यामुळें आम्ही पायवाटेवरच झोंपलों होतों. आमच्या जवळून एवढे लोक जात असतांना आमच्या सामानाची आम्हांला काळजी वाटली नाहीं ही त्या पहाडी लोकांच्या प्रामाणिकपणाची प्रशंसाच होय.

दुसरे दिवशीं पांच हजार फुटांची चढण होती. जरी आम्ही हिमालयांतून बिहारच्या सखल प्रदेशांत यायला निघालों होतों तरी वाटेंत येणारे डोंगर चढावे व उतरावे लागतच होतें. सकाळपासून चढण्यास सुरवात केली ते दिवसभर चढतच होतो. वाटेंत भारवाहकांनीं दोन ठिकाणीं मोठी विश्रांति घेतली. एके ठिकाणीं छांग पिण्यासाठीं व दुसरे ठिकाणीं जेवण बनवण्यासाठीं. नंतर मात्र ते झपाझप चालून आमच्या पुढें गेले. अर्धा डोंगर चढून गेल्यावर दुपारचा एक वाजल्यामुळें आम्ही आमचे जेवणासाठीं थांबलों. त्या दिवशीं अंधार पडून गेल्यावर एक तासानें मुक्कामावर पोंचलो. उंची जवळ जवळ साडे

अकरा हजार फूट झाल्यामुळें थंडी वाजूं लागली होती. वाटेंत एका मणिभिंती-पाशीं पुढें गेलेले भारवाहक आम्हांला भेटले. त्यांनीं तेथें मुक्काम केला होता. ती रात्र शरद पौर्णिमेची असल्यामुळें थंडी बरीच होती. तरीही बाहेर उघड्या-वर झोपायचा मोह आवरला नाहीं. चंद्र चांगला वरती येईपर्यंत शेकोटी पेटवून त्या भोंवतीं शेकत, गप्पा मारीत बसलो होतो. नंतर झोपण्यासाठीं पिशवींत शिरलो. थोड्याच वेळांत दंव पडूं लागलें व थंडीमुळें त्या दंवाचें बर्फांत रूपांतर झालें. सर्वांच्या झोपण्याच्या पिशव्यांवर व सामानावर भिजलेल्या दंवाचा पांढरा पांढरा थर तयार झाला होता. आकाश निरभ्र होतें. चांदणें लख्ख पडलें होतें. हिमांशु या नांवानें प्रसिद्ध असलेल्या चंद्राच्या किरणानें ऊब मिळण्याची आशा नव्हतीच. त्याच्या किरणांनीं न्हाऊन निघण्यासाठीं डोक्यावरून पांघरून न घेतां झोंपलो असतो, तर दंवानें न्हाऊन निघालों असतो. म्हणून मोहक चांदणें पडलें असतांही डोक्यावर पांघरूण ओढून झोपीं गेलों. खुंबु बर्फप्रवाहावरील थंडींतून तावून सुलाखून निघाल्यामुळें साडे अकरा हजार फुटांवर उघड्यावर झोपायला भीति वाटली नाहीं.

आम्ही रात्रीं मुक्काम केला त्या स्थळाचें नांव टेमीसासा देवराळी होतें असें मागून कळलें. सकाळीं उठून उतरायला सुरवात केली दुसरे दिवशीं, शनिवारीं ओखलधुंगा येथें बाजार भरत असल्यामुळें तेथें कांहीं करून पोंचायचें असें आम्ही ठरविलें व भारवाहकांनाही तेथें वेळेवर पोंचल्यास बक्षीस देऊ असें सांगितलें. आम्ही चालत होतो त्या डोंगरावरून उजवीकडील डोंगरावर असलेला चँग गुम्बा नांवाचा प्रसिद्ध बौद्ध मठ दिसला. त्या दिवशीं प्रथम चार हजार फूट उतरलों व नंतर तीन हजार फूट चढलों. उतरण पूर्ण झाल्यावर सोलू खोला लागला. त्यांत स्नान केलें. पुढची चढण मोठ्या खुल्या डोंगरावर होती. चढत असतांना दोन्ही तिन्हीकडील दूरवरचा प्रदेश दिसत होता. पायांना चढायची एवढी संवय झालेली होती कीं खोल्यापासूनचे पहिले हजार फूट एका दमांत चढलों. त्या दिवशीं साडेदहा हजार फुटांवरील बनबारी या गांवी मुक्काम केला. रात्रीं तासभर हिशेबाचें काम केलें. नेपाळमधील प्रवासांत नेपाळी चलनांत केलेल्या खर्चाचा भारतीय नाण्यांत हिशेब करण्याचें एक अधिक काम होतें.

दुसरें दिवशीं ओखलधुंगाला जाण्यासाठीं लवकर उठलों. भारवाहकांना घाई करून पांच वाजतांच पिटाळून दिलें. त्यांच्या मागोमाग निघून आम्ही पुढें गेलो. बाजार दुपारीं एकदोन वाजतांच उठून जातो असें कळल्यामुळें ओखल-धुंगाला लवकर पोंचायची उत्कंठा होती. बनबारी येथून निघाल्यावर राहिलेली थोडी चढण चढून घाटमाथ्यावर गेल्यावर अचानक " महालंगूर हिमाला "चें म्हणजे एव्हरेस्ट शिखरराजींचें दर्शन झालें. आम्ही एव्हरेस्ट शिखरापासून चाळीस पन्नास मैल दूर असूं. परंतु तेथून एव्हरेस्ट शिखर स्पष्ट दिसत होतें. पश्चिमेचे बाजूस गौरीशंकराचेंही शिखर दिसलें. थोडा वेळ उभे राहून त्या शिखरांचें मनोरम्य दृश्य पाहिल्यावर घाट उतरायला सुरवात केली, व साडेतीन हजार फूट उतरून ओखलधुंगा येथें सकाळीं अकरा वाजतां पोचलों.

ओखलधुंगा हें नेपाळांतील पूर्व नं. ३ जिल्ह्याचें राजधानीचें गांव आहे. एव्हरेस्टजवळील सर्व भूप्रदेश या पूर्व नं. ३ जिल्ह्यांत मोडतो. तेथें जिल्हा-धिकाऱ्याची कचेरी आहे. त्याला बडा हकीम किंवा गव्हर्नर म्हणतात. तेथें नेपाळी फौजेची एक छावणी, तोफखाना व सरकारी धान्याचें गोदाम आहे. आपल्या इकडील कोंकणांतील बऱ्यापैकीं गांवासारखें तें गांव आहे. गांव डोंगरा-वर वसलेलें आहे. त्यामुळें घरें पांगून पांगून आहेत. ओखलधुंगाची उंची सात हजार फूट असेल. गांवांत एक धर्मशाळा होती, तीवर बाहेर नेपाळी कॉंग्रेस कचेरीची पाटी होती. खालचे मजल्यावर एका शिंप्यानें तात्पुरतें दुकान थाटलें होतें. वरचे मजल्यावरील खोलींत आम्ही मुक्काम केला. तेथें शाळाही भरत असावी कारण त्या खोलींत शिक्षकाचें टेबल, खुर्ची व इतर साहित्य होतें. बाजाराला जायचें आधीं भारवाहकांना आठ दिवसांची मजुरी व एकेक सिगरेट पाकीट देऊन टाकलें. ते सर्वजण नामचे बझारला परत जाणार होते. नेपाळांत सामा-नाची वाहतूक, मजुरांच्या पाठीवरून होत असल्यामुळें, भारवाहक मिळण्याची अडचण पडत नाहीं. त्यांची मजुरीही सात मोहरा रोज अशी ठरलेली असते. त्या दिवशीं आमचे नामचे बझारचे भारवाहक परत जात आहेत हें कळल्यावर पुढच्या प्रवासासाठीं लागणारे भारवाहक आपण होऊन आमच्या धर्मशाळेपाशीं गोळा झाले. त्यांत दिल्लीबहादुर नांवाच्या भारवाहकास भारिया नाईक नेमून

सामानाच्या सुरीक्षततेसाठीं बडा हकीमच्या कचेरींत जाऊन लेखी करार केला. नंतर आठवडे बाजारांत गेलों. चारपांच दुकानांत चौकशी केल्यावर साखर व गूळ या जिनसा मिळाल्या. आपणास नेहमीं लागणाऱ्या या जिनसा विकत घेणारे इकडे थोडेच असल्यामुळें त्या जिनसा दुकानाचे आंतील बाजूस ठेवल्या होत्या. हंगाम नसल्यामुळें बाजारांत फळेंही कांहीं मिळालीं नाहींत. काश्मीर-प्रमाणें नेपाळमध्यें फळांची लागवड करण्यास राणांच्या राजवटींत मुळींच उत्ते-जन दिलें गेलें नव्हतें. तेथें सफरचंद, नासपती वगैरे फळें मिळतील ही आमची कल्पना चुकीची ठरली व बाजारांतून जवळजवळ हात हालवीतच परत आलों. साखर, तांदूळ पोहे वगैरे जरूरीच्या जिनसा घेतल्या तेवढ्याच. बाजारांतील दुकानदार नेपाळी नोटा घेण्यास नाखूष दिसत होते. नोटेची मोडसुद्धां मिळणें दुरापास्त झालें.

ओखलधुंगा येथील बडा हकीम मखरबहादूर नांवाचे एक गुरखा गृहस्थ होते. त्यांनीं आपल्या कारकुनास पाठवून आम्हांला दुसरे दिवशीं भोजनाचें निमंत्रण केलें. परंतु ओखलधुंगा येथें आम्ही रात्रींपुरतेंच राहणार होतो. म्हणून आम्हीं भोजनाऐवजीं चहाचें निमंत्रण स्वीकारलें. दुसरे दिवशीं सकाळीं त्यांचें घरीं गेलों. तासभर गप्पा झाल्या. श्री. मखरबहादूर यांनीं जरी विश्वविद्यालयीन शिक्षण घेतलेलें नाहीं, तरी त्यांचे विचार प्रौढ व प्रगतीशील दिसले. तिबेटमधील जुनी दलाई लामाची राजवट संपून तो देश साम्यवादी चीनचा अंकित झाल्या-पासून तेथें ज्या सुधारणा होत आहेत, तशा सुधारणा नेपाळांतही व्हायला पाहिजेत असें त्यांचें मत दिसलें. नेपाळमध्यें रस्ते, दवाखाने, शिक्षण, टपालखातें वगैरे बाबतींत सुधारणा व्हावी याबद्दल त्यांना कळकळ दिसली. नेपाळसारख्या मागासलेल्या देशांत बडा हकीमसारख्या आधिकाऱ्याजवळ केवढी सत्ता असेल व त्याचा केवढा दरारा असेल याची कल्पना करावी. अशा परिस्थितींत आपल्या अज्ञानी देशबांधवांविषयीं सहानुभूति व कळकळ असलेले व प्रगतीशील विचारांचे श्री. मखरबहादुर यांच्यासारखे आधिकारी नेपाळांतील इतर भागांत असतील तर नेपाळची प्रगति झपाट्यानें होईल.

# ओखलधुंगा ते जयनगर

श्री. मखरबहादुरांचा निरोप घेऊन आम्ही आमच्या प्रवासाच्या पुढच्या टप्प्यावर निघालों. नामचे बझार येथून निघून आम्हांला सहा दिवस झाले होते. पुढील सहा दिवसांत जयनगरला पोंहोचूं असा आमचा अंदाज होता. नामचे बझारचे भारवाहक परत गेले होते. ओखलधुंगा येथून दुसरे पहाडी भारवाहक आम्ही बरोबर घेतले. ठिकठिकाणचे भारवाहक घेण्यांत एक फायदा होता. डोंगरपठारावरील वाटा व नद्यांवर बांधलेले तात्पुरते पूल यांची त्यांना माहिती होती. सर्व्हे ऑफ इंडियानें केलेले नकाशे आम्ही बरोबर घेतले होते. परंतु ते नकाशे पंचवीस वर्षांपूर्वी जुजबी जमीन मोजणी करून बनवलेले होते. त्यांत दाखवलेल्या पायवाटांत व या प्रत्यक्ष असलेल्या पायवाटांत अनेक वेळां फरक दिसून येई. हिमालयांत कडा कोसळल्यामुळें किंवा जंगल कमी झाल्यानें मार्गांत बदल होतो. तराईमध्यें नदीचा प्रवाह बदलल्यामुळेंही पूर्वीच्या मार्गात फरक पडतो. जेथून दोनतीन वाटा फुटतात अशीं अनेक स्थळें हिमालयांतील डोंगरांतून आढळून येतात. कांहीं ठिकाणीं जवळ वस्ती नसल्यामुळें कोणाला विचारून खात्री करून घेतां येत नाहीं, म्हणून त्या भागांतून ये-जा करणारे भारवाहक बरोबर असल्यास वेळ व त्रास वांचतो. त्या दिवशींचा आमचा मार्ग डोंगराच्या कण्यावरून होता. दोन्ही बाजूचे दूरवरचे देखावे दिसत होते. त्यामुळें बारा मैल चाललों तरी कंटाळा आला नाहीं. डोंगराच्या तळाशीं असलेले नाले, बर्फप्रवाहापासून उगम पावलेले नसल्यामुळें आश्विन महिन्यांत कोरडे झालेले होते. दुपारीं अडीच वाजतां माजे भांजियांग या गांवीं पोंचलों.

दुसरे दिवशीं, निघाल्यावर पांचशें फूट चढून साडेसात हजार फूट घाट माथ्यावर आलों. तेथून छोमोलंग्मा शिखरसमूह दिसला व पुन्हां एकदां अनपेक्षितपणें एव्हरेस्टचें दर्शन झालें. एव्हरेस्ट व त्याजवळील शिखरांचा आकार आमच्या पूर्ण परिचयाचा झाल्यामुळें आम्हांला एव्हरेस्ट, गौरीशंकर वगैरे शिखरें ओळखण्यास अडचण पडत नव्हती. सत्तर मैलांवरून घेतलेलें तें एव्हरेस्टचें शेवटचें दर्शन तेथून पुढें आम्ही बरेच खालीं उतरल्यामुळें त्यापुढील प्रवासांत एव्हरेस्टच काय पण, दुसरीं कुठलींहीं हिमशिखरें आम्हांस दिसलीं नाहींत.

१५०२२

घाटमाथ्यावरून उतरायला सुरवात केली व तीन साडेतीन हजार फूट उत-रून सुनकोसी नदीपाशीं आलो. ही सुनकोसी नदी आम्ही काठमांडूहून निघा-ल्याच्या दुसऱ्याच दिवशीं, दोलाल घाट येथें तारेच्या झुलत्या पुलावरून ओलां-डली होती. तिची गांठ येथें एक महिन्यानंतर पुन्हा पडली. येथें पात्र खूप रुंद असल्यामुळें पूल नव्हता. पाणी वेगानें वाहात होतें. मोठ्या वृक्षाचा बुंधा कोरून तयार केलेल्या नावेंत बसून आम्ही नदीपार गेलो. नावेंतून जाण्यापूर्वी नदींत यथेच्छ स्नान केलें. पोहून नदीपार करण्याचा मोह होत होता, इंडियन मिलिटरी ॲकॅडमींत ऑफिसर कॅडेट म्हणून असतांना डेहराडूनजवळ अशाच वेगानें वहाणाऱ्या यमुना नदींत मी व एक पठाणी कॅडेट पोहून पलीकडच्या तीरावर गेलो होतो. परंतु येथें प्रवाह जास्त रुंद होता. प्रवाहांत असलेल्या भोंवऱ्यांमुळें नदीकांठच्या गांवांतील लोकांचीसुद्धां पोहून नदीपार करण्याची तयारी दिसली नाहीं म्हणून मीही मोह आवरला. ओखलधुंगाहून निघाल्यावर वाटेंत रिंझिंग नांवाच्या एका गृहस्थांशीं परिचय झाला. ते फाफलूजवळील फेरा या गांवांतील सधन प्रतिष्ठित गृहस्थ आहेत. त्यांना कावीळ झालेली होती व औषधोपचारासाठीं ते दरभंगा येथें जात होते. त्यांच्याजवळ एक घोडा व दोन नोकर होते. घरून निघाल्यावर जवळजवळ आठ दिवसांच्या वाटचाली-नंतर त्यांची डॉक्टरशीं गांठ पडणार होती. सुनकोसी पार करतांना त्यांनीं स्वतः नावेंत बसून घोड्याचा लगाम हातांत धरला. त्यावेगानें वाहणाऱ्या प्रवाहांतून घोडा पोहत नदीपार गेला. तें दृश्य पाहण्यासारखें होतें.

यापुढील वाट बहादुरा खोल्याच्या पात्रांतून जात होती. पात्रांत पाण्याचा एक ओहोळ वहात होता. बाकी सर्वत्र दगड व वाळू होती. तो ओहोळ एक सारखा मार्गांत येत होता. व त्यांतून चालत जातांना पाय एकसारखें ओले होत होते. दुपारीं चार वाजतां बलौटी नांवाच्या छोट्या खेड्यांत पोंचलो. दुसरे दिवशीं बहादुराखोला, सिखरखोला व काकारूखोला या तीन नाल्यांच्या पात्रांतून चालत गेलों. नऊ मैल चालल्यावर सिगरीपाटी नांवाच्या स्थळीं पोंचलों. तेथें गांव नव्हतें. काकारूखोल्याच्या पात्रांतील बेटावर, केबिन-सारखी एक झोपडी बांधलेली होती, त्यांत वस्ती केली. खोल्याच्या दोन्ही किना-ऱ्यांवर दाट जंगल होतें. येथें श्वापदांची भीति होती. म्हणून आम्ही व आमचें

भारवाहक सर्वजण एकत्र सावधगिरीनें झोपलों होतो. सायंकाळीं जवळपास सरपण गोळा करतांना साप आढळून आले. दोघा सापांना मृत्युमुखीं पडावें लागलें. आतां आम्ही तराईमध्यें आलों होतो. नेपाळांतील उंच पर्वतांच्या दक्षिणेस, सुमारे तीन ते पांच हजार फूट उंची असलेल्या डोंगरांची जी रांग आहे त्याला महाभारत पर्वतश्रेणी असें नांव आहे. त्याच्या दक्षिणेला, भारताच्या सरहद्दीला लागून असलेला दहा ते तीस मैल रुंदीचा जो पट्टा आहे, त्याला तराई म्हणतात. यांतील कांहीं भाग अगदीं सखल असून कांहीं भागाची उंची समुद्रसपाटीपासून दोनशें ते पांचशें फूट आहे. यांत मोठे व उथळ नाले व जंगलें आहेत. सखल भागांत विपुल भातशेती आहे नेपाळ सरकारच्या उत्पन्नाचा तीन चतुर्थांश भाग या तराईंतूनच मिळतो.

सिगरीपाटीहून डोंगर उतरून, तावा नदी ओलांडून, नंतर त्याच नदीचें बाजूनें, कधीं नदीच्या पात्रांतील कोरड्या भागांतून, कधीं बाजूचें जंगलांतून व कधीं पाण्यानें भरलेल्या भातशेतांतून वाटचाल करीत चौदा मैलावर असलेल्या बेलशोट या गावीं जाऊन मुक्काम केला. बेलशोटनंतर तास दीड तास जंगल व डोंगराळ भागांतून चालल्यावर डोंगरांना रामराम ठोकून सपाट प्रदेशांत आलों. सपाट्यानें चालत असल्यामुळें त्या दिवशीं अठरा मैल चालून सार्सोर या गांवीं पोंचलों. वाटेंत कल्याणपूर नांवाचें गांव लागलें. तेथें आठवडे बाजार होता. गंमत अशी कीं, हा प्रदेश नेपाळचे सरहद्दींत असूनही तो बिहारच्या सरहद्दीला लागून असल्यामुळें तेथील दुकानदार नेपाळी नाणें स्वीकारण्यास नाखूष होते. त्यांचा सर्व व्यापार बिहारमधील दरभंगा जिल्ह्याशीं होत असल्यामुळें त्यांना भारतीय नाणेंच वापरणें सोईस्कर होतें. सार्सोरला पोंचण्यास रात्र झाली होती. भारवाहक तर ब्रेंच उशीरा आले. दुसरे दिवशीं जयनगरला वेळेवर पोंचतां यावें म्हणून आम्ही त्या दिवशीं मोठा पल्ला गांठला.


सकाळीं उठून बांधाबांध करून निघालों. त्या दिवशीं जयनगरला पोंचून मुंबईस जाण्यासाठीं आगगाडींत बसणार होतो, या विचारानें सर्वांना आनंद होत होता. सकाळीं अकरा वाजतांच जयनगरला पोंचलो. जयनगरच्या अलिकडे दोन मैलांवर कमळा नांवाची नदी ओलांडली. व नेपाळ देशांतून भारतात प्रवेश केला. जयनगर येथें आम्हांला रेल्वेतून लगेजनें पाठविण्यासाठीं सामानाची बांधा-

बांध करणें, सामान वजन करणें, भारवाहकांना मजुरी देणें हीं कामें करावयाचीं होतीं. शिवाय चाळीस दिवसानंतर केस कापणें, मुंबईस आमच्या नातलगास आम्ही सुरक्षित परत आल्याच्या तारा करणें, इत्यादि कामें करावचीं होतीं. आमच्या जवळचे नेपाळी पैसे भारवाहकांना मजुरी वाटतांना देऊन टाकले. बाकीची मजुरी भारतीय नाण्यांत दिली. त्या दिवशीं दीड महिन्याच्या अवधीनंतर वृत्तपत्रें वाचायला गंमत वाटली. चाळीस दिवसांच्या वाटचालीनंतर, दाढी, मिशा व केस वाढलेले असल्यामुळें, आम्ही अक्षरशः दरवेशासारखे दिसत होतो. केस कापून घेऊन, कमळा नदीवर स्नान करावयास गेलो. स्नान केल्यानंतर आग-गाडींत प्रवास करण्यालायक पोशाख केला. आतां यापुढील मुंबईपर्यंतचा बाराशें मैलांचा प्रवास आगगाडींतून करावयाचा होता. आम्हांला नको असलेल्या कांहीं वस्तू, उदाहरणार्थ, हातकंदील, ॲल्युमिनियमची भांडीं, उरलेल्या सिगारेट्स, वगैरे जिनसा जयनगर स्टेशनवरच अगदीं स्वस्त भावांत विकून टाकल्या. लगेज चार्ज देऊन त्या मुंबईस नेण्यापेक्षां तेथेंच मिळेल त्या किंमतीस विकून टाकणें फायद्याचें वाटलें. उरलेलें सर्व सामान बांधून, त्यांतील मोठे डाग रेल्वेच्या हवाली करून गाडीच्या डब्यांमध्यें बसलों. गाडी चार वाजतां निघणार होती. ओखलधुंगाहून आमच्याबरोबर आलेले भारवाहक निरोप देण्यास स्टेशनवर हजर होते. चार वाजतां इंजिननें शिटी दिली. आम्ही भारवाहकांचा निरोप घेतला. भारवाहक, जयनगर स्टेशन, नेपाळ व हिमालय या सर्वांना मागें टाकून आमची गाडी चालूं लागली.

## गिर्यारोहणास जाऊं इच्छिणाऱ्यांशीं हितगुज

एव्हरेस्ट दर्शनासाठीं केलेल्या माझ्या पर्यटनाच्या व गिर्यारोहणाच्या वर्णनांत वाचकांना रोमांचकारी साहसाचे प्रसंग आढळले नसतील. एखाद्या शिखरावर चढून त्यावर विजय पताका फडफडविल्याचा प्रसंग या वर्णनांत नाहीं. हाल-अपेष्टेचे, अनर्थांचे प्रसंग यांत नाहींत. आमच्यापैकीं एखादा कड्याचे टोकावर, दोराचे आधारानें लोंबकळत, जीवनमरणाच्या सीमेवर झोके घेत होता, असा कांहीं प्रसंग घडला नाहीं. त्यामुळें या माझ्या प्रवास वर्णनांत रोमांचकारी कांहीं आढळेल अशा हेतूनें हें पुस्तक वाचावयास घेतलेल्या वाचकांची निराशा झाली असेल. अनर्थांचे, आपत्तींचे प्रसंग या वर्णनांत नाहींत याबद्दल मी काय समर्थन करूं ? ही ईश्वराची कृपा होय; एवढेंच मी म्हणूं शकेन. आम्ही आमच्या मर्यादा ओळखून आमची शक्ति व बुद्धि यांना झेपेल एवढेंच साहस केलें. त्या दृष्टीनें चाळीस दिवसांच्या आमच्या प्रवासांत रोमांचकारी व आपत्तीचे प्रसंग घडले नसले तरी आम्ही गेलो तसे सुखरूप परत आलो हें आमच्या हिमालय पर्यटनाच्या यशाचें गमक म्हटलें पाहिजे. हिमालयांत प्रथमच परिभ्रमणास किंवा गिर्यारोहणास जाऊं इच्छिणाऱ्या माझ्या तरुण वाचकास मी हाच सल्ला देईन. प्रख्यात गिर्यारोहक फ्रँक स्माइद यानें आपल्या ग्रंथांत लिहिलेले विचार मी त्यांचे पुढें ठेवीन. स्माईदनें लिहिलें आहे, " हिमालयाशीं विनम्र होऊनच गेलें पाहिजे. हिमालयाचें सौंदर्य, त्याची भव्यता व त्याची शक्ति यांच्याबद्दल आदर बाळगून तुम्ही हिमालयापाशीं गेलात तर तो तुम्हाला नीट वागवील. तेंच पूर्ण तयारी न करितां पुरेशी माहिती न घेतां किंवा बेफिकीर वृत्तीनें तेथें पाऊल टाकाल तर हिमालय तुम्हांला शिक्षा केल्यावांचून राहणार नाहीं."

उंच पर्वताचें शिखर गांठण्यासाठीं केलेलें गिर्यारोहण मीं केलेल्या गिर्यारोहणापेक्षां जास्त खडतर व साहसी असतें. तशा प्रकारच्या गिर्यारोहणांचीं वर्णनें



नॉर्थ कॉल, ल्होला व एव्हरेस्ट

वाचकांनीं ब्रिटिश जर्मन व फ्रेंच मोहिमांच्या वर्णनग्रंथांतून वाचलीं असतील. त्या गिर्यारोहकांचा व्यासंग जब्बर, तयारी मोठी व अनुभव दांडगा होता हें विसरतां कामा नये. आपल्याकडे गिर्यारोहणाचा प्रसार नव्यानेंच होत आहे. साहसी तरुणांनीं आपलें गिर्यारोहण विषयक ज्ञान व अनुभव व आपल्याजवळ असलेलीं साधनें यांना न झेपेल असें एखादें साहस केलें व त्यांत कांहीं अनर्थ घडला तर त्यांच्या गिर्यारोहणाचें वर्णन वाचण्यास चित्तभेदक वाटेल परंतु गिर्यारोहणाचें प्रसारास मात्र त्याच्या उदाहरणानें बाध येईल.

हिमालयाच्या विविध देखाव्यांच्या दर्शनाचा आनंद लुटण्यासाठीं एखाद्या पर्वताच्या टोंकावरच जाऊन पोंचले पाहिजे असें नाहीं. एखाद दुसरा सोबती व जरूर तेवढे भारवाहक आणि साधनसामुग्री घेऊन हिमालयाच्या अंतर्भागांत गेले व तेथें दोनतीन आठवडे घालवले तरीसुद्धां ( एव्हरेस्टचें नव्हे पण ) हिमालयाचें दर्शन होईल व परत आल्यावर ज्यांचे स्मृतीस पुनः पुन्हां उजळा द्यावासा वाटेल असें आनंदाचे प्रसंग वांट्यांस येतील आणि आपल्या ज्ञानांत व अनुभवांत भर पडेल. अशा परिभ्रमणासाठींसुद्धां काटकपणा, सोशीकपणा, संकटांत डगमगून न जाण्याची वृत्ति वैगेरे गुण हवेतच. आपण हातीं घेतलें तें पार पाडण्यास लागणारी चिकाटी व मनाचा निर्धार हवा; तसेंच ज्या प्रदेशांत परिभ्रमण करावयाचें त्याचें भौगोलिक ज्ञान व आवश्यक तेवढीं सगळीं साधनें नसलीं तरी त्यांतील महत्वाची साधनसामुग्री बरोबर हवी. ही माहिती गोळा करण्यासाठीं व साधनसामुग्री जमा करण्यासाठीं जे श्रम करावे लागतात त्यांतसुद्धां आनंद मिळतो.

हिमालयांत परिभ्रमण करतांना तेथील अनेक लोकांशीं संबध येतो. त्यांचें सहाय्य घ्यावें लागतें. त्यांच्याशीं वागतांना आपली वागणूक सौजन्ययुक्त ठेवावी आणि त्यांनीं दिलेल्या सहाय्याबद्दल सक्रिय कृतज्ञता दर्शवावी. या सौजन्यपूर्ण वागणूकीचा लाभ तुम्हा स्वतःला मिळेलच परंतु त्यापेक्षांही तुमचेमागून येणाऱ्या गिर्यारोहकांस अधिक मिळेल. तुम्ही जाऊन आल्यावर तेथें जें मत निर्माण कराल त्यावरच तुमच्यानंतर जाणाऱ्यांस तेथील लोक किती सहाय्य करतील तें अवलंबून आहे. आहे भारवाहकाशीं सलोख्यानें व सहानुभुतीनें वागावयास हवें. परंतु वेळ पडेल तेव्हां खंबीरपणानें वागलें पाहिजे; नाहींतर तुमच्या नरमवृत्तीचा फायदा घेऊन गैरशिस्तीनें वागून तें तुम्हांला त्रास देतील.

हिमालयांत परिभ्रमणासाठीं जातांना चांगली सोबत बरोबर असणेंही हिताचें आहे. आम्ही हिमालयांत जायचें ठरविल्याबरोबर, "आम्ही तुमच्याबरोबर येऊं कां ?" म्हणून अनेकजणांकडून विचारणा झाली. परंतु चार किंवा पांच यापेक्षां जास्त मंडळी हिमालयांतील प्रवासास निघाल्यास सोयीचें होत नाहीं हें आम्हांस माहित असल्यामुळें कोणी येण्याची इच्छा दर्शविल्यास त्यांना नम्रपणें नाहीं म्हणून सांगायचें असें आम्हीं ठरवलें. पथकांतील लोकांची संख्या वाढली कीं सामान वाढतें, भारवाहकांचा आंकडा वाढतो. वाटेंत खेडेगांवांतील घरांत रात्रीं झोंपण्याची व्यवस्था करणें कठिण होत जातें. शिवाय जितके लोक जास्त तितका आपसांतील मतभेदाचा संभव जास्त म्हणून हिमालयांत प्रवासास जाणाऱ्यांनीं पथकांतील सभासदांची संख्या आटोपशीर ठेवावी.

जे कोणी मित्र जाणार असतील त्यांच्या आचारविचारांत शक्य तितकी एकवाक्यता असावी निदान एकमेकांच्या आचारविचाराविषयीं आदर व सहिष्णुता असावी, मतभेद झाले तरी देवाण घेवाणीची वृत्ति असावी. प्रवासांत अनेक अनपेक्षित अडचणी येतात. त्यामुळें मनुष्य चिडतो, वैतागतो अशा वेळेस प्रवासांतील सोबती जर शांत वृत्तीचे नसतील व त्यांचीं मनें परस्परविरोधी असतील तर शाब्दिक चकमकी उडायला लागतात. त्या चकमकी विकोपाला न नेतां वेळेवरच थांबवून, विसरून जाऊन पुन्हां दोघांनीं पूर्ववत् खेळीमेळीनें वागण्यास सुरवात केली नाहींतर मात्र वाईट परिणाम होतात व पथकाचें ऐक्य नाहीसें होतें. एकमेकाला घालूनपाडून बोलणें, एकानें सद्हेतुनें एखादा बेत सुचवला तर दुसऱ्यानें केवळ विरोधी करण्यासाठीं तो हाणून पाडणें, किंवा दुसरा बेत ( तो गैरसोयीचा असला तरी ) पुढें मांडणें हें चालू होतें. अशा प्रवासांत सर्वांत उपयोगी वृत्ति कोणती असेल तर ती खेळीमेळीची वृत्ति त्याला इंग्रजीत स्पोर्टसमन स्पिरिट म्हणतात. ज्याला कांहीं सोबती बरोबर घेऊन हिमालयांत किंवा अन्यत्र खडतर प्रवासास जायचें असेल तर त्यानें ही वृत्ति अंगांत आणण्याचा प्रयत्न करावा. सुदैवानें आम्ही केलेल्या प्रवासांत सर्वजण खेळीमेळीनें वागलों त्यामुळें कधींही कटुता निर्माण झाली नाहीं.

डोंगर, दऱ्या व खोरीं उल्लंघून जाण्यासाठीं शरीराची तयारी करावयाची त्याप्रमाणें पथकातील सर्वांचे संबंध खेळीमेळीनें राहण्यासाठीं मनाची तयारी

करायला हवी. एकवेळ पर्वतावर चढून जाण्याचें आपलें उद्दिष्ट साध्य झालें नाहीं तरी चालेल परंतु आपापसांत बेबनाव होऊं देऊं नये. अमुक एका स्थळीं चढून जाण्याचें उद्दिष्ट थकव्यामुळें, मन कमजोर झाल्यामुळें किंवा अनिवार्य संकटें आल्यामुळें साध्य झालें नाहीं तर पुन्हां प्रयत्न करून तें साध्य करतां येईल. परंतु आपापसांत वैमनस्य निर्माण झाल्यास परिभ्रमणाचा आनंद निर्मळ रहात नाहीं व आपसांतील दुहीचें लोकांत प्रदर्शन होतें. आपल्या पथकाची स्वदेशांत व परदेशांत अपकीर्ति होते. ही अपकीर्ति कटाक्षानें टाळणें अगत्याचें आहे.


पथकांतील सोबत्यांची निवड केल्यानंतर एकमेकांच्या स्वभावविशेषांविषयीं सहनशीलता दाखवावी. अशी सहनशीलता दाखविल्यानें मोहीम यशस्वी होण्यास मदत होते. एवढेंच नव्हे तर आपली स्वतःची मानसिक उन्नति होण्यासही मदत होते. आपल्या सहकाऱ्याची आपणांस नावडणारीं लहानसहान कृत्यें सहन करतांना आपण त्याची गय करीत नसून आपला उद्धार करीत आहोंत हा विचार मनांत ठेवावा. चढून जात असतांना थकून गेल्यावर एकेक पाऊल पुढें टाकतांना आपल्या शरीरांतील राखीव शक्तीचा उपयोग होतो. त्याप्रमाणेंच सोबत्यानें संताप आणण्याजोगी गोष्ट केली असतांना सहनशीलता दाखविल्यानें मनाची राखीव शक्ति उपयोगांत येते. एखाद्या सोबत्याच्या बोलण्याबद्दल अथवा कृत्याबद्दल ज्यावेळेस साहजिकपणें संताप यावयाचा अशा वेळेस दुसऱ्यानें मनावर ताबा ठेवून शांतता धारण केली तर त्याची शांत वृत्ति त्याच्या कमकुवतपणाची द्योतक नसून सामर्थ्याची होय. याची जाणीव संतापून वेडेवांकडे बोललेल्या किंवा वेडेवांकडे वागलेल्या त्याच्या सोबत्याला कांहीं वेळानें तो स्वतः शांत झाल्यावर होते.

ऐहिक मानसन्मान, संपत्ति, शारीरिक बळ यापेक्षां मनुष्यास अधिक कल्याणकारक कुठली गोष्ट असेल तर ती मानसिक उन्नति. ही गोष्ट पुढें मनुष्याच्या उतारवयांत पटूं लागतें. ही उन्नति साधण्यासाठीं तारुण्यकालापासूनच प्रयत्न केला तर आपल्या मर्यादित आयुष्यांत बरेंच यश प्राप्त होईल. मानसिक उन्नतीमध्यें मनाची शक्ति व मनावर ताबा या दोन्ही गोष्टी येतात. केवळ मनाची शक्ति वाढवून उपयोगी. नाहीं ती शक्ति ताब्यांत ठेवून तिचा योग्य वापर केला पाहिजे. हिमालयांत पर्यटनास जाण्याचा बेत करतांना त्या पर्यटनांत दऱ्याखोरीं व डोंगर पायाखालीं तुडवावें लागणार असल्यामुळें आपलें शारीरिक बळ वाढेल हा विचार

मनांत येतोच. त्याबरोबरच आपलें मानसिक बळ वाढविण्याची ती एक संधि आहे असें समजून त्या दृष्टीनें प्रयत्न करावा.

आमच्यांत मतभेद झाले नाहींत असें नाहीं. शाब्दिक चकमकी उडाल्या नाहींत असें नाहीं. परंतु त्या केव्हांही विकोपाला जाऊं न देण्याचा सर्वांनीं प्रयत्न केला. अशी चकमक उडाल्यास झाली गोष्ट थोड्याच वेळांत विसरून जाऊन पूर्ववत् सलोख्यानें वागण्याचें धोरण सर्वांनीं अंगिकारलें. आपल्या सोबत्यांचे पाय मागें ओढायचें नाहींत. पटलें तर त्याला प्रोत्साहन द्यायचें नाहीं तर गप्प बसावयाचें विशेषतः परक्यासमोर आपल्या मतभेदाचें प्रदर्शन करावयाचें नाहीं. एकजुटीनें वागावयाचें. असें अनेक उपयुक्त विचार आचरणांत आणण्याचा आम्ही प्रयत्न केला. त्यामुळें आमचा प्रवास सुखाचा झाला व आम्ही योजिलेले बेत उत्तम रितीनें तडीस गेले.

ग्रंथ संग्रहालय
क्र. 8820
REFBK-0008820



चहाचें नळकांडें